# राजकीय भूमिकेचे दशक

## सन १९८४ ते १९९४

# शेतकरी संघटक


वर्ष ११ वे

अंक १३ वा

६ नोव्हेंबर १९९४

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

देणगी मूल्य : रुपये १५/- मात्र


## नागपूर अधिवेशन विशेषांक

१२ नोव्हेंबर १९९४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ● बळीराजाच्या शोधात संघटककेचा खारीचा वाटा | – | ३ |
| ● गच्छ सूकर । भद्रं ते । | – | ४ |
| ● निवडणूक आंदोलनाची सुरुवात | सहकारी संस्था निवडणुका : १९८४ | ५ |
| ● अर्थवादी चळवळींना जातीयवादाचा बडगा | लोकसभा निवडणूक १९८४ | ७ |
| ● निवडणूक आणि शेतकरी आंदोलनाचे तंत्र | विधानसभा निवडणूक १९८५ : भूमिकेची प्रस्तावना | १२ |
| ● सर्वात प्रभावी विजयी उमेदवार – शेतीमालाचा भाव | विधानसभा निवडणूक १९८५ : भूमिकेचे विश्लेषण | १३ |
| ● आमच्या जाती जाती आज जळून गेल्या राख झाल्या | नांदेड : लोकसभा मतदार संघ<br>पोटनिवडणूक, मार्च १९८७ | १७ |
| ● शेतकरी संघटनेच्या निवडणूक भूमिकेची पार्श्वभूमी | लोकसभा निवडणूक १९८९ | २१ |
| ● काळ्या इंग्रजांच्या तावडीतून सुटका होते आहे,<br>जातीयवाद्यांच्या जबड्यात जाऊ नका | लोकसभा निवडणूक १९८९ | २३ |
| ● लोकसभेची मध्यावधी निवडणूक आणि शेतकरी संघटना | लोकसभा मध्यवधी निवडणूक १९९१ | २५ |
| ● लोकसभा निवडणूक १९९१<br>अपात्र नेत्यांनी मांडलेली जनतेची अग्निपरीक्षा | लोकसभा मध्यवधी निवडणूक १९८९ | ३२ |
| ● आयाबहिणींचे राज्य हवे, टग्यांचे राज्य नको. | पंचायत राज्य निवडणुका<br>भूमिकेची आवश्यकता १९८७ | ३४ |
| ● शेतकरी महिला आघाडीच्या निर्णयाची पार्श्वभूमी | पंचायत राज्य निवडणुका : भूमिकेचे प्रास्ताविक | ३७ |
| ● शेतकरी महिला आघाडीचा जाहिरनामा | पंचायत राज्य निवडणूक १९९२ | ३९ |
| ● खऱ्या विकास कार्याच्या सुरुवातीसाठी<br>शेतकरी महिला आघाडी | पंचायत राज्य निवडणूक १९९२ | ४१ |

# बळीराजाच्या शोधात संघटकचा खारीचा वाटा

शेतकरी संघटनेचे सहावे आणि शेतकरी महिला आघाडीचे चौथे असे संयुक्त अधिवेशन १२ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर येथे भरत आहे.

भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार करीत असल्याची घोषणा करून आता तीन वर्षे उलटून गेली, तरीही शेतीमालावर निर्बंध लादण्याची समाजवादी नेहरूनीती शासनाने चालूच ठेवली आहे. मागील आठवड्यात शासनाने कांद्यावर घातलेली निर्यातबंदी हे त्याचेच द्योतक आहे. उद्योजकांनाही शासन आपल्या लायसन्स्-परमिट-कोटा- इन्स्पेक्टर राज्याच्या जाळ्यातून मोकळे करायला राजी होतांना दिसत नाही. पगारवाढ, महागाईभत्तावाढ, बोनस इत्यादी मार्गांनी नोकरशाहीचे लाड मात्र शासनाने चालूच ठेवले आहे. क्षुद्रवाद्यांसमोर तर ते गलितगात्रच झाले आहे. इकडे विरोधी पक्ष खुल्या अर्थव्यवस्थेच्या वाऱ्यात आर्थिक कार्यक्रम हरवूनच बसले आहेत; अर्थवादाऐवजी पक्षांतर्गत लठ्ठालठ्टी आणि जनसामान्यांमध्ये एकमेकांबद्दल विद्वेष निर्माण करणारे जाती, धर्म, भाषा, प्रांत यांसारखे क्षुद्रवाद यांच्यामध्येच ते अडकून बसले आहेत.

खुल्या अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून साऱ्या जगात उद्योजकवादाची संस्कृती सुरू होते आहे. भारतातील शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक आणि खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याची आस असलेले नागरिक मोठ्या आशेने या संस्कृतीच्या स्वागतास सिद्ध झाले आहेत.

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका उंबऱ्यावर येऊन ठेपल्या आहेत. स्वतःच्या श्रमावर आणि उद्यमशीलता व उपक्रमशीलता यांवर निष्ठा असलेल्या शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक इत्यादी उत्पादक घटकांना प्रचलित सत्ताधारी आणि सत्ताइच्छुक इतर राजकीय पक्षांकडून आपल्या उद्योजकतेच्या आर्थिक संरक्षणाची बिल्कुल खात्री वाटत नाही. देशातील हे घटक नव्या राजकीय पर्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. हातपाय लुळे करून नंतर कुबड्या आणि हाती कटोरे देणारे सरकार त्यांना नको आहे. त्यांना सरकार हवे आहे स्वतंत्रपणे, स्वतःच्या बुद्धीने आणि स्वतःच्या जोखमीवर व्यवसायउद्योग, व्यापारउदीम, शेतीभाती करणाऱ्या सर्वांचे लुटारूंपासून संरक्षण करणारे, कायदा आणि सुव्यवस्थेचा अंमल करणारे आणि आपल्या व्यक्तिगत आर्थिक-सामाजिक जीवनात ढवळाढवळ न करणारे; आता वामनापुढे माथा न झुकविणाऱ्या बळीराजाचे.

शेतकरी संघटना आणि शेतकरी महिला आघाडी १२ नोव्हेंबर १९९४ रोजी होणाऱ्या आपल्या संयुक्त अधिवेशनात येत्या निवडणुकीसाठी आपली राजकीय भूमिका निश्चित करणार आहे. भूमिका काहीही घेतली तरी शेतकरी संघटनेवर त्यासंबंधी टीका होणार आहे.

भूमिका काहीही घेतली तरी प्रत्येक वेळी शेतकरी संघटनेवर टीकाच होत आली आहे. कारण प्रत्येक वेळची भूमिका ही प्रस्थापित राजकारण्यांच्या – सत्ताधारी आणि विरोधी दोन्हीही – राजकीय स्वार्थाला चिमटा लावणारी होती. १९८४ पासून १९९२ पर्यंतच्या सर्व निवडणुकांचे निकाल काही लागोत, शेतकरी प्रश्नाचा आवाज या काळात प्रत्येक वेळच्या निवडणूकभूमिकेनंतर वरवर चढत गेला. केंद्र शासनाने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री (पुणे-मुंबई सारख्या शहरात काय बोलतील ते वेगळे, पण) नाशिकसारख्या कांदाउत्पादक भागात जाहिरपणे बोलतात, 'कांद्यावरील निर्यातबंदीचा निर्णय चुकीचा आहे.' दहा वर्षांपूर्वी अशी हिम्मत कुण्या मुख्यमंत्र्याची झाली असती? दहा वर्षांपूर्वी कुण्या मुख्यमंत्र्याला अशी बुद्धी सुचली असती? आज अशी हिम्मत होते, आज अशी बुद्धी सुचते ती शेतकऱ्यांची ताकद वाढली म्हणून. शेतकरी संघटनेची निवडणूक भूमिका आणि आंदोलनतंत्र हे नेहमी शेतकरी आंदोलन अधिक प्रभावी करण्यासाठीच आखण्यात आले आणि ते तसेच परिणामकारक ठरले. याचा आणखी पुरावा काय हवा?

शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या या संयुक्त अधिवेशनाच्या निमित्ताने शेतकरी संघटकचा हा विशेषांक प्रकाशित करण्यात येत आहे. या अंकात, १९८४ पासून ज्या ज्या निवडणुका झाल्या त्या त्या वेळी शेतकरी संघटनेने घेतलेल्या भूमिकांचे विश्लेषण करणारे श्री. शरद जोशींचे लेख व शेतकरी संघटनेची काही प्रसिद्धीपत्रके संकलित केली आहेत. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना आणि शेतकऱ्यांना पुढील निवडणुकीतील भूमिका ठरविण्यासाठी आणि जी ठरेल ती समजण्यासाठी आणि आपल्या इतर भावाबहिणींना समजावून सांगण्यासाठी या संकलनाचा उपयोग होईलच पण शेतकरी आंदोलनाचा राजकीय दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनाही त्याचा उपयोग होईल.

शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या या संयुक्त अधिवेशनाच्या निमित्ताने, उद्योजकवादाच्या संस्कृतीत पदार्पण करण्यास तयार असणाऱ्या सर्व शेतकरी भावाबहिणींच्या आणि देशातील इतर सर्व स्वातंत्र्यइच्छुक उद्योजक व व्यावसायिक घटकांच्या बळीराजाच्या शोधामध्ये संघटकचा हा खारीचा वाटा – यशाच्या खात्रीने.

**सुरेशचंद्र म्हात्रे**
संपादक, शेतकरी संघटक
६ नोव्हेंबर १९९४.

# गच्छ सूकर । भद्रं ते ।

**प्रति,**

**संपादक, दैनिक लोकमत, नागपूर.**

**स. न. वि. वि.**

आपला २१ ऑक्टोबर १९९४ च्या अंकातील ''वाह्यात भाषा'' हा अग्रलेख वाचण्यात आला.

स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधींची विचारसरणी बाजूला सारून नेहरू घराण्याने जी व्यवस्था उभारली त्या व्यवस्थेमुळे देश आजच्या भयानक स्थितीला आला आहे, हे माझे मत मी अनेक व्यासपीठावरून गेली १५ वर्षं मांडत आहे. या माझ्या विचारांना आता जागतिक मान्यता मिळते आहे. पक्षीय राजकारण सांभाळून खुद्द पंतप्रधानही ही भूमिका मांडत आहेत. या विचाराबद्दल आपले मतभेद असतील तर ते अशोभनीय भाषेत देखील मांडण्याचा आपला हक्क मी मान्य करेन.

इंदिरा गांधींनी त्यांच्या आमदनीत घडवून आणलेल्या कायदेशीर तरतुदीमुळे भारतात आज समाजवादाच्या विरोधकांना निवडणुका लढविण्याचा हक्क नाकारण्यात आला आहे. समाजवादाने केवळ भारताचेच नव्हे तर साऱ्या मनुष्यजातीचे एक शतकभर नुकसान केले याबद्दल माझ्या मनात काहीच शंका नाही. पण तरीही समाजवाद्यांना निवडणुका लढविण्याचा अधिकार असू नये असे मी कधी म्हणणार नाही. त्याचप्रमाणे समाजवादी नसलेल्यांना निवडणुका लढविण्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी प्रखर आंदोलन करावे लागेल, असे माझे मत आहे. समाजवादाच्या नावाखाली शेतकऱ्यांना कर्जात बुडविण्याची व्यवस्था चालविणाऱ्या आणि देशाला अधःपाताकडे नेणाऱ्या नेहरू घराण्यातील पंतप्रतधानांचे पुतळे खाली ओढले गेल्याने आवश्यक तर सांस्कृतिक परिवर्तनाची सुरुवात होईल असा माझा विश्वास आहे. या कल्पनेशी आपला मतभेद असेल तर अगदी जातीयवादी शिवीगाळ करूनही आपले मत मांडण्याचा आपला अधिकार मी मानतो.

परंतु काहीही आधार नसतांना, मी महात्मा गांधीचेही पुतळे खाली ओढा असे म्हटल्याचे सांगून केवळ गोबेल्सला शोभणारे धादांत असत्याच्या प्रचाराचे तंत्र आपण वापरले आहे याचा मला खेद वाटतो. गेली पंधरा वर्षं गांधीवादाशी सुसंगत असा 'गावाच्या विकासातून देशाचा विकास होतो' हा विचार मी मांडला आहे. पंडित नेहरूंनी गांधीविचाराच्या पाठीत सुरा खुपसला हा माझा नेहरूंवरील मोठा आक्षेप आहे. माझ्या विचारांशी थोडाही परिचय असलेला कोणीही शुद्धीवर असतांना मी गांधींचा विरोधक आहे असे म्हणणार नाही. नागपूर येथे दि. १९ ऑक्टोबर १९९४ रोजी कार्यकर्त्यांच्या बैठकीत केलेल्या सभेत मी नेहरू घराण्यातील तीनही पंतप्रधांनाचे पुतळे उखडण्याची भाषा अत्यंत जबाबदारीने केली आहे. कोणत्याही राजकीय स्वार्थाची दृष्टी न ठेवता मी ज्या प्रेरणेने शेतकरी समाजाचे काम करीत आहे, त्या प्रेरणेस हे आवाहन जुळणारे आहे. या तिघांचे पुतळे पाडण्याचा माझ्या प्रस्तावाबद्दल आपण कितीही गलिच्छ आणि शिवराळ भाषेत बोललात तरी कायद्याचा आधार असूनही आपल्यावर कारवाई करण्याचा मी विचार करणार नाही. ''गच्छ सूकर । भद्रं ते' अशी माझी भूमिका आहे.

**नेहरूराज्याचा अस्त आता अटळ आहे याची खात्री झाल्याने नेहरूराज्याच्या कृपेने भरभराटीला आलेले सर्वच घटक हवालदिल झाले आहेत. नेहरूराज्याला खाली खेचण्यासाठी आपली ताकद लावून सर्व स्वातंत्र्यवादी उद्योजकांना विकासाचा मार्ग खुला करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या शेतकरी संघटनेमागे शेतकऱ्यांनी आणि सर्वसामान्यांनी जाऊ नये यासाठी हे घटक आटोकाट प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांत दैनिक लोकमतच्या संपादकांनी शीग गाठली. त्यांनी, गेली १५ वर्षे म. गांधींच्या आर्थिक विचारांचा पाठपुरावा करीत आलेल्या शरद जोशींच्या तोंडी महात्मा गांधींबद्दल अवमानकारक शब्द घालून त्यांच्यावर निर्गल टीका करणारा अग्रलेख लिहिला. त्याला श्री. शरद जोशींनी दिलेले उत्तर.**

आपल्या अग्रलेखात पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्याबरोबर महात्मा गांधींचेही नांव मी 'किस झाड की पत्ती' या सदरात घेतल्याचे आणि महात्मा गांधींचाही पुतळा फेकून देण्याचा प्रस्ताव मांडल्याचे म्हटले आहे. ही चूक काही सहजपणे किंवा अनवधानाने होणे शक्य नाही. माझ्या विचाराशी चुटपुटता देखील परिचय असलेला माणूस मी महात्माजींच्या विरूद्ध बोलल्याच्या बातमीवर विश्वास ठेवणार नाही. माझ्या भाषणासंबंधी आपल्याच दैनिकात दि. २० ऑक्टोबर ९४ रोजी छापून आलेली बातमी आपण वाचलीत तर मी काय बोललो हे स्पष्ट होईल.

तरीही आपण जाणीवपूर्वक महात्मा गांधींचे नाव गोवले ते नेहरू घराण्याला गांधींच्या महात्म्याचा आडोसा देण्यासाठी आणि माझ्यावर अद्वा-तद्वा तोंड सोडता यावे यासाठी, नेहरू घराणे लवकरच भारतातील मार्कोस घराणे ठरणार आहे, याची चाहूल लागल्याने आपण उघड उघड असत्याचा आश्रय घेवून नेहरू घराण्याला वाचवू पहात आहात.

आपला अग्रलेख मराठी वृत्तपत्रांच्या संपादकीय इतिहासात एक स्वतंत्र नीचांक ठरावा. आपल्या लेखाने माझ्यावर आपण निर्गल भाषेत चिखलफेक केली आहे. माझ्या तोंडी गांधीजींविषयी खोटे उद्‌गार घातले आहेत. हे सर्व चुकीने झाले असावे असे गृहीत धरून मी, संपादकीयाच्या स्तंभामध्ये या विषयी आपण दिलगिरी व्यक्त करावी आणि त्या बरोबर हे पत्र ही संपूर्णपणे छापावे असे सुचवितो. या साठी मी आपणास दि. ३१ ऑक्टोबर पर्यंत मुदत देतो आहे. आपण योग्यप्रकारे दिलगिरी व्यक्त केली नाही तर आपल्या अग्रलेखाने झालेले परिणाम धुवून काढण्याकरिता जे काही योग्य वाटेल ते करण्यास मी मोकळा होईन. परिणामांची सर्व जबाबदारी अर्थात आपली राहील.

आपला

शरद जोशी

# निवडणूक आंदोलनाची सुरुवात

सहकारी संस्थांच्या, विशेषकरून सहकारी कारखान्यांच्या निवडणुकांचे ढोल वाजू लागले आहेत. होणार, नाही होणार असे म्हणता म्हणता साखर कारखान्यांच्या निवडणुका झपाट्याने, म्हणजे मे महिन्याच्या शेवटपर्यंत उरकून घेण्याचा शासनाचा बेत दिसतो.

गेल्या पंधरवड्यात वेगवेगळ्या जिल्ह्यांतील कार्यकर्ते माझ्याकडे येऊन गेले. या निवडणुकांसंबंधी शेतकरी संघटनेचे धोरण काय? प्रत्येक कारखान्यात संघटनेच्या कार्यकर्त्यांनी काय करावे? असे अनेक प्रश्न घेऊन कार्यकर्ते माझ्याकडे येत होते.

वस्तुतः या विषयाची सविस्तर चर्चा मनमाड येथे भरलेल्या ४ सप्टेंबर १९८३ च्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत झाली होती. परभणी येथील अधिवेशनातही या विषयाचा उहापोह झाला होता, आर्थिक संस्थांच्या निवडणुकांसंबंधी काहीही गोंधळ कार्यकर्त्यांच्या मनात असण्याचे कारण नव्हते. तरीही या विषयावरचे संघटनेचे धोरण एकदा स्पष्टपणे मांडण्याचे ठरविले आहे.

सहकारी संस्थांचे सभासद वेगवेगळ्या पक्षांचे असतात, गटांचे असतात, शेतकरी संघटनेचेही असतात. संघटनेचे कार्यकर्ते कोणत्या ना कोणत्या सहकारी संस्थेचे सभासद असतातच. गावची विविध सेवा सहकारी सोसायटी, तालुक्याच्या खरेदी विक्री संघ, बँका, बाजारसमित्या, दूध सोसायट्या, सूत गिरण्या, साखर कारखाने या ना त्या संस्थेचा प्रत्येक शेतकरी सभासद असतोच.

## सहकाराची घसरगुंडी

या सहकारी संस्थांच्या निवडणुकींचा तसे म्हटले तर राजकारणाशी काहीही संबंध नाही. संस्थेच्या सदस्यांचे कल्याण साधणे हे या संस्थांचे उद्दिष्ट असावयास पाहिजे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड केवळ उमेदवारांची व्यक्तिगत सचोटी, कर्तबगारी, सेवावृत्ती लक्षात घेऊनच शेतकऱ्यांनी करावयास पाहिजे. लायक पदाधिकाऱ्यांची निवड झाली तरच शेतकरी सभासदांना लाचलुचपत करावी न लागता कर्जे मिळू शकतील, शेतीमालाला रास्त नाही तरी अधिक चांगला भाव मिळेल.

शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांची सुरुवात मोठ्या चांगल्या हेतूने झाली. पण शेतीमालाला रास्त भाव मिळू न देण्याच्या शासनाच्या धोरणामुळे सहकारी संस्थांतील पदाधिकाऱ्यांच्या लवकरच लक्षांत आले की या संस्था म्हणजे निव्वळ शेतकऱ्यांच्या डोळ्यांत केलेली धूळफेक आहे; त्यातून निष्पन्न काहीच होत नाही.

विविध सेवा सहकारी सोसायटी कितीही प्रामाणिकपणे चालवा शेतकरी नवे-जुने करीत कर्जात अधिकाधिक बुडतच जातो. कारण मुळात शेती तोट्यात आहे.

दूध सोसायटी अगदी स्वच्छ रीतीने कर्तबगारीने चालवली तरीही शेतकऱ्याच्या हातात पडणाऱ्या किंमतीत त्याचा उत्पादनखर्चही भरून निघत नाही.

साखर कारखाना कितीही सचोटीने, धडाडीने चालवा उसाला किफायतशीर भाव मिळतच नाही.

हे एकदा लक्षात आले की सहकारी संस्थांचे सुरुवातीला अगदी प्रामाणिक आणि कळकळ असलेले कार्यकर्तेसुद्धा निराशेपोटी स्वार्थामागे लागतात. मग बाकीच्या हौशी गवशी मंडळीविषयी विचारायलाच नको.

शेतीमालाला रास्त भाव मिळू न देण्याच्या शासकीय धोरणामुळे सहकारी संस्थांचा मूळ हेतू धुळीस मिळाला आणि इंडियाच्या भारतावरील स्वामित्वाची सूत्रे सांभाळणाऱ्या रावबहाद्दूररावसाहेबांची जोपासना करण्याचे काम या सहकारी संस्था करू लागल्या. सहकार म्हणजे स्वाहाकार, सहकार म्हणजे भ्रष्टाचार, सहकार म्हणजे राजकारण अशी दुर्दैवी परिस्थिती तयार झाली.

## स्वाहाकार-भ्रष्टाचार-लाचारी

खासदारकी आमदारकीच्या निवडणुकीत ज्यांची सोय लावता येत नाही अशा चमच्यांच्या चंगळीची व्यवस्था करण्याचे सहकारी संस्था हे सोयिस्कर साधन बनले. याहीपुढे जाऊन आमदारकी नसली तरी चालेल पण कारखाना पाहिजे, आमदारकी मिळाली तरी त्याच्या बरोबरीला कारखाना पाहिजे अशा मागण्या होऊ लागल्या आणि त्या पुरवल्याही जाऊ लागल्या.

जवळजवळ सगळ्या संस्थांत किमान दोन गट असतात. त्यांच्या निवडणुका मोठ्या धडाक्यात होतात; लक्षावधी रुपये खर्चून होतात. निवडून आल्यानंतर हाती लागणारे घबाड इतके मोठे असते की त्याच्या लोभाने लालचावलेले काय वाटेल ते कायदेशीर-बेकायदेशीर, नैतिक-अनैतिक प्रकार करायला कोणताही गट मागे पहात नाही.

साखर कारखान्यात हाती लागणारे घबाड मोठे. प्रत्येक खरेदीवरचे कमिशन, प्रत्येक कामावरचे कमिशन, साखरेवरचे वरकड उत्पन्न, दारूवरचे वरकड उत्पन्न, कारखान्यावर उपलब्ध होणाऱ्या चैनीमौजीच्या, खाण्या-पिण्याच्या सोयी, कारखान्याच्या खात्यावर मिळणाऱ्या चंगळीच्या सोयी, राजकीय मोठेपणा, पुढे होणाऱ्या शक्यता हे पहाता सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुका खासच अटीतटीच्या व्हाव्यात हे साहजिकच आहे.

दुर्दैवाची गोष्ट अशी की या अधःपनात शेतकरी सदस्यही सामील झाले. आपल्या संचालकाची पात्रता काय, चारित्र्य काय याची संपूर्ण स्पष्ट कल्पना असताही शेतकरी सभासद निवडणुकीचा भाद्रपद आला की कोणत्या ना कोणत्या गटाची बाजू घेऊन निवडणुकीत झुंजतात.

कोणताही गट निवडून आला तरी उसाला किंमत मिळू शकत नाही. कारखान्याच्या कारभारात जितका हात घुसवता येईल तितकेच हाताला काही लागण्याचा संभव. आपल्या नात्याचा, ओळखीचा, जातीचा कोणी संचालक झाला तर त्याच्या मेजवानीच्या वेळी उडणाऱ्या

**सहकारी संस्था निवडणुका : १९८४**
**शेतकरी संघटक, ४ मे १९८४**

उष्ट्याचा तरी काही भाग आपल्या ओठी पडेल या आशेने शेतकरी सभासद हिरीरीने प्रचारात भाग घेतात.

वर्षानुवर्षे हे राजकारण चालले आहे. पिढ्यान्‌पिढ्या चालणाऱ्या परंपरागत वैराचे रूप गटागटातील स्पर्धांना आले आहे. तर काही ठिकाणी सत्तेच्या लोभाने उघडउघड उलट्यापालट्या उड्या घेणारे दलबदलूही दिसतात.

शेतकऱ्याच्या उसाला भाव मिळावा म्हणून सहकारी साखर कारखान्यांची चळवळ उभी करणाऱ्या महर्षिंच्या आत्म्याला आजचे दृष्य पाहून किती यातना होत असतील? १९८० साली देश हलवून सोडणारे ऊस-आंदोलन झाले. एखादा खास अपवाद सोडल्यास कोणीही संचालक किंवा अध्यक्ष शेतकऱ्यांशी इमान राखून उभा राहिला नाही.

संचालक मंडळाचा कारखाना चालवण्याशी काहीही संबंध राहिलेला नाही. नोकरवर्ग कारखाना चालवतात. १९८० साली तुरुंगात असताना कै. माधवराव बोरस्ते अत्यंत बेचैन असत. दररोजच्या साखरप्रमाणावर लक्ष ठेवणारे ते. आपल्या गैरहजेरीत काय झाले असेल याची त्यांना चिंता वाटे. तुरुंगातून सुटल्याबरोबर ते कारखान्यावर गेले. दुसरे दिवशी पुन्हा भेटल्यावर मला म्हणाले, ''शरदराव, काय गंमत आहे, सगळे संचालक मंडळ गैरहजर आणि साखरेची रिकवरी वाढली की?''

### संघटना आणि निवडणुका

कारखान्याच्या कामाशी संबंध नाही. स्वाहाकारी आणि शेतकऱ्यांच्या लाचारीवर मिजास मारणारे अशा या संचालक मंडळांच्या निवडणुकीत संघटनेचे धोरण काय राहील?

शेतकरी संघटनेत जसे पक्षीय राजकारणापासून दूर असलेले कार्यकर्ते आहेत तसेच वेगवेगळ्या पक्षांत काम करणारेही आहेत. पक्षाची मंडळी त्यांच्या त्यांच्या पॅनेलमधून कारखान्यांच्या निवडणुका लढवू शकतात. त्याचप्रमाणे पक्षनिरपेक्ष कार्यकर्त्यांनाही स्वतंत्रपणे व्यक्तिगत रूपाने निवडणुका लढवण्याचा अधिकार आहे यात काही वाद नाही. काही प्रसंगी दोन बलाढ्य गटांच्या यादीपैकी एका यादीतही ते जाऊ शकतात. पण कोणत्याही पॅनेलमध्ये जाण्याचा त्यांचा निर्णय त्यांचा केवळ व्यक्तिगत निर्णय असेल.

शेतकरी संघटनेला दोन टग्यांच्या गटांतील मारामारीत काहीही स्वारस्य नाही. कोणताही गट निवडून आला तरी उसाला भाव मिळण्याच्या दृष्टीने काहीच फरक पडणार नाही. तेव्हा या गटाला पाडून त्या गटाला निवडून आणण्याचे प्रयत्न करण्याचे संघटनेला काहीच कारण नाही.

अशा गटागटांच्या झगड्यात भाग घेतल्याने संघटनेचा फायदा तर नाही, पण अगदी भरून न येण्यासारखे नुकसान होण्याचा प्रचंड धोका आहे.

संघटनेची आजची उज्ज्वल प्रतिमा तिच्या निःस्वार्थ वैराग्यामुळे आहे. कारखान्यांच्या राजकारणाच्या चिखलात उतरल्यामुळे ही प्रतिमा निश्चितपणे डागाळेल. संघटनेचे कार्यकर्ते, संचालक आणि इतर संचालक यात फरक करणेच सामान्य शेतकऱ्याला शक्य होणार नाही, आणि इतर पक्ष आणि संघटना यात तरी शेवटी काय फरक आहे अशी वैफल्याची भावना पसरेल.

म्हणून सध्याच्या परिस्थितीत संघटनेच्या कोणा कार्यकर्त्यांस या ना त्या पॅनेलमधून उभे रहावयाचे असेल तर तो त्याचा व्यक्तिगत निर्णय असेल. आपण संघटनेचे काम केले आहे हे तो आपल्या प्रचारात सांगूही शकेल. पण असे कार्यकर्ते निवडून आल्यानंतर जे काम करतील त्याची जबाबदारी संघटनेवर राहणार नाही.

### नवीन दिशा

आर्थिक सहकारी संस्थांच्या निवडणुकीचे संघटनेस वावडे असायचे कारण नाही. संघटनेला अधिकृतपणे कोणत्याही कारखान्याची निवडणूक लढवण्यास काहीच हरकत नाही. पण इतर पॅनेल असतात तसाच संघटनेचा पॅनेल अशा पद्धतीने संघटना निवडणुका लढवणार नाही.

सर्व क्षुद्र राजकारणापासून दूर राहून

(पान ११ वर)

## सहकारी साखर कारखान्यांतील निवडणुकांसाठी शेतकरी संघटना पॅनेलचा जाहिरनामा

१) कारखान्यांतील साखरेची रिकवरी पहिल्या वर्षात किमान अर्ध्या टक्क्याने वाढवली जाईल.

२) कारखान्यांवर शासनाने लादलेला बेकायदेशीर खरेदी कर (Purchase Tax) भरण्यात येणार नाही.

३) कारखान्याच्या व्यवस्थापनाची स्वच्छता करून गळिताचा खर्च किमान पातळीवर आणण्यात येईल.

४) लेव्हीची साखर रु. ३५०/- प्रति क्विंटल यापेक्षा कमी भावाने शासनास देणार नाही.

५) खुल्या बाजारपेठेत विकावयाची साखर शेतकऱ्याच्या उसास कमीतकमी रु. ३००/- प्रतिटन (१० टक्के रिकवरी) भाव मिळेल अशा पद्धतीने विकली जाईल.

६) शेतकऱ्यास योग्य भाव मिळेपर्यंत कोणतीही शासकीय कपात मान्य केली जाणार नाही.

७) ऊसउत्पादक सदस्यांना पाच वर्षांच्या काळात कर्जमुक्त केले जाईल.

हा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी संचालक मंडळ सर्व कष्ट, त्याग सोसण्यास तयार राहील. संघटनेच्या आंदोलनात संचालक मंडळ बिनीचे सत्याग्रही म्हणून पुढे राहील.

# अर्थवादी चळवळींना जातीयवादाचा बडगा

सगळीकडे लोकसभा निवडणुकीचे ढोल वाजू लागले आहेत. वर्तमानपत्रं उघडावीत तर निवडणुकीच्या घोषणा, रस्त्यावर बाहेर पडावं तर निवडणुकीचे फलक, जाहिराती; जो तो म्हणतो आहे मला मतं द्या, मला मतं द्या. आजपर्यंत आपापल्या पक्षांची प्रौढी सांगणारी मंडळी पक्षाची तिकीटं मिळाली नाहीत म्हणून त्या पक्षातून उठून दुसऱ्या पक्षात जाऊन बसताहेत, नवीन पक्ष काढताहेत. ज्यांना तिकीटं मिळाली ती कोणत्या तऱ्हेनं मतं मिळवता येतील, कोणत्या तऱ्हेने आपल्या पक्षाचं राज्य येईल या चिंतेत मग्न आहेत.

मी हे जे लिहीत आहे ते कोण्या उमेदवाराला किंवा पक्षाला निवडून आणा हे सांगण्यासाठी लिहीत नाही. आज देशामध्ये जी विशेष परिस्थिती निर्माण झाली आहे तिचा आपल्याला थोडा विचार करावयाचा आहे. आज रस्तोरस्ती पाट्या, फलक, पोस्टर्स लावली आहेत आणि सर्वांनी एकच नारा आणि घोष लावला आहे की या देशाची एकात्मता आणि अखंडत्व टिकवायचे असेल तर आम्हालाच मते द्या. ज्यांनी ३७ वर्षे या देशावर राज्य केले ते म्हणतात, 'देश जर एक ठेवायचा असेल तर ते काम आम्हीच करू शकू.' विरुद्ध बाजूची मंडळी साहजिकच त्यांच्यावर आरोप करून म्हणतात, 'जर हे राज्यावर आले तर देशाचं वाटोळं होईल. आम्ही जर राज्यावर आलो तर मात्र आम्ही सगळं व्यवस्थित करु.' गेली ३५ वर्षे दर पाच वर्षांनी हेच घडत आलं.

आपल्या समोर या दोन्ही मंडळींनी ठेवलेला मजकूर आहे. पण मनात शंकेची पाल चुकचुकते. एखादा मुलगा एका वर्गात अनेक वर्षे नापास होत राहिला आणि आपण नापास का होतो हे त्याला सांगता येत नसेल तर बाप त्या मुलाला अधिकाराने विचारू शकतो, "बाळा, तू गेली ३६ वर्षे नापास का होतो आहेस हे जर तुला कळलं नाही तर आता काय एकदम चमत्कार होणार आहे आणि तू एकदम नापासाचा फर्स्टक्लास होणार आहेस?"

गेली ३७ वर्षे ही राज्यकर्ती मंडळी नापास का होत आहेत? या देशाची ही आजची जी परिस्थिती आहे त्याचं कारण काय आहे? हे आपण समजून घेणं जरूरीचं आहे. निवडणुका कुणी जाहिर केल्या? अयोग्य वेळी जाहिर केल्या का? या मुद्द्यांवर चर्चा करण्यात काही अर्थ नाही. निवडणुका जास्तीतजास्त फायद्याच्या वेळी जाहीर करणे, त्या निवडून येणे, सत्ता हाती घेणे हा राजकारण्यांचा धंदा आहे. यासाठी प्रसंगी प्रेताच्या टाळूवरचं लोणीसुद्धा खायची त्यांची तयारी असावी लागते. त्यांना नावं ठेवण्यात काही अर्थ नाही. आपण आपलं नागरिकाचं काम केलं पाहिजे. ज्यांच्या मनात देशाविषयी खरोखर कळकळ आहे, ज्यांना कुठं आमदारकी, खासदारकी अशी जागा मिळवायची अभिलाषा नाही पण देश वाचावा अशी ज्यांची मनात इच्छा आहे त्यांनी निदान देशाच्या परिस्थितीचा अभ्यास केला पाहिजे.

१९४७ साली भावाभावांच्या भांडणामुळे देशाची फाळणी झाली. त्यावेळी वाटलं, ऑपरेशन झालं आता भांडण संपलं. पुढे असा रोग या देशाला होणार नाही. पण भावाभावांतल्या भांडणाचा रोग हा कॅन्सरसारखा दिसतो. ४७ साली ऑपरेशन झालं असलं तरी आज ८४ साली अशी वेळ येऊन ठेपली आहे की पुन्हा एकदा ऑपरेशन, पुन्हा एकदा फाळणी होणार आहे की काय अशी शंका येते. मी हे गंभीरपणे मांडतो आहे. म्हटलं जातं की त्यावेळी वाद हिंदु-मुसलमानांचा होता. आज कदाचित हिंदु-शिखांचा आहे. माणसं काय माणसाशी कुणी हिंदु आहे, कुणी मुसलमान आहे म्हणून भांडतात? माझा या कल्पनेवर विश्वास नाही.

ज्या ज्या म्हणून जातीय दंगली झाल्या असं म्हटलं जातं त्यांच्या मागे वेगळेच काही कारण असतं असं दिसून येतं.

उदाहरणार्थ, काही महिन्यांपूर्वी भिवंडीत ज्या दंगली झाल्या त्यांना हिंदुमुसलमानांच्या दंगली म्हटलं गेलं. पण दंगलीमध्ये जे जे काही घडलं ते जर संगतवार पाहिलं तर असं दिसून येतं की भिवंडीमध्ये ज्या मोकळ्या जागा पडल्या होत्या त्यांवर खेड्यापाड्यांतून स्थलांतरित झालेली जी गरीब शेतकरी माणसं होती झोपडपट्ट्यांतून राहात होती. त्या जागा रिकाम्या करून घेण्यासाठी त्यांना व्यवस्थितरित्या आगी लावण्यात आल्या.

---

**कार्यकारिणीच्या बैठकीतील ठराव**

**पुणे, २२ नोव्हेंबर १९८४**

शेतकरी संघटना सर्व शेतकऱ्यांना आदेश देत आहे की आगामी निवडणुकीत शेतकऱ्यांनी काँग्रेस (आय) पक्षास एकही मत देऊ नये. शेतकऱ्यांच्या १९८४ स्वातंत्र्य आंदोलनाचा हा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. विरोधी पक्षांतील दुहीचा फायदा शेतकऱ्यांच्या प्रमुख शत्रुपक्षास मिळू नये यासाठी लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रत्येक मतदार संघातील एका विरोधी उमेदवाराची संघटना निवड करेल. सर्व शेतकऱ्यांनी व लोकशाही जिवंत राहावी, अशी इच्छा असणाऱ्या नागरिकांनी आपापला पक्षाभिमान, जातीचा, नात्यागोत्याचा क्षुद्र विचार बाजूला ठेवून देशाला वाचविण्यासाठी संघटनेने घोषित केलेल्या विरोधी उमेदवारास निवडून आणावे. गावबंदीचा कार्यक्रम मात्र त्या उमेदवारासही लागू असेल.

---

**लोकसभा निवडणूक १९८४**
**शेतकरी संघटक, १४ डिसेंबर १९८४**

ज्यांना या जागा मोकळ्या करून घ्यायच्या होत्या त्यांनी हिंदु-मुसलमानांच्या झगड्याचं नाव घेऊन आपला आर्थिक स्वार्थ साधून घेतला असं आपल्याला ऐकायला मिळतं.

ज्यांच्या पोटामध्ये भूक असते तो हिंदू असो, मुसलमान असो, का इतर कोणत्याही धर्माचा असो त्याला ही जाण असते की हिंदुच्या पोटातली भूक आणि मुसलमानाच्या पोटातील भूक यात काही फरक नसतो. या देशाचा इतिहास पाहिला तर ज्यांना ज्यांना पिळलं जातं त्या शेतकऱ्यांचं, शेतमजुरांचं जेव्हा म्हणून काही आंदोलन उभं राहण्याची वेळ येते तेव्हा तेव्हा अर्थवाद बाजूला पडावा, त्यांच्या आर्थिक शोषणाची तक्रार, आर्थिक मागण्या बाजूला पडाव्यात याकरिता जाणून बूजून जातीजातीची, धर्माधर्माची भांडणं लावून देण्यात आली.

इंग्रजी आमदनीतील एक उदाहरण पाहा. इंग्रज जेव्हा त्या देशावर राज्य करू लागले तेव्हा शेतीच्या शोषणासाठी त्यांनी जमिनीच्या रयतवारीची पद्धत सुरू केली. केरळमध्ये त्यावेळी जमिनीची मालकी अशी मुळी कल्पनाच नव्हती. सगळ्या गावाने मिळून जमीन कसायची; हिशोबठिशोब ठेवायचे कागदपत्राचे काम नंबुद्री ब्राह्मण करायचे, तर शेतावर मजुरी करणारे हे मुख्यतः मोपला जातीचे मुसलमान होते. इंग्रजांनी विचारले की, 'या जमिनीचे मालक कोण?' लोक म्हणाले की, 'मालकी म्हणजे काय आम्हाला समजत नाही.' इंग्रजांनी विचारलं, 'हिशोब कोण बघतो?' तेव्हा नंबुद्री ब्राह्मण म्हणाले, 'आम्ही पाहातो.' त्यांना इंग्रजांनी सांगितले की, 'मग तुम्हीच मालक आहात.' तेव्हा त्यांनाही बरं वाटलं आणि फायद्याचं वाटलं. जमिनी त्यांच्या नावावर लावण्यात आल्या. शेतमजुरांच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा साहजिकच असंतोष पसरला. त्यांनी चळवळ उभी केली. सुरुवातीला चळवळीचे नेतृत्व एका हिंदु तरूणाकडे होते, शेतमजुरांत बहुसंख्य मुसलमान. ते सर्व चळवळ करू लागले तेव्हा फायद्याला लालचावलेल्या ब्राह्मणांनी सर्व देशभर हाकाटी केली की मुसलमान आम्हा हिंदुंवर हल्ला करतायत. खरं तर शेतमजुरांच्या पोटाचा प्रश्न. पण तो घेऊन शेतकरी-शेतमजूर उठतो आहे म्हटल्यावर त्याला वळण दिलं हिंदुमुसलमान भांडणाचं. हे स्वरूप आल्यानंतर पर्याय न उरून मोपला शेतमजुरांनीही मशिदींचा आसरा घेतला. पोलिस मशिदीत घुसले आणि त्यांनी मोपल्यांना प्रचंड संख्येने कापून काढले. जे मोपल्यांचं बंड म्हणून ओळखलं जातं ती मुळात शेतकरी शेतमजुरांची अर्थवादी चळवळ होती. तिला मतलबीपणे क्षुद्रवादी, हिंदुमुसलमानांच्या भांडणाचं स्वरूप देण्यात आले.

स्वातंत्र्याआधी सिंध राज्याच्या पश्चिम भागात जे हिंदुमुसलमान वाद होत त्यांचेही खरे स्वरूप हेच होते. बहुसंख्य जमीनमालक हिंदु, शेतावर काम करणारे मुसलमान. पोटाचा प्रश्न मांडला म्हणजे त्यातून हिंदूमुसलमानाचे दंगे होत. १९४७ साली या राज्याची फाळणी झाली तेव्हा या राज्याचे तीन भाग होते. आज जो भाग पाकिस्तानात गेला आहे तेथे बहुतेक शेतकरी मुसलमान तर आजच्या पंजाबमध्ये शीख आणि आजचा हरियाना व हिमाचल प्रदेशाच्या भागात हिंदु बहुसंख्येने शेतकरी होते. आजही आहेत. १९२५ सालापासून या एकत्रित सिंध राज्यातील शेतकऱ्यांची 'जमीनदारी युनियन' होती. सर छोटूराम हे या युनियनचे प्रमुख होते तोपर्यंत शेतकऱ्यांची बाजू हिंदु, मुसलमान, शीख या तीनही धर्मांच्या शेतकऱ्यांची त्यांनी एकत्रितपणे मांडली. मुसलमान शेतकरी तर त्यांना प्रत्यक्ष परमेश्वर मानीत. सर्व शेतकऱ्यांचा छोटूरामांना प्रचंड पाठिंबा होता. त्यांनी विधीमंडळामध्ये बील मांडले होते की, ''शेती उत्तम पिकत असूनही शेतकरी कर्जात बुडतो आहे. त्यामुळे सावकार जप्ती आणून त्यांच्या जमिनी काढून घेत आहे. सरकारने कायद्याने सावकारांना अशा तऱ्हेने जमिनीवर जप्ती आणण्यास बंदी करावी.'' त्यावेळच्या काँग्रेसने या बिलाला प्रचंड विरोध केला. युक्तिवाद असा केला की, ''सावकारांनी जमिनी जप्त केल्या नाहीत तर त्यांना धंदा बंद करावा लागेल. मग शेतकऱ्यांना कर्ज कोण देणार?'' सर छोटूराम १९४६ साली वारले. पण जमीनदारा युनियन ही संघटना इतकी ताकदवान होती की १९४६ पर्यंत महमद अली जिनांना या प्रांतात पाऊलसुद्धा ठेवता आलं नाही.

देशातला स्वातंत्र्याचा प्रश्न असो की आर्थिक प्रश्न असो तो खराखुरा शेतीच्या शोषणाचा प्रश्न आहे, आर्थिक विकासाचा प्रश्न आहे; हा हिंदुमुसलमानांचा प्रश्न नाही; हा पोटामध्ये भूक असलेल्या असंख्य शेतकरी-मजुरांचा प्रश्न आहे. हे जर का त्यावेळच्या नेतृत्वाने मानलं असतं आणि तशी भूमिका घेतली असती तर ४७ सालीसुद्धा फाळणी झाली नसती. फाळणी झाली त्याला कारण त्यावेळी घोषणा आणि भजनं जरी देशाच्या एकात्मतेची केली तरी अर्थवाद बाजूला ठेवून भाषामात्र धर्माच्याच बोलल्या गेल्या.

आज ते ४७ चे दिवस आठवण्याचे कारणही तसेच आहे. त्यावेळी मी शाळकरी विद्यार्थी होतो. आज रस्तोरस्ती या अखंडतेच्या एकात्मतेच्या घोषणा पाहिल्या, ऐकल्या की पोटात गोळा उठतो. अशाच तऱ्हेचे वाक्य, घोषणा आम्हाला सुद्धा ४५, ४६, ४७ सालांत ऐकू आल्या होत्या आणि ४७ साली देशाचे तुकडे झाले.

आज देशापुढे भयानक गंभीर समस्या आहे, गंभीर समस्या आहे म्हणायचं आणि आम्हाला मतं द्या म्हणायचं इतका हलका-सलका काही हा प्रश्न नाही. राजकारणी पुढाऱ्यांना काय? देश बुडतो आहे. मग काय करा? आम्हाला मते द्या. बरं होत असलं तरी आम्हाला मत द्या आणि वाटोळं होत असलं तरी आम्हाला मतं द्या. याच्यातून एक गोष्ट लक्षात येते की येत्या दोन वर्षात देशाची काय भयानक अवस्था होणार आहे याची जाणीव सत्तेच्या मागे लागलेल्या या अधम पुढाऱ्यांना अजिबात नाही. देशाची पुढची परिस्थिती भयानक गंभीर आहे.

पंजाबमध्ये एकीकडे अतिरेक्यांनी हैदोस घातला असताना गेली चार वर्षे शेतकरी संघटनेचे शांततापूर्ण आंदोलन चालू आहे. त्यात कुठे शीख, बिगरशीख असे वाद आड येत नाहीत. आज पंजाबमध्ये बिगरशीख, इतर राज्यातील असा मी गेलो

की माझ्या सभेला लक्षावधी शीख शेतकरी जमतात. दुसरा कुणीही गेला तर हे होत नाही. हे मी अभिमान म्हणून सांगत नाही पण परिस्थितीचा बरोबर अभ्यास केल्याने मला हा अनुभव येतो हे मला सांगायचे आहे. पंजाबमधील प्रश्न हा मुळात धर्माचा नाही. तो आर्थिक स्वरूपाचा आहे. १९६५ साली पंजाबच्या शेतकऱ्याने मोठ्या आशेने हरितक्रांती अंतर्गत कार्यक्रम स्वीकारून यशस्वी केला. जिथे १० क्विंटल भात पिकत होते तिथे ३० क्विंटल पिकू लागले, १०-१२ क्विंटलच्या ठिकाणी ३० क्विंटल गहू पिकू लागला. देशामधील अन्नधान्याची तुटवड्याची परिस्थिती दूर होऊन देश त्याबाबतीत स्वयंपूर्ण झाला याचे श्रेय प्रामुख्याने पंजाबी शेतकऱ्याकडेच जाते. उत्पादन वाढलं, शेती हिरवी झाली पण शेतकऱ्याला काय मिळालं? त्याला फक्त वाढीव कर्जबाजारीपणा मिळाला. मुलांनी इतरत्र नोकऱ्या करून कमावलेले पैसे शेतीत लावले आणि एका हंगामात नाहीसे झाले. याला कारण गव्हाला किंमत दिली जाते. १५२ रुपये दर क्विंटलला, उत्पादन-खर्चापेक्षा किती तरी कमी. या वर्षाच्या सुरुवातीला सरकारने नियुक्त केलेल्या 'जोल समिती'ने स्पष्टपणे जाहिर केलं की पंजाबमध्ये गव्हाचा उत्पादनखर्च रु. १९० प्रतिक्विंटलपेक्षा कमी असणे शक्य नाही. तरीही शेतकऱ्याला भाव १५२ चाच. परदेशातून मात्र निकृष्ट गव्हाची आयात रु. २२४ ने केली जाते. ब्रह्मदेशाच्या उकड्या तांदुळाला २२० रु. दिले जातात, पंजाबच्या शेतकऱ्याला मात्र रु. १४०.

हरितक्रांतीने उत्पादन वाढले. पण शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा मात्र या किंमत-धोरणाने वाढत गेला. पण फायदा कुणाचा झाला? शहरातील व्यापारी, ट्रॅक्टरचे कारखानदार आणि विक्रेते अशा मंडळींचा. दुर्दैवाने परिस्थिती अशी आहे की पंजाबमधला जवळजवळ सगळा शेतकरी शीख तर व्यापारी बहुतांशी हिंदु आहे. तरीही पंजाबमधील शेतकरी आंदोलन निखळ अर्थवादी आधारावर उभं राहिलं. गेली १० वर्षे भारतीय किसान युनियन पंजाबमध्ये शेतीमालाला रास्त भाव मिळावा म्हणून शांततामय चळवळ करीत आहे; राजकारणापासून अलिप्त. पण ही चळवळ सतत चेपली गेली. शेतकऱ्यांना तुरुंगात डांबण्यात आले, त्यांच्यावर हल्ले झाले. त्यांची परिस्थिती केरळातल्या मोपलांसारखी झाली. याचा फायदा घ्यायला नेमकी माणसं टपलेली होती. अकाल्यांनी फायदा उठवायचं ठरवलं आणि मग राजकारण्यांनी जो काय गोंधळ चालू दिला की शेतकरी प्रश्न बाजूला राहिला आणि सगळीकडे अत्याचाराचेच साम्राज्य तयार झाले. पुढे सुवर्णमंदिरात सैन्याकरवी हस्तक्षेप वगैरे सर्व गोष्टीनंतरही मूळ प्रश्न बाजूलाच ठेवून शासनाने शीख संमेलन भरवले. ट्रकांमधून माणसं जमा केली तरी ३०-३५ हजारांवर हजेरी भरली नाही. अकाल्यांनीही विश्वसंमेलन भरवलं तिथं पन्नाससाठ हजार माणसं जमली. ही संमेलन शासनानं होऊ दिली. पण दुसरीकडे शेतकरी संमेलनाला मात्र बंदी केली. तेवढ्यावर न थांबता १० सप्टेंबरला चंदीगडभोवती ५-१० किलोमीटरपर्यंत लष्करी जवानांचा पहारा ठेवण्यात आला होता. चंदीगडकडे जाणाऱ्या सर्व बसगाड्या बंद करण्यात आल्या होत्या. इतर कोणत्याही वाहनातून शेतकरी आणि शेतकऱ्यासारख्या दिसणाऱ्या प्रत्येक माणसास खाली उतरवून परतवून लावत होते. शासनाला भीती वाटली की हे संमेलन झाले तर साऱ्या जगाला कळून चुकेल की पंजाब हा राज्यकर्त्या पक्षांबरोबर नाही की अकाल्यांबरोबरही नाही. खरा पंजाब हा शीख शेतकऱ्यांचा पंजाब आहे आणि तो सगळ्यात जास्त ताकदीने शेतकऱ्यांच्या संघटनेमागे उभा आहे. शेतकऱ्यांची आंदोलने अत्यंत शिस्तीने आणि शांततामय मार्गाने चालू होती. कुठे काही गडबड गोंधळ नव्हता. धर्म, भाषा, असे क्षुद्रवाद नव्हते. ज्या पंजाबमध्ये हिंदुशीख दिवसाढवळ्या रस्त्यावर एकमेकाचे खून पाडत होते त्यावेळी एख लाख हिंदू शीख शेतकरी चंडीगडच्या राजभवनावर पिकेटिंग करीत सहा दिवस बसले होते. ही चळवळ पाहिल्यानंतर एक प्रसिद्ध पत्रकार श्री. स्वामीनाथन अय्यर यांनी असं म्हटलं की, 'पंजाब पेटला आहे असं म्हणतात, यावर माझा विश्वासच बसत नाही. पंजाबचा प्रश्न सोडवायचा असेल तर तो शेतकरी संघटनेकडे सोपवावा.' मी ही त्यावेळी म्हटले की, 'पंजाबच्या शेतकऱ्याला गव्हाला १९० रु. किंमत द्या. एकही शीख शेतकरी अकाल्यांच्या मागे जाणार नाही.' पण त्यांना १९० रु. म्हणजे फार महाग वाटले. त्यांनी १५१ चे १५२ केले. आज देश खरोखर त्याची किंमत मोजतो आहे. १९० रु. महाग वाटलेले हे लोक देशाच्या अंखडत्वाच्या संरक्षणाच्या नावाखाली कोट्यावधी रुपये खर्च करायला तयार झाले आहेत. यांच्या चुकीच्या धोरणांमुळे देशांत हजारो माणसे मरताहेत. अगदी ८२ साली झालेल्या एशियाडपासून शिखांना सरसकट जी अन्याय्य वागणूक देण्यात आली त्याने त्यांच्या मनात दुजाभाव निर्माण झाला. ज्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या राज्यातून जास्तीत जास्त हुतात्मे झाले, ज्या देशाच्या सीमांच्या रक्षणासाठी आपली घरे जळताना पाहावी लागली त्या देशात आपल्याला काही स्थान आहे की नाही याची जबरदस्त शंका सर्व शिखांच्या मनात निर्माण झाली आहे.

देशाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भयानक हत्येनंतर देशामध्ये ज्या काही दंगली घडल्या त्या पाहिल्यानंतर खुशवंतसिंगासारख्या बुद्धिमान शीखालासुद्धा लिहावेसे वाटते की, '१९४७ साली शिखांचं अशा तऱ्हेचं हत्याकांड होताना मी पाकिस्तानात पाहिलं होतं. आज हिंदुस्तानात पाहतो आहे. आमचा हा देश आहे का?'

आजपर्यंत शेतकरी संघटनेमध्ये मला जो अनुभव आला त्यावरून मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की या देशातील सामान्य माणसाच्या मनामध्ये कुठेही जातीयवाद नाही, भाषावाद नाही, धर्मवाद नाही. हे सर्व क्षुद्रवाद केवळ स्वार्थी राजकारण्यांनी जोपासून ठेवले आहेत. सर्वसामान्य माणसे अर्थवादाच्या पायावर आवाज उठवू लागली की ही मंडळी क्षुद्रवादाची भुतावळ उठवून त्यांना अर्थवादापासून दूर नेतात.

देशातली गरीबी हटली असती, देशाचा विकास होत राहिला असता तर यापैकी एकही भांडण झालं नसतं. आपल्या देशातलं एक राज्य म्हणतं की आम्हाला फूटून

जायचं आहे. अमेरिकेतलं एखादं संस्थान असं म्हणतं का? मुळीच नाही. तिथेसुद्धा अनेक धर्मांची, पंथांची माणसं आहेत; अनेक राज्यांची आहेत. पण तिथं असं कुणी म्हणत नाही. उलट, अमेरिकेतील संस्थान असणं ही प्रतिष्ठेची, सन्मानाची गोष्ट समजली जाते. अशी भावना आपल्याकडे निर्माणच होऊ शकली नाही. कारण आम्ही गरीबी हटवू शकलो नाही.

देश इंग्रजांच्या ताब्यात असताना आम्हाला सर्वांनी सांगितलं की इंग्रज देशाचं शोषण करतोय म्हणून आपण गरीब आहोत. १९४७ साली आपण इंग्रजाला देशातून हाकलून दिला. पण गेल्या ३७ वर्षात आपली गरीबी हटली नाही, उलट वाढतच राहिली. याचं कारण कुणीही राजकारणी सांगत नाही. फक्त निवडणुकीच्या वेळी म्हणतात, 'आजपर्यंत जमलं नाही यानंतर निश्चित हटवू'. विरोधी पक्षाचे, म्हणतात, 'यांना नाही जमलं पण आम्ही ते करून दाखवतो.'

प्रश्न असा सुटत नाही. देश स्वतंत्र झाला तरी गरीबी हटली नाही. उलट वाढली. याला कारण एकच, इंग्रज गेला तरी त्यांची शोषणाची नीती गेली नाही. कच्चा माल स्वस्तात स्वस्त घेऊन पक्का माल महागात महाग विकण्याचे धोरण कायम राहिले. या देशातली गरीबी हटली नाही याचं कारण एकच. देश स्वतंत्र झाला तरी गुलामगिरी संपली नाही. मालक तेवढा बदलला. गोऱ्या इंग्रजांच्या ठिकाणी काळा इंग्रज बसला. शेतकरी गुलामच राहिला.

शेतकरी संघटनेचा वसा घेतलेल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन गेली चार वर्षे मी हा विचार साऱ्या महाराष्ट्रभर, देशभर सांगत हिंडत आहे. आज देशातील अकरा राज्यांतील शेतकऱ्यांनी हा विचार आत्मसात केला आहे. शेवटी, शेतकरी म्हणजे देश आहे. शेतीवर काम करणाऱ्या आणि शेतीवरच अवलंबून असणाऱ्या ८० टक्क्याहून अधिक माणसांना लुटून खाण्याचे कारस्थान केवळ ५ ते १० टक्के लोक करताहेत. म्हणून देश गरीब आहे. आता केवळ गरीबीनं भागत नाही, तर देश पुन्हा एकदा तुटायला आला आहे. कारण तेच, शोषणावर अधिष्ठान असलेली आर्थिक नीती.

परभणीच्या अधिवेशनात शेतकरी संघटनेने १९८४ हे शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यवर्ष म्हणून जाहिर केलं होतं. १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं असं वाटलं पण मिळालं नाही, ते यावर्षी आम्ही मिळवू असं वाटलं. त्या दृष्टीने सर्व तयारी चालू होती. देशातल्या ११ राज्यांतील मिळून जवळजवळ ४० लाख शेतकरी सत्याग्रह करून तुरुंगात पाठविण्याची तयारी झाली होती. पश्चिम महाराष्ट्र प्रचारफेरी, गुजरातेतून निघालेल्या बार्डोली ते सुरत आणि बार्डोली ते टेहरे (नाशिक) या प्रचारयात्रांनी प्रचंड जागृती केली. ३१ ऑक्टोबरला सबंध हिंदुस्तानभरच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा कार्यक्रम जाहिर करावयाचा होता. देशभरचे कार्यकर्ते टेहेऱ्याला आले होते.

पण परमेश्वराच्या मनात काय आलं कुणास ठाऊक? कदाचित् सर्व शेतकऱ्यांचे हाल संपविण्याच्या आधी आणखी एकदा शेतकऱ्यांची परीक्षा घेण्याची इच्छा असावी. टेहेऱ्याचा मेळावा सुरू होता होता इंदिरा गांधींवरील खुनी हल्ल्याची बातमी आली. या हल्ल्यातून त्या वाचू शकल्या नाहीत. मेळावा संपल्यानंतर तासाभराने त्यांच्या निधनाचे वृत्त प्रसिद्ध झाले. आम्ही पुढच्या तीन दिवसांचे साखर कारखाना निवडणुकांच्या प्रचाराचे कार्यक्रम रद्द केले. देशात इतकी भयानक घटना घडली असताना निवडणूक प्रचाराला लागण्याची आमची इच्छा नाही, सगळ्या कारखान्यात पराभव झाला तरी चालेली ही शेतकरी संघटनेची भूमिका आहे.

पुढे १ ते ४ नोव्हेंबर देशात ज्या काही भयानक दुर्दैवी घटना घडल्या त्याचे परिणाम काय होताहेत पहायचे आहे. पण इंग्रजांनी घालून दिलेलं आर्थिक धोरण त्वरीत बदलण्याची तयारी आपल्या राज्यकर्त्यांनी केली नाही तर हा देश दोन वर्षांच्या आत बुडणार आहे, फुटणार आहे हे निश्चित. हे कितीही अतिशयोक्त वाटत असलं तरी गेल्या पाच वर्षातील देशातील घडामोडी पाहिल्या की यात काही असंभव वाटत नाही आणि यातून निश्चित वाट काढायची असेल तर शेतीमालाचे शोषण थांबविणे हाच एक उपाय आहे.

पण या देशात या आर्थिक प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याचेच धोरण सर्व राजकारण्यांनी ठेवले आहे. अशा स्थितीत लोकसभेच्या निवडणुका पुढे येऊन ठाकल्या आहेत. राज्यकर्त्या पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात 'देश वाचवा'ची हाकाटी केली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या निवडणुकीत त्यांची घोषणा होती 'लोकशाही मजबूत करा' तर ५७ च्या निवडणुकीत 'वैभवशाली देशा'ची. दहा वर्षे आपण वैभवाची वाट पाहिली आणि त्यानंतरच्या निवडणुकीत ते एक पाऊल खाली उतरून वैभव नाही तर नाही, निदान 'गरिबी हटवा' म्हणाले. तेही जमलं नाही तेव्हा आम्ही 'काम करणारं सरकार देऊ' म्हणाले आणि आता हतबल होऊन ते म्हणू लागले आहेत 'देश वाचवा!'

फक्त आर्थिक धोरणात बदल नाही. हा बदल झाला नाही तर देशाचा विनाश अटळ आहे.

नवीन पंतप्रधानांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्याबरोबर जे धोरण जाहिर केलं ते काही जुन्या धोरणांपेक्षा वेगळं नाही. त्यात गरीबीबद्दल जरासुद्धा खंत नाही. उलट, इलेक्ट्रॉनिक उत्पादनांवरील कर रद्द करण्यासारखे निर्णय घेतले. आजचं राजकारण आहे त्याच गतीनं चालू राहिलं तर तुमच्या पुढच्या आंदोलनाच्या वेळी इंग्रजांइतकीसुद्धा सभ्यता असणारं सरकार असणार नाही. सविनय कायदेभंगाचं आंदोलनसुद्धा हे सरकार चालू देणार नाही.

तेव्हा पुढच्या आंदोलनाच्या दृष्टीने पूर्वतयारी करणं आवश्यक आहे. निवडणुकीमध्ये शेतकरी संघटनेला काही स्वारस्य नाही पण आंदोलन प्रभावी करण्यासाठी ते एक महत्त्वाचे साधन आहे. गेल्या ३७ वर्षांत देश गरीब होत गेला याचं कारण सांगण्याची आवश्यकता पडू नये म्हणून डोळ्यातून अश्रू ढाळणाऱ्या राज्यकर्त्या पक्षाला जर मतांचे गठ्ठे मिळाले आणि त्यांची पाच वर्षांची सत्ता पक्की झाली तर पाच वर्षात शेतीमालाच्या भावाचं आंदोलन करणं शक्य नाही. कारण ते म्हणतील, 'तुम्ही काय सांगताय? सगळीकडे भरघोस मतांनी

शेतकऱ्यांनी आम्हाला निवडून दिले आहे. तुम्हाला विचारतो कोण?' सत्याग्रह होऊ शकत नाही, आंदोलन होऊ शकत नाही. राज्यकर्त्यापक्षाला जर पुन्हा ३/४ किंवा २/३ बहुमत मिळालं तर तुमचे आंदोलन स्टेनगनच्या गोळ्यांनी चिरडून टाकण्यात येईल.

या सत्तेच्या ताकदीला आळा घालण्यासाठी शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने आपल्या २२ नोव्हेंबरच्या बैठकीत निर्णय घेऊन काँग्रेस (आय) पक्षाच्या उमेदवारांना एकाही शेतकऱ्याने मत देऊ नये असे आवाहन केले आहे. विरोधी मतांतील फाटाफूटीचा फायदा आजपर्यंत त्यांना मिळत आला आहे. ही फाटाफूट टाळावी म्हणून संघटनेने विरोधी उमेदवारांची मतदारसंघास एक याप्रमाणे यादी जाहिर केली असून सर्व शेतकऱ्यांनी आणि इतर नागरिकांनीसुद्धा याच उमेदवारांना मते द्यावीत असे आवाहन केले आहे. 'गावबंदी'चा कार्यक्रम मात्र सर्वच पुढाऱ्यांना लागू राहाणार आहे.

संघटनेच्या या निर्णयात काहीही पक्षीय संबंध नाही. शेतकऱ्याच्या दृष्टीने सर्व राजकारणी सारखेच चोर आहेत. पण आज छातीवर बसलेल्या चोराला दुसऱ्या चोराच्या मदतीने दूर करण्याचा हा प्रयत्न आहे. दुसरा चोर छातीवर बसण्याआधी सावधपणे उठता येते का पहावयाचे आहे. निवडणुकीच्या काळात संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संघटनेच्या सभा घेऊन ही भूमिका शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली तर हे साध्य होणार आहे निश्चित. संघटनेचा राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांना गावबंदी हा कार्यक्रम या काळातही चालू राहणार आहे, त्यामुळे कार्यकर्त्यांनी उमेदवारांबरोबर फिरून त्यांच्या व्यासपीठावरून प्रचार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

देशाचा विनाशाकडे होणारा प्रवास थांबवायचा असेल तर संघटनेच्या ह्या आवाहनास प्रतिसाद मिळणे ही प्राथमिक गरज आहे.

●

(पान ६ वरून)

केवळ शेतकऱ्यांच्या उसाला भाव मिळवून देण्याकरता प्रतिज्ञाबद्ध असलेले असे पॅनेल उभे करता येत असेल तर संघटनेनेही या निवडणुकांत उतरावयास काही हरकत नाही. महाराष्ट्रातील सत्तरएक कारखान्यांपैकी बहुतेक कारखान्यात अशा तऱ्हेचे पॅनेल उभे करण्यातही शेतकरी संघटनेशी अशा तऱ्हेचे पॅनेल उभे करण्याइतकी शेतकरी संघटनेशी ताकद नाही आणि कार्यकर्त्यांची हिंमतही नाही. पण दहाबारा कारखान्यांत अशा तऱ्हेचे वैशिष्ट्यपूर्ण संघटना पॅनेल उभे करता येईल. या कारखान्यांत असा प्रयत्न अवश्य करावा. हरलो, जिंकलो याला काही महत्त्व नाही. त्या निमित्ताने उसाच्या भावाच्या प्रश्नाचा जबरदस्त प्रचार तरी होऊन जाईल. इतर कारखान्यातील निवडणुकांकडे संघटनेने लक्षही देऊ नये, तेथे कोणीही टग्या निवडून आला तरी आपल्याला त्याच्याशी लढावेच लागणार आहे.

### संचालक मंडळ - आघाडीचे सत्याग्रही

१९८४-८५ सालच्या गळीत हंगामात उसाचे आंदोलन पुन्हा एकदा उभे करावे लागणार हे निश्चित आहे. पंजाब, हरियाणातील गहूआंदोलन १ मे रोजी चालू होत आहे. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्य वर्षातील निर्णायक लढा पुन्हा एकदा महाराष्ट्रातील शेतकऱ्याला ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये द्यावा लागेल आणि ऊसउत्पादक शेतकऱ्याला त्यात प्रमुख भूमिका घ्यावी लागेल हे उघड दिसत आहे. या आगामी लढ्याची तयारी म्हणून कारखान्यांच्या निवडणुकांकडे संघटनेने पाहिले पाहिजे.

गेल्या आंदोलनात संचालक मंडळे आंदोलनात उतरली नाहीत. यावेळी काही कारखान्यांची संचालक मंडळे बिनीचे सत्याग्रही म्हणून उतरतील तर आंदोलनाला एक वेगळेच स्वरूप येऊ शकेल.

या दृष्टीने ज्या ज्या कारखान्यात संघटनेचे सत्याग्रही पॅनेल उभे करता येईल तेथे तेथे ते करावे. अशा पॅनेलच्या प्रचारासाठी संघटनेच्या नेत्यांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. पॅनेल यशस्वी झाले तर त्यांच्या कामाची जबाबदारी संघटनेवर राहील. संघटनेचे संचालक मंडळ इतर मंडळांसारखेच वागले तर वचने पुरी न करणाऱ्या, गैरकारभार करणाऱ्या संचालक मंडळावर कार्यवाही करण्याची जबाबदारी संघटना घेईल.

संघटनेचे पॅनेल असावे कसे? चिखलफेकीच्या गलिच्छ इतिहासांतून दूर पडण्यासाठी पहिली अट म्हणजे पॅनेलचे सर्व सदस्य पूर्वी संचालक मंडळावर काम केलेले नसावेत. या एकाच उपायाने आपण पॅनेलला स्वच्छ रूप देऊ शकू. जुन्या संचालकांपैकी स्वच्छ कोण आणि कोण नाही याची चर्चा करत बसावयाचे म्हटले तर त्याला अंत नाही आणि अर्थही नाही. तेव्हा पूर्वी संचालक असलेल्या सर्वांनाच दूर करावे हा सर्वात सोपा उपाय.

यामुळे अर्थात काही प्रामाणिक, सचोटीच्या जुन्या संचालकांना बाजूला रहावे लागणार आहे. पण संघटनेच्या निष्ठावान कार्यकर्त्यांत एवढी त्यागाची आणि शिस्तीची भावना असली पाहिजे. संचालक मंडळाच्या बाहेर राहूनही आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा ते तरूण संचालक मंडळाला देऊ शकतील.

सर्व नवे सदस्य असले तर त्यांना काम करणे कठीण जाईल ही कल्पना सर्वस्वी चूक आहे. संचालक मंडळाचे काम अधिकारी वर्गाकडून काम करून घेणे हे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या उसाला भाव मिळवून देण्याची कळकळ ही महत्त्वाची आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पॅनेलचा निश्चित कार्यक्रम असला पाहिजे. या कार्यक्रमाच्या अधारावरच निवडणूक लढवली गेली पाहिजे. परभणीच्या अधिवेशनात संघटनेच्या साखर कारखान्यांच्या निवडणुकीचा जाहीरनामा घोषित करण्यात आला होता.

या आधारावर आता कार्यकर्त्यांनी कारखान्याच्या निवडणुकांच्या तयारीस लागावे, ताकदवान पॅनेल उभी करावीत. संघटनेकडून ती मंजूर करून घ्यावीत. कार्यक्रम ठरवावेत. ऊसआंदोलनांची सुरुवात कारखान्यांतील निवडणुक आंदोलनाने होत आहे.

●

# निवडणूक आणि शेतकरी आंदोलनाचे तंत्र

निवडणुक हे आंदोलन आणि संघटना प्रभावी करण्याचं साधन असू शकतं हे मी गेल्या चार वर्षात अनेकदा मांडलं आहे. सत्तेच्या खुर्चीवर जाण्यात संघटनेला काहीही स्वारस्य नाही. निवडणुकीतून मिळणारी सत्ता ही चालू व्यवस्थेच्या आतली सत्ता असते आणि व्यवस्थेच्या आतल्या मार्गानं मिळणारी सत्ता ही व्यवस्थापरिवर्तनाची असू शकत नाही; तर फार तर त्या व्यवस्थेत खीळ घालणारी असू शकते. या व्यवस्थांतर्गत निवडणुकीच्या मार्गाने जी मंडळी तुम्हाला खुर्चीपर्यंत चढू देतात ती खुर्ची गेल्यावर तुम्ही प्रभावी राहाणार नाहीत याचीसुद्धा काळजी घेतात. आजची व्यवस्था ही शेतीच्या शोषणावर उभी राहिलेली व्यवस्था आहे. शेतीचे शोषण थांबायला हवे असेल तर ही व्यवस्था बदलली पाहिजे. म्हणूनच शेतकरी संघटनेला निवडणुकीतून येणाऱ्या सत्तेत स्वारस्य नाही.

निवडणुकीने मिळणाऱ्या खुर्चीवर कुणीही बसलं तरी आजच्या व्यवस्थेत शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणं अशक्य आहे. आज शेतकऱ्यांची बाजू कोणीही मांडत नाही. आपल्याला शेतकऱ्यांची, शेतकरी संघटनेची ताकद अशी निर्माण करायची आहे की खुर्चीवर कुणीही बसो त्यांना शेतकऱ्यांची मागणी लाथाडणे अशक्य व्हावे. निवडणुकीने येणारी सत्ता आपल्या उपयोगाची नाही पण आपल्याला ज्यांच्या विरूद्ध लढा द्यावयाचा आहे त्यांचं मर्मस्थान कुठंतरी या निवडणुकांतच गुंतलेलं असतं. हे लक्षात घेऊन त्यांचा वापर करून आंदोलन प्रभावी करणे हे धोरण आपण सटाण्याच्या पहिल्या अधिवेशनापासूनच ठरविलेलं आहे.

त्या दृष्टीने निवडणुकीत घ्यावयाची भूमिका ठरवावी लागेल. त्यासाठी आधी आपण आंदोलन काय करणार, आंदोलनाची दिशा काय ठरवणार आहोत, अल्पमुदतीचे आंदोलन असेल तर त्याचे स्वरूप काय असेल आणि दीर्घ मुदतीचं असल्यास त्याचे स्वरूप काय असेल याचा सांगोपांग विचार करावा लागेल. हा आराखडा तयार झाला म्हणजे मग निवडणुकीसंबंधी धोरण आखता येईल. तुम्ही जर आंदोलन करणार नसाल आणि संघटनेची ताकदही वाढवणार नसाल तर या निवडणुकीच्या फंदात पडण्यात धोका आहे. काही विचाराने जर निर्णय घेतला नाही तर तुम्ही याला पाठिंबा द्या की त्याला, कितीही चतुरपणाचा आव आणा हा निवडणुकसहभागाचा भस्मासूर चार वर्षात उभ्या राहिलेल्या संघटनेची राख करून टाकील. आंदोलनाची आघाडी मजबूत असेल तर त्यात निवडणूकविषयक लहानसा थोडा डोस चालून जाईल. पण छोट्याशा आंदोलनासाठी हा निवडणूकविषयक मोठा डोस म्हणजे संघटनेच्या दृष्टीने वीष आहे. हे शेतकरी संघटनेला, शेतकरी आंदोलनाला खतम केल्याशिवाय राहाणार नाही.

तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की आंदोलनाचं स्वरूप काय असावं? आजच्या परिस्थितीत दीर्घदृष्टीचं आंदोलन या देशामध्ये शक्य आहे असे मला वाटत नाही. आपल्याला आपलं आंदोलन एखाद्या दुर्गम कड्यावर चढणाऱ्या माणसाप्रमाणं, तो जसा दोन हात आणि दोन पायांपैकी तीन अवयव पहाडावर घट्ट रोवून चौथ्याने कुठे आणखी वर पकडण्यासारखी जागा आहे का चाचपत असतो त्याप्रमाणं आखावं लागेल. गवसलेली पक्की जागा सोडून दिली तर खाली पडून कपाळमोक्ष होण्याची शक्यता जास्त असते. तेव्हा यापेक्षा जास्त दीर्घदृष्टी ठेवणे आजच्या परिस्थितीत शक्य नाही.

जोपर्यंत या देशातील गरीबी हटत नाही तोपर्यंत हा देश बुडत जाणार आहे आणि जोपर्यंत शेतकऱ्यांवर, शेतमजुरांवर अन्याय होतो आहे तोपर्यंत या देशातील गरीबी हटू शकत नाही. तेव्हा, जर शेतकरी संघटनेचा विचार मान्य झाला नाही तर हा देश बुडणार आहे हा आपला सैद्धांतिक पाया आहे. या पलिकडचे रणक्षेत्र आपल्याला दिसत नसल्यामुळे निर्णय घेताना त्याचा विचार करण्यात काही अर्थ नाही. आज आपल्या देशात पाच वर्षांनी काय होऊ शकतं असा विचार करून रणनीती ठरविण्यासारखी परिस्थिती नाही. कारण आठ दिवसांनी काय होऊ शकेल हेसुद्धा कुणाला सांगता येणार नाही.

तरीसुद्धा निर्णय घेताना लोकांच्या मानसिकतेचाही विचार करायला हवा. केंद्रात नुकतेच एक तरूण उमदे नेतृत्व सत्तेवर आले आहे. त्याला संधी द्याची अशी एक लोकभावना असू शकते हेही आपण विसरता कामा नये. पण शेतकरी संघटनेसारख्या संघटनेच्या अधिवेशनाला येणाऱ्या लोकांवर होणारी दडपशाही त्याला कळत नसेल तर ते अकार्यक्षम आहे आणि कळत असेल तर निर्दयी आहे असे म्हणावे लागेल. शेतकरी संघटनेचे निवडणूकविषयक धोरण आखतांना या निवडणुकीचे निकाल काय काय असू शकतील, पर्यायी निकालांचा संघटनेवर कसा कसा परिणाम होऊ शकेल या सर्वांचा विचार करावा लागेल.

यानंतर काही सैद्धांतिक गोष्टींचाही विचार करायला हवा. मी काही लहानपणापासून आंदोलनात उतरलेला माणूस नाही; मी माझं अर्धं वय उलटून गेल्यानंतर आंदोलनात पडलो आहे. त्यामुळे कदाचित् सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर आंदोलने चालविणाऱ्या इतर मंडळीपेक्षा माझा विचार रणनीतीच्या बाबतीत वेगळा ठरत असेल. अन्याय झाला की लगेच आंदोलन केलंच पाहिजे हे काही बरोबर नाही. अन्याय होतो पण त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याची ताकद नसते तेव्हा तो अन्याय सहन करायचा असतो; तो संताप, तो क्रोध, ती चीड गिळून घ्यायची असते. तो सगळा संताप, क्रोध, चीड, ज्यावेळी टोला मारण्याची आपल्यात ताकद निर्माण होईल त्याचवेळी वापरायाची असते. शिवाजी महाराजांनी हीच रणनीती

(पान १६ वर)

**विधानसभा निवडणूक १९८५**
**भूमिकेची प्रस्तावना**
**शेतकरी संघटक, २२ फेब्रुवारी १९८५**

# सर्वात प्रभावी विजयी उमेदवार
# शेतीमालाचा भाव

*(शेतकरी संघटनेच्या धुळे येथे संपन्न झालेल्या अधिवेशनानंतर झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत विधानसभा निवडणुकीत संघटनेने घ्यावयाची भूमिका निश्चित करण्यात आली. त्यानंतर ही भूमिका शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी श्री. शरद जोशी यांनी महाराष्ट्राचा व्यापक दौरा केला. या दौऱ्यातील सभांमध्ये काही ठिकाणी पुलोदचे उमेदवारही हजर राहिले. त्यांनी शेतकरी संघटनेची प्रतिज्ञा घेऊन आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विधानसभेत प्रयत्नशील राहाण्यासाठी वचनबद्ध राहाण्याचे जाहिर केले. या संपूर्ण दौऱ्यात श्री. शरद जोशींशी जे विचार मांडले त्यांचे हे संकलन श्री. राजेंद्र बसर्गेकर यांनी केले आहे.)*

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वात प्रभावी उमेदवार**

या विधानसभा निवडणुकांमध्ये कोणत्याही पक्षाला यश मिळो, एक गोष्ट निश्चित की या निवडणुकीत विजयी ठरलेला सर्वात प्रभावी उमेदवार शेतीमालाचा भाव हा आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावरच, सर्व देशभर इंदिरापक्षाच्या बाजूने भरघोस मतदान झाले असताना महाराष्ट्रात मतांचे प्रमाण दोन टक्क्यांनी घटले व विदर्भात दहा टक्क्यांनी घटले. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेने विरोधी पक्षांना एक आघाडी, एक नेता व एक कार्यक्रम अशा धर्तीवर युती करण्याचे आवाहन केले आणि अभिनंदनीय गोष्ट अशी की विरोधी पक्षांना जे गेल्या पाच वर्षात जमलं नव्हतं ते आठ दिवसात त्यांनी घडवून आणलं. एक आघाडी – नाव पुरोगामी लोकशाही दल, एक नेता - शरद पवार, एक कार्यक्रम- पंधरा कलमी कार्यक्रम आणि त्यातले पहिले कलम शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव आणि महाराष्ट्रात या आघाडीच्या मागं शेतकरी हातात रुमणं घेऊन उभा राहिला आहे अशा तारावर तारा पंतप्रधान राजीव गांधींच्या कॉम्प्युटरवर जाऊन थडकू लागल्या आणि दि. २० फेब्रुवारीपासून खुद्द पंतप्रधानांनी शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव देण्यासंबंधी घोषणा करायला सुरुवात केली.

**शेतीमालाचा भाव – एकमेव कलम**

शेतीमालाचा भाव हे एकच कलम, तेच शेतकऱ्याचे परब्रह्म, तेच देशाचे सर्वस्व असे शेतकरी संघटनेचे धोरण राहिले आहे. सत्तावीस नक्षत्रातील फक्त नऊ पावसाची म्हणून २७ उणे नऊ बरोबर शून्य या प्रमाणेच शेतीमालाचा भाव हे कलम नसेल तर बाकी भाराभर कलमांचा काही उपयोग नाही. फक्त या कलमावरच निवडणुकीत लक्ष एकवटले पाहिजे. बाकी सर्व घोषणा, बाकी सर्व आश्वासनं, बाकी सर्व कार्यक्रम हे या कलमावरून लक्ष विचलित करण्यासाठी निवडणुकीस वापरले जातात आणि शेतकऱ्यांचे लक्ष विचलित झाले की शेतीमालाच्या भावाचा प्रश्न खाली दडपला जातो.

**देशाचे अखंडत्व?**

सत्तारूढ पक्ष व पंतप्रधान असे लक्ष विचलित करण्यात पटाईत आहेत. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी माजी पंतप्रधानांच्या मृत्यूनंतर देशाला धोका आहे, देश वाचवा अशा घोषणा करण्यात आल्या. १९६२ च्या चीनच्या आणि १९६५ च्या पाकिस्तानच्या आक्रमणाच्या वेळी त्या वेळच्या पंतप्रधानांनी 'देश वाचवा' अशा घोषणा केल्या आणि सर्व लोक पोटातली भूक विसरून, आपले दैन्य, दारिद्य विसरून देशाच्या मदतीला धावून गेले. यावेळच्या 'देश वाचवा' या घोषणेनेही सर्व लोक धावून गेले व सत्तारूढ पक्षाला भरघोस मतदान केले. लोकसभा निवडणुकीनंतर खरंच सहा आठवड्यात देश बुडायचा थांबला का, देशाच्या अखंडत्वाचा धोका संपला का ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. जातिभेद व धर्मभेदाच्या भावनेतून देशाला धोका असेल तर ते भेद नष्ट करायचा खरोखर प्रयत्न होतो आहे? शहादा येथील राजीव गांधींच्या सभेच्या वेळी सहा निरपराध, वीस वर्षे या भागात कामधंद्यासाठी रहात असलेल्या शीखांना पोलीसचौकीत डांबून ठेवण्यात आले. अशा प्रकारांनी हे भेद संपणार आहेत का?

**विधानसभा निवडणूक १९८५**
**भूमिकेचे विश्लेषण**
**शेतकरी संघटक, १५ मार्च १९८५**

**खुळखुळेच खुळखुळे**

लोकसभेच्या वेळी 'देश वाचवा' या घोषणेने लोकांचे पोटाच्या प्रश्नावरचे लक्ष उडविले. विधानसभा निवडणुकीच्या वेळी तर तऱ्हेतऱ्हेचे प्रकार सत्तारूढ पक्षानी वापरले. पहिलं म्हणजे गुप्तहेर प्रकरण. अनेक महत्त्वाच्या मंत्र्यांच्या खुर्चीखाली हे गुप्तहेर आरामात वावरत होते. हे प्रकरण खरे असेल तर एकच सिद्ध होते की सत्तारूढ पक्षाचे सरकार इतके दिवस अत्यंत अकार्यक्षम होते. या सर्व प्रकरणाची पूर्ण न्यायालयीन चौकशी करावी आणि या प्रकरणात कोणी मंत्रीही संबंधित आहेत का याचीही पूर्ण शहानिशा करावी. या प्रकरणाची दुसरी बाजू अशी की

दिल्लीतील अनेक पत्रकार मंडळी म्हणू लागली आहेत की या प्रकरणात काही अर्थ नाही, केवळ बनाव आहे; म्हणजे, थोडक्यात लोकांचे लक्ष विचलित करायचा नवीन खुळखुळा आहे.

दुसरे प्रकरण म्हणजे स्वच्छ प्रशासनाची आणि भ्रष्टाचार हटण्याची घोषणा. याचाही अर्थ असा की सध्या प्रशासन अस्वच्छ आहे आणि भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि हे सर्व सत्तारूढ पक्षाचेच सरकार असतानाच झाले आहे. भ्रष्टाचार दूर करण्याचा एक उपाय म्हणून घोषणा झाली की या विधानसभा निवडणुकात इंदिरा पक्ष भ्रष्ट उमेदवारांना तिकिटे देणार नाही. असं खरंच करायचं असतं तर इंदिरा पक्षाला निवडणुकच लढवता आली नसती. त्यातल्या त्यात सफाई करायची म्हणून इंदिरा पक्षाने डॉ. बळीराम हिरे, शिवाजी पाटील निलंगेकर, प्रतिभा पाटील आणि बोराडे यांना तिकीटे नाकारली. याचा हेतू हा की येवढ्या मोठ्यामोठ्यांना लोळवणारा पंतप्रधान आपल्या पोटापाण्याच्या प्रश्नाचंही काहीतरी करेल; पण शेतकऱ्यांचं लक्ष शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावरून उडेल. पण या सर्वांना तिकीटे नाकारली तरी इंदिरा पक्षाने त्यांच्या घरात तिकीटे दिली आहेत. डॉ. बळीराम हिऱ्यांच्या पत्नीला, शिवाजी पाटील निलंगेकरांच्या मुलाला, प्रतिभा पाटलांच्या पतीला, बोराड्यांच्या मेव्हण्याला आणि जावयाला अशी दोन तिकीटे दिली आहेत. यातून भ्रष्टाचार समूळ नष्ट होणार नाही. झाडाची जशी वरवरची छाटणी केल्यावर अजून जोमाने फूट होते तसा भ्रष्टाचार अजून जोमाने वाढेल. त्याचबरोबर लक्ष वेधून घ्यायचा अजून एक झगमगीत उपाय इंदिरापक्षाने वापरला. निरनिराळ्या सिनेमानटांनी गावोगाव जाऊन इंदिरापक्षाचा प्रचार केला. लातूरमध्ये मिथून चक्रवर्तीनी सांगितलं की लातूरच्या उमेदवाराला, विलासराव देशमुखांना निवडून द्या. मी लातूरला 'डिस्को डान्सचा' फुकट कार्यक्रम करेन. मुंबईत मिळकत-कराच्या थकबाकी वसुलीसाठी ज्या धाडी पडल्या त्यातून हे प्रचार करणारे नट वाचले. हा काही केवळ योगायोग आहे का? लोकांचे लक्ष विचलित करायचा अजून एक उपाय म्हणजे पक्षांतर बंदीविधेयक, त्यावरच्या चर्चा वगैरे. हे विधेयक आता ८०% खासदारांचं घट्ट बहुमत लोकसभेत आल्यावर येत आहे. परंतु गेल्या अनेक वर्षांत पक्षांतर घडवून अनेक सरकारे पाडणे आणि एका राजकीय भ्रष्टाचाराची निर्मिती करणे हे काम तर जास्तीत जास्त सध्याच्या पंतप्रधानांच्या मातोश्रींनी केले होते.

येवढ्या सगळ्या खुळखुळ्यांनीही ,हातात रूमणं घेऊन 'पुलोद'च्या पाठीशी खंबीरपणे उभे असलेल्या शेतकऱ्याचं लक्ष विचलित होत नाही हे पाहिल्यावर दि. २० फेब्रुवारीपासून राजीव गांधींनी शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावर तोंड उघडलं आणि मग त्यांनी आपल्या पक्षाच्या हातात असलेल्या राज्यातच शेतीमालाला भाव मिळतो इथपासून आम्ही राज्यात सत्तारूढ झालो तर शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सोडवू इथपर्यंत विधाने करण्याचा सपाटा लावला.

## पंतप्रधानांचा कबुलीजबाब

पण हाही खुळखुळा कदाचित् कमी पडेल असे वाटल्याने त्यांनी २३ फेब्रुवारीला एक घोषणा करून टाकली. १६ नोव्हेंबर १९८३ पासून शेतकरी संघटना मागणी करीत आहे की कृषिमूल्य अयोग रद्द करून त्याजागी कृषि उत्पादनखर्च आयोग नेमावा. त्याचे स्वरूप कसे असावे हेसुद्धा संघटनेने मांडले आहे. आजपर्यंत या मागणीसंबंधी काही उत्तर शासनाकडून आले नाही. पण २३ फेब्रुवारीला सायंकाळी शासनाने अचानक घोषणा केली की, 'कृषिमूल्य आयोगाचे पुनर्नामांकन कृषि खर्च आणि मूल्य आयोग असे करण्यात येत आहे.' नाव बदललं पण या आयोगाचं काम बदललं की नाही हे कळायला मार्ग नाही. कारण त्याचा तपशील अजून ठरायचा आहे. म्हणे मग इतक्या घाईने घोषणा करण्याची गरज काय? या घोषणेनंतर लखनौमधील एका जाहिर सभेत पंतप्रधान म्हणाले, 'यापुढे हा आयोग शेतीमालाच्या उत्पादनखर्चात विजेचा खर्च आणि पाण्याचा खर्चही धरेल' आजपर्यंत हे खर्च हिशोबात धरले जात नव्हते याचा हा सरळसरळ कबुली जबाब आहे. तीन वर्षांपूर्वी त्यावेळचे कृषिमंत्री श्री. राव वीरेंद्रसिंगांनी कारभाऱ्याचा खर्च, औत अवजाराच्या दुरुस्तीचा खर्च, वाहतुकीचा खर्च इत्यादिबाबत असाच कबुलीजबाब दिला होता. हे कबुलीजबाब एकदोन माणसांचा खून करणाऱ्या खुन्याच्या कबुलीजबाबापेक्षा भयानक आहेत. कृषिमूल्य आयोग तयार झाल्यापासून गेल्या वीस वर्षांतील त्याच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे जे जे शेतकरी आपली घरेदारे सोडून आपले आपले संसार मोडून देशोधडीला लागले, ज्यांना दुष्काळी कामांवर खडी फोडून आपले हात रक्तबंबाळ करून घ्यावे लागले, ज्यांना जगण्याकरिता शहरात जाऊन नरकप्राय वस्त्यांत राहावे लागले या सर्वांच्या या स्थितीस हा कृषिमूल्य आयोग आणि त्यावर प्रमुख असणारे पंतप्रधान, कृषिमंत्री हे सर्वच जबाबदार आहेत. पंतप्रधानांनी निवडणूक प्रचार सभेत का होईना कबुलीजबाब दिला आहे. त्यांना आपल्या पूर्वजांनी केलेल्या पापाचे क्षालन खरोखरी करायचे असेल तर त्यांनी खरा प्रश्न समजून घेतला पाहिजे. केवळ घोषणा करून निवडणुकीच्या गंगेत बुचकळी मारून पापक्षालन होईल असे समजून चालू नये.

## घोषणाबाजी नको प्रश्न समजून घ्या

केवळ निवडणुकीत मतं मिळवायची घोषणा म्हणून राजीव गांधी शेतीमालाला भाव देण्यासंबंधी बोलत नसतील तर त्या मागणीचे व्यापक स्वरूप त्यांनी लक्षात घ्यावं. गेली ३७ वर्षे शेतकऱ्यांची पद्धतशीरपणे लूट करून कारखानदारी आणि भांडवलाची निर्मिती करण्याची नीती सत्तारूढ पक्षाची होती. १९६० साली या देशाचं शेतीतून तयार होणारं उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ६० टक्के होतं आणि त्यावर देशाची ७५% जनता जगत होती. आज एकूण शेतीचं उत्पादन खूप वाढूनही हे उत्पन्न देशाच्या एकूण उत्पन्नाच्या ३३% झालं आहे आणि त्यावर जगणारी जनता ७१%च राहिली आहे. आणि दुसरी महत्त्वाची आकडेवारी ही की १९७० साली किंमतींचा निर्देशांक जर १०० धरला तर आज तो सरासरी ३४० आहे. कारखान्यात तयार होणाऱ्या काही वस्तूंचा निर्देशांक ५८० च्या वर आहे आणि

अन्नधान्याचा मात्र २९० आहे. म्हणजे शेतीचं क्षेत्र किंमतीच्या बाबतीत सतत मागे हटत राहिलं आहे. १९७० च्या ज्वारी इत्यादीच्या किंमती आणि आजच्या किमतींची तुलना केली तर २९० हा आकडाही जास्त फुगवलेलाच वाटतो. पण अगदी सरकारी आकडेवारीनं जरी पाहिलं तरी या दोन महत्त्वाच्या गोष्टींनी हे सिद्ध होतं की सर्व देशाची संपत्ती शहरात एकवटते आहे आणि खेडी ही इंग्रजांच्या राजवटीत असतानासारखीच नाडली जात आहेत. हेच धोरण सत्तारूढ पक्षाने आजवर ३७ वर्षे वापरले आहे. शेतीमालाला भाव मिळू नये म्हणून तुटवडा असेल तेव्हा लेव्ही, मुबलकता असेल तेव्हा लिलाव, तालुका बंदी, जिल्हाबंदी, राज्यबंदी, निर्यातबंदी, गरज नसताना चढ्या भावाने भरमसाठ आयात हे सर्व प्रकार वापरून शेतकऱ्याला नाडवले आहे. देशातील ३/४ लोकांचा व्यवसाय कायम तोट्यात ठेवला आहे. याचा परिणाम म्हणून गावचं नेतृत्व सार्वजनिक मालमत्तेवर हात मारणाऱ्या, गावातील गुंडांकडे गेलं आहे आणि शहरातील नेतृत्व हे हातभट्टीवाल्या, स्मगलिंग करणाऱ्या, कन्स्ट्रक्शन रॅकेट आणि असले मोठे उपद्‌व्याप करणाऱ्या दादांच्या हाती गेलं आहे. ज्या भ्रष्टाचारामुळे निवडणुकीत एका उमेदवारास पन्नास पन्नास लाख रुपये खर्च करता येतात तो भ्रष्टाचार, ती समांतर अर्थव्यवस्था ही शेतकऱ्याला नाडून औद्योगिकरण व भांडवल तयार करायच्या नीतीतून निघाली आहे. शेतीमालाला रास्त भाव मिळविण्याच्या एका मागणीमध्ये ही सर्व व्यवस्था उलटीपालटी करण्याची ताकद आहे; त्याचबरोबर, सबंध देशाच्या समतोल विकासाचं अर्थशास्त्र आहे.

हे सर्व समजावून घेऊन राजीव गांधींनी जर शेतीमालाच्या भावाविषयी घोषणा केली असेल तर त्याला अर्थ आहे. नाहीतर मत मिळविण्यासाठी वापरलेला तो एक नवीन खुळखुळा आहे.

### महमद तुघलखाचा दुसरा अवतार

या देशाच्या परिस्थितीचा आणि तिच्यामागील कारणांचा अभ्यास न करता देश पुढे नेण्याच्या गोष्टी कुणी करू नयेत. ज्या देशाचा जगात आर्थिक यादीमध्ये जवळजवळ शेवटचा नंबर लागतो, ज्या देशामध्ये आजही दीड लाख खेड्यांत पिण्याचे पाणी नाही, अडीच लाख खेड्यांत जायला रस्ता नाही, जिथलं निरक्षरतेचं प्रमाण वाढतं आहे, लाखो खेडी खरजेनं त्रस्त झाली आहेत, ज्या देशातल्या हजारो शेतमजुरांना, आदिवासींना हंगाम संपला की घरात काही नाही म्हणून आपल्या मुलांना झाडाचा पाला उकडून खाऊ घालावा लागतो त्या देशाचे पंतप्रधान एकीकडे गंगाजलशुद्धी (जी गंगा चुकीच्या औद्योगिकरणाच्या नीतीने अशुद्ध झाली आहे) तर दुसरीकडे कॉम्प्युटरचा वापर करून, अत्याधुनिक विज्ञानाचा वापर करून आधुनिक युगामध्ये जगाच्या पुढे जाण्याच्या गोष्टी करतात तेव्हा त्यांना महमद तुघलखाचा दुसरा अवतार म्हणू नये तर काय म्हणावे?

देशातील पंचाहत्तर टक्के जनता शेतीवर जगणारी, तरीही शेतकरीविरोधी सरकारचे बहुमत ८० टक्क्याचे. याचे कारण शेतीमालाच्या भावावरून निरनिराळ्या प्रकाराने लक्ष विचलित करण्यातील यश. शेतकरी संघटनेने या निवडणुकीत हे लक्ष विचलित न होऊ देण्याची मोहिम उघडली. शेतकरी व आदिवासी शेतकरी यांचं भांडण असू शकत नाही. हे नवापूर भागातील आदिवासींनी महाराष्ट्र प्रचारयात्रेत, धुळे अधिवेशनात आणि या निवडणुकीतही सिद्ध केले. शेतकरी, आदिवासी यांच्यामधील भांडण, शेतकरी-शेतमजूर यांतील भांडणे एवढेच नव्हे तर जातीयतेतून निघालेल्या सर्व भांडणांचे मूळ आर्थिक आहे. दोन अतिदरिद्री असलेल्या भावाभावात श्रीमंत उपऱ्याने त्याचं लूट करण्याचं कारस्थान लक्षांत येऊ नये म्हणून भांडण लावलेलं असतं. यातूनच शेतकरी कर्जबाजारी होतो, शेतमजूर उपाशी रहातो, हंगाम संपल्यावर बेकार होतो. त्याला पोट बांधून भूक मारावी लागते. आदिवासी शेतकऱ्याच्या एकाधिकारात तर इतर शेतकऱ्यांहूनही जास्त लूट होते. या सर्वांच्या दुःख, दारिद्र्याचं कारण एक, त्यांचं आपापसात भांडण लागायचं कारण एक, ते म्हणजे काळ्या इंग्रजाचं शेतीविषयक शोषणाचं धोरण.

### आवळा देऊन कोहळा काढणे

सत्तारूढ पक्षाच्या या फूट पाडण्याच्या धोरणाबरोबरच तात्पुरत्या स्वरूपाची गाजरं दाखवायचंही काम निवडणुकीच्या वेळी जोरात चालतं. अल्पभूधारकांना नांगर वाटणे, गावच्या देवळाला पाच हजार देणगी देणे असे प्रकार चालू होतात. शेतकऱ्यांनी केवळ स्वतःचा स्वार्थ लक्षात घेतला तरी या गाजरांमागचं कारस्थान लक्षात येईल. ज्या गावाला पाच हजार रु. देणगी देण्यात येते तेथे दहा लाखाचा कापूस होतो. कापसाचा उत्पादनखर्च सरकारी आकडेवारीप्रमाणे ९०० रु. क्विंटल व मिळणारा भाव ६०० रु. क्विंटल म्हणजे जर पाच हजार रुपयांसाठी सत्तारूढ पक्षाला मत दिलं आणि त्यांचं तेच लुटीचं धोरण चालू राहिलं तर गावाला दरवर्षी १५ लाखाऐवजी १० लाख रुपये मिळतील. ३०० रु. चा नांगर आणि ५ हजार रुपये देणगी पोटी एका गावातून सत्तेच्या ५ वर्षात २५ लाख रुपये लुटण्यांची आपण सोय करून दिली असेच होईल.

गावागावात घराण्यांच्या वैरामुळे किंवा पाटील-सरपंच अशा प्रकारच्या दोन तटांमुळे आधीच अर्धी मते सत्तारूढ पक्षाला जातात. मग खुळखुळे दाखवून, लाचारी जोपासून अजून मते मिळविली जातात आणि शासनाची शेतकरी विरोधाची तटबंदी अजून पक्की होते.

### निवडणुकीनंतरचा मतदार शेतकरी

शेतीमालाला भाव मिळवायचा असेल तर निवडणुकीच्या खिंडीत गाठून सत्तारूढ पक्षाला पराणी टोचली पाहिजे. सत्तारूढ पक्षाला मतदान म्हणजे त्यांच्या, शेतकऱ्यांच्या शोषणाच्या धोरणाला पाठिंबा देण्यासारखं आहे. ही शेतकरी संघटनेची निवडणुकीत भूमिका आहे.

चार वर्षे दहा महिने शेतकरी त्यांच्या चिंतेत काढतो. पेरलेलं बियाणं उगवेल की नाही, उगवलं तर त्याच्यावर कीड पडेल का, कीड पडली तर औषध मिळेल का, औषध मिळालं तर त्यानं कीड मरेल का, धान्य पिकेल का, पिकलं तर ते विकेल का, विकलं तर त्याला योग्य भाव मिळेल का, कारभारीण दोन दांडांचं लुगडं ठिगळं लावून वापरते तिला

नवीन लुगडं घेऊन देता येईल का, पोराची चड्डी फाटली आहे, त्याला नवीन चड्डी घेता येईल का, सोसायटीच्या कर्जाचं मुद्दल सोडा पण व्याज तरी भरता येईल का, नाहीतर सोसायटीची जीपगाडी घेऊन घरची भांडीकुंडी उचलून घेऊन जाईल आणि भर बाजारात बेअब्रू करेल मग काय करायचं असे प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात; तर, शेतात रोजगार मिळेल का, पोटापुरतं खायला मिळेल का, हंगाम संपल्यावर काही दुसरा कामधंदा मिळेल का ही भीती शेतमजुराच्या मनात. असं असताना एकदा निवडणुकीचे ढोल वाजायला लागले, घोषणाबाजी, रंगीबेरंगी करमणुकीचे प्रकार सुरू झाले की शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे लक्ष विचलित होते. ते होऊ नये हा शेतकरी संघटनेचा निवडणूक आंदोलनातील मुख्य हेतू.

**शेतीमालाच्या भावाचा विजय**

शेतकरी संघटनेचा आर्थिक विचार हा या निवडणुकीत झुंडशाही आणि घोषणाबाजीवर मात करू लागला आहे. शेतमजूर-शेतकरी, आदिवासी शेतकरी हे सर्व शेतीधंद्यावर जगणारे शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली एक येऊ लागले आहेत आणि यातूनच सर्व राजकीय पक्षांच्या, सत्तारूढ पक्षाच्यासुद्धा तोंडी शेतीमालाच्या भावाची भाषा आणण्याची, 'रेड्याच्या तोंडी वेद वदवायची' किमया शेतकरी संघटनेने घडवून आणली आहे. 'शेतीमालाचा भाव' हा आपला उमेदवार यशस्वी झाला आहे.

●

(पान १२ वरून)

वापरली. जेव्हा ताकद असेल तेव्हाच आंदोलन करायचे, नाही तर ताकद गोळा होईतो निमूट खंदकात बसून राहायचं.

दुसरा सिद्धांत असा की एका समाजव्यवस्थेच्या आत क्रांती यशस्वी होऊ शकते, बंड यशस्वी होऊ शकतं. पण शासनाविरूद्ध आंदोलन यशस्वी होऊच शकत नाही. शासनानं जर ठरवलं की एखादं आंदोलन यशस्वी होऊ द्यायचं नाही तर ते आपल्या हातातील शस्त्रांनी कितीही दीर्घकाळ चाललेलं आंदोलन अयशस्वी ठरवू शकतं. गिरणी कामगारांच्या दोन वर्षे चाललेल्या संपाबाबत शासनाने हेच केलं. अधिवेशनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या गाड्या रस्त्यांवर पाईप टाकून अडविणे, पंजाबमध्ये सशस्त्र सैनिकांकरवी शेतकऱ्यांना झोडपून काढणे हे त्यातलेच प्रकार आहेत. तेव्हा आंदोलनात शासनाशी टक्कर देण्याची रणनीती अवलंबिली तर ते आंदोलन यशस्वी होऊ शकत नाही.

हे दिसायला इतकं स्पष्ट आहे तर आंदोलन तरी कशाला करायचं असा प्रश्न साहजिकच उभा राहिल. पण आंदोलन करायचं म्हणजे आपल्या प्रश्नांबद्दल शासनाला टोचणी लावायची असते. लोकांच्याच जागृती घडवायची असते; ज्या शोषणाविषयी, अन्यायाविषयी लोक अज्ञानात असतात ते त्यांच्या निदर्शनास आणून द्यायचं असतं. आंदोलन हा एक शिक्षणाचा भाग आहे. गेल्या पाच वर्षात शेतकरी आंदोलनांनी शेतकऱ्यांना काय मिळालं? शेतीमालाला भाव मिळाले का? नाही. एके वर्षी मिळाला आणि चार वर्षात निघून गेला. पण शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नातूनच त्यांच्या सर्व समस्यांची उकल होणार आहे हे प्रशिक्षण शेतकऱ्याना या आंदोलनांतूनच मिळालं. जसं शास्त्र शिकताना थोडं प्रात्यक्षिकही करावं लागतं तसंच आंदोलनाचं आहे. पण केवळ आंदोलनाच्या ताकदीवर सशस्त्र सैन्य हाती असलेल्या शासनाशी मुकाबला करून जिंकू शकेल अशी आता परिस्थिती नाही. पूर्वी एका काळी हे शक्य होतं. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी शेतकऱ्याच्या हातातली शस्त्रं आणि सैन्याच्या हातातली शस्त्रं जवळजवळ सारखी होती. तेव्हा हे शक्य होतं. पण आज सैन्याच्या हातातील शस्त्रं आणि सामान्य माणसाच्या हातातला शस्त्रसामुग्रीचा अभाव हे पाहिलं, तर आंदोलन यशस्वी करण्याची तंत्रं ही पार गनिमी काव्याची, वेडी वाकडी जाणारी अशीच असावी लागतात.

आणखी एक मुद्दा म्हणजे जिथं अन्याय होत असेल, शत्रू प्रबळ असला तरी तिथेच आंदोलन केलं पाहिजे हे चुकीचं आहे. मगरीने पाणी सोडून चालत नाही. ती पाण्यातच राहिली तर ती हत्तीलासुद्धा ओढून नेऊ शकते. पण ती जर पाण्याबाहेर पडली तर लूत भरलेलं कुत्रंसुद्धा तिला बेजार करू शकतं. आंदोलन करतांनासुद्धा हेच तंत्र लक्षांत ठेवायला हवं. वेळ आपली पाहिजे, जागा आपली पाहिजे आणि आंदोलन करण्याची ताकदही असली पाहिजे. हे सगळं लक्षात घेऊन जास्तीत जास्त परिणामकारक आंदोलन उभं करणं म्हणजे कुशल रणनीती.

कोणी कितीही टीका करो, पण शेतकरी संघटनेने या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन रणनीतीची आखणी केलेली असल्यामुळे गेल्या पाच वर्षात तिची ताकद इतकी वाढली आहे की केवळ विरोधी नव्हे तर राज्यकर्त्या पक्षालाही दबून, नमून वागावं लागत आहे. राज्यकर्ता पक्ष शेतकऱ्यांना दमदाटी करून घाबरवण्याचा प्रयत्न करू लागला आहे; इतर पक्ष, जे आजवर संघटनेबद्दल अवहेलनेने बोलत होते ते 'यांच्याही म्हणण्यात काही तथ्य' आहे अशी भूमिका घेत आहेत. इतका दरारा शेतकरी संघटनेने निर्माण केला आहे.

शेतकरी संघटनेने आजपर्यंत वेळोवेळी ज्या गोष्टी केल्या त्यातून सतत आपली ताकद वाढविली. पुढेही आपल्याला जे निर्णय घ्यायचे आहेत ते आपली ताकद कमी होणार नाही याची काळजी घेऊनच ठरवायला हवेत. निवडणुकीचा वापर आपल्याला आंदोलन प्रभावी करण्यासाठी करावयाचा आहे. कुणीही सत्तेवर आले तरी चालू व्यवस्थेमध्ये ते शेतकऱ्यांच्या समस्या सोडवू शकत नाहीत. पण आज आपल्याला एकत्र जमण्यास अडथळे आणले जात आहेत. महात्मा गांधींनी दिलेला सविनय कायदेभंगाचा हक्कही तुडवला जातो आहे. आपल्या प्रश्नांना केवळ लाठ्याकाठ्यांच्या भाषेने उत्तरे दिली जात आहेत अशी मस्ती राज्यकर्त्यांत राहू नये असा आपला दरारा निर्माण होईल अशी भूमिका आपल्याला घ्यायला हवी.

*(धुळे अधिवेशन - तिसऱ्या सत्रातील भाषणांतून)*

# आमच्या जाती जाती आज जळून गेल्या राख झाल्या

**माझ्या भावांनो आणि माय बहिणींनो,**

काही क्षणांपूर्वी निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ मी नारळ फोडून केला. हा शुभारंभ करण्याचे भाग्य आपण सर्वांनी मला दिलेत याबद्दल मी आपला आभारी आहे. हे मी औपचारिकतेने बोलत नाही. लोकसभेच्या मोठ्या निवडणुकांनाही माझ्या लेखी फारसे महत्त्व नाही. कित्येक निवडणुका आल्या आणि गेल्या. कालचे ऐरे गैरे थोर पुढारी बनले पण सामान्यांची गरीबी हटली नाही, उलट वाढली. मग अशा निवडणुकांचे काय महत्त्व आहे? आणि आताची निवडणूक तर केवळ पोटनिवडणूक आहे. दिल्लीला राजीव गांधींना भरभक्कम बहुमत मिळालेलेच आहे. गेल्या वेळी शंकरराव चव्हाण यांना नांदेडने निवडून दिले. ते मुख्यमंत्री म्हणून खाली मुंबईला आले आणि ही जागा पुन्हा रिकामी झाली. त्या निवडणुकीत शंकरराव चव्हाणांच्या विरूद्ध जे लढले ते रुमालांनी हात बांधून राज्यकर्त्या पक्षाला शरण गेले आहेत. निवडणुका हा असा पक्षापक्षांनी मांडलेला पोरखेळ आहे आणि तरी देखील प्रकाश आंबेडकर यांच्या प्रचाराचा नारळ फोडण्याचे भाग्य मला मिळाले असे मी म्हणतो कारण नांदेडची ही पोटनिवडणूक किंवा त्या एका कोणा उमेदवाराला दिल्लीच्या लोकसभेत उरलेल्या दोन-अडीच वर्षांकरीता पाठवणारी निवडणूक नाही. देशाचा इतिहास बदलू शकेल अशी ही निवडणूक ठरणार आहे.

प्रकाश आंबेडकर यांच्या उमेदवारीला शेतकरी संघटनेने केवळ पाठिंबा दिलेला आहे असे नाही. नांदेड जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी प्रकाश आंबेडकरांनी उभे रहावे अशी विनंती केली. त्यावेळी बाळासाहेब हे अकोल्याला होते. मी त्यांना पुण्याहून टेलिफोनवरून ही विनंती कळविली. नंतर प्रत्यक्ष भेटीत या निवडणुकीची भूमिका काय असावी याबद्दल आमच्या दोघांच्याही मनातल्या कल्पना एकसारख्या आहेत हे स्पष्ट झाले. या निर्णयाला सर्व विरोधी पक्षांनीही पाठिंबा दिला. आता बाळासाहेब हे निवडणूक लढवीत आहेत ते कोण भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते म्हणून नव्हे किंवा केवळ दलितांचे नेते म्हणून नव्हे तर आमच्या सर्वांचे नेते म्हणून ते ही निवडणूक लढवणार आहेत. शेतकरी संघटनेने त्यांना फक्त उभे केले असे नव्हे तर संघटनेचे सर्व कार्यकर्ते आपली ताकद पणाला लावून या निवडणुकीत काम करणार आहेत.

शेतकरी संघटना राजकीय पक्ष नाही. निवडणुकीत संघटनेला स्वारस्य नाही. मग आम्ही प्रकाश आंबेडकरांना पाठिंबा देण्याची भूमिका का घेत आहेत? सत्तेच्या खुर्चीत कुणीही जाऊन बसले तरी तो गरीबांचे प्रश्न सोडवू शकत नाही. फार तर तो काही तरी थातूरमातूर सुधारणा करून अगदी स्वतःला आपल्या प्रदेशाचा ''शिल्पकार'' म्हणवून घेऊ शकेल. अशा शिल्पकारांचा देशात तोटा नाही. कोणी साताऱ्याचे शिल्पकार, कोणी सांगलीचा, तर कोणी विदर्भाचा, कोणी मराठवाड्याचा, कोणी महाराष्ट्राचा तर, कोणी भारताचा शिल्पकार म्हणवला जाऊ लागला. पण गरीब गरीबच राहिले. शेतकरी कर्जात बुडतच राहिले. गरीब अन्नाला मौताजच राहिले. मायबहिणींना अंगभर वस्त्राचीही व्यवस्था झाली नाही आणि सगळेचजण वर्षानुवर्षे पावसाने जरा डोळे वटारले की खडी फोडायला जात राहिले.

मुंबईला गेलेला कुणी आमदार, दिल्लीला गेलेला कुणी खासदार, कुणी मुख्यमंत्री, कुणी केंद्रीय मंत्री फार काय अगदी कुणी पंतप्रधानसुद्धा गरीबी हटवेल यावर शेतकरी संघटनेचा यत्किंचितही विश्वास नाही. निवडून गेलेला प्रत्येकजण गरिबांना लुटणाऱ्यांच्या जाळ्यात सापडतो. काही जण त्यांनाच सामील होतात. काही हतबल होऊन जातात. दिल्लीला किंवा मुंबईला गेलेला कोणीही आमची सुटका करणार नाही. त्यासाठी सर्व गरिबांना, सर्व श्रमिकांना सर्व शोषितांना सर्व दलितांना एकजुटीने लढा द्यावा लागणार आहे. आपण घाम गाळतो. त्या घामाचे दाम हराम छिनावून नेतात. आपल्या घामाचे दाम मिळावे याकरता आपल्याला लढावे लागणार आहे आणि आपण लढत आहोत.

मग निवडणुकांचा उपयोग काय? पाच वर्षे संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गावोगाव वणवण फिरायचे, संघटना बांधायची, आंदोलनात उतरायचे, लाठ्या खायच्या, तुरुंगात जायचे, गोळ्या खायच्या आणि पाच वर्षानंतर निवडणुका आल्या म्हणजे त्यांनी घरी जाऊन बसायचे आणि पक्षापक्षाच्या इतका वेळ लपून राहिलेल्या पुढाऱ्यांनी वटवाघळाप्रमाणे निवडणूक आली की, बाहेर पडायचे असे संघटनेला अपेक्षित आहे काय? अर्थातच नाही. हे तर सत्ताधाऱ्यांना फारच सोयीचे होईल. ते म्हणतील, 'हे बरे आहे' पाच वर्षे या वेड्यांना धावू द्या. पोलिसांकरवी आपण त्यांना कापून काढू, निवडणुकीतही काही जाच नाही. आपली सत्तेची खुर्ची कायम ती कायम. भले चालू द्या ह्यांची संघटना आणि भले चालू द्या ह्यांचे आंदोलन!' राजकारणाविषयी, शेतकरी संघटनेचे धोरण असे येरेगबाळे नाही. १९८२ सालच्या सटाणा, अधिवेशनाच्या ठरावात अगदी स्पष्ट म्हटले आहे, निवडणुकीचा उपयोग आंदोलन प्रभावी करण्याकरिता आहे. देशभरच्या आजच्या स्थितीत शेतकऱ्याचे, श्रमिकांचे, दलितांचे आणि शोषितांचे आंदोलन मोठ्या कठीण अवस्थेतून जात आहे. मोठी जीवघेणी संकटे या आंदोलनापुढे ''आ'' वासून उभी आहेत. या संकटाचा बिमोड करण्यासाठी नांदेडच्या पोटनिवडणुकीचा उपयोग करण्याचे

**नांदेड : लोकसभा मतदार संघ**
**पोटनिवडणूक, मार्च १९८७**
**शेतकरी संघटक,**
**नांदेड अधिवेशन विशेषांक**
**१०/११/१२ मार्च १९८९**

आम्ही ठरविले आहे.

आज दुपारी येथे आल्या आल्या काही पत्रकारांनी मला विचारले, 'तुम्ही नांदेडच्या निवडणुकीत लक्ष का घातले? शंकरराव चव्हाणांचं आणि तुमचं भांडण आहे म्हणून तुम्ही या निवडणुकीत हात घालत आहात का?' या प्रश्नाचं उत्तर उघड आहे; इतका आमचा हेतू कोता नाही. पूर्वी काहीही झाले असो, शंकरराव चव्हाण आणि शेतकरी संघटना यांचे सध्या संबंध खरोखरच चांगले आहेत. मुंबईच्या ठिय्या कार्यक्रमाच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी एक मंत्री पाठवून आम्हाला चर्चेसाठी बोलावून नेले. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणातून चर्चा झाली, समझोता झाला. शेतकरी संघटनेच्या मागण्यांसंबंधी राज्यशासन व शेतकरी संघटना यांनी दोघांनी मिळून केंद्र सरकारकडे संयुक्तपणे प्रयत्न करण्याचे ठरले. त्याप्रमाणे दिल्लीत बोलणी चालू झाली. कापूस एकाधिकार खरेदीच्या विक्री व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या दोन प्रतिनिधींची नेमणूक झाली. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर प्रत्यक्ष हिंसाचाराचा आरोप नसेल तेथे खटले मागे घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. एवढेच नव्हे तर यापुढे शासन आणि संघटना यामध्ये सर्व पातळीवर स्थायी संबंध तयार व्हावेत ह्या कल्पनेलाही मुख्यमंत्र्यांनी पाठिंबा दिला आहे. असे संबंध तयार झाले तर छोट्या छोट्या प्रश्नांवर आंदोलने करण्याची आवश्यकताच राहाणार नाही. थोडक्यात, शंकररावांवरील रागामुळे संघटना नांदेडच्या निवडणुकीत उतरत आहे हे म्हणणे चूक आहे. उलट, संघटना ह्या निवडणुकीपासून दूर राहिली असती तर महाराष्ट्र राज्याच्या पातळीवर संघटनेचा फायदाच होवू शकला असता.

यात वैयक्तिक रागालोभाचाही प्रश्न नाही. शंकरराव चव्हाणांनी यापूर्वी व्यक्तिशः अनेक दोषारोप केले हे खरे आहे. पण प्रत्यक्ष एक- दोनदा भेट झाल्यानंतर ''आमची भेट ह्या पूर्वीच व्हायला पाहिजे होती, म्हणजे सर्व गैरसमज टळले असते. शरद जोशींचा कापूस-प्रश्नाविषयी अभ्यास सखोल आहे.'' असे उद्‌गारही त्यांनी खुल्या परिषदेत अगदी मोकळेपणाने काढले. सार्वजनिक आयुष्यात एवढा प्रामाणिकपणा फार दुर्मिळ आणि त्याबद्दल शंकररावजींबद्दल मला आदर वाटतो.

निवडणुकीच्या प्रचार सभेत मोठी गंमतीची धुळवड चालते. कोणीही काहीही बोलावे, चिखलफेक करावी; सगळं काही चालून जाते. भरपूर हशा आणि टाळ्या सभेत मिळतात. सगळ्या कार्यकर्त्यांना मी विनंती करतो अशा तऱ्हेचा स्वस्त चिखलफेकी प्रचार करण्याच्या मोहापासून त्यांना अगदी कटाक्षाने दूर रहावे. ही निवडणूक शंकररावांचा पराभव करण्याकरिता नाही, त्यांचा कोण उमेदवार असेल त्याचा पराभव करण्याकरीता नाही. आंदोलनापुढील एक मोठे संकट दूर करण्याकरिता या निवडणुकीचा उपयोग आहे.

एका बाजूला गरिबांना लुटणाऱ्या लोकांची ताकद फार प्रचंड वाढली आहे. दिल्लीचे सरकार, पंतप्रधानांचे सर्व दोस्त मंडळी आणि खुद्द पंतप्रधानही गरिबांना लुटणाऱ्यांचे साथीदार बनले आहेत. राज्यशासन आणि शेतकरी संघटना कापसाच्या भावासंबंधी संयुक्तपणे केंद्रशासनाकडे प्रयत्न करतात. याचा अर्थ स्पष्ट आहे. संघटनेचे खरे युद्ध केंद्र सत्तेविरूद्ध चालू आहे. राज्यशासनाच्या हाती शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नावर काहीच सत्ता नाही. त्यांचं आमचं भांडण लागतं ते राज्यशासनाकडे. पोलिसखाते आहे म्हणून केंद्रसरकार आंदोलन चोपून काढायला राज्य शासनाचा आणि त्यांच्या पोलिसी दंडुक्याचा उपयोग करते म्हणून त्यांचे अन् आमचे भांडण. पण आमची खरी लढाई केंद्राशीच. एका अर्थाने कापसाच्या भावाची लढाई आता खऱ्या अर्थाने सुरू होते आहे. कारण कापसाच्या भावाची लढाई ही एकाधिकाराविरूद्ध नाही ती प्रत्यक्ष राजीव गांधींच्या कापड धोरणाविरूद्धची लढाई आहे.

ज्या कापड धोरणाविरूद्ध आपण लढतो आहोत ते धोरण नीट समजावून घेतले म्हणजे आपल्या आंदोलनावर काय धोका कोसळत आहे हे लक्षात येईल कोणते धोरण चांगले अन् कोणते वाईट हे ठरवावे कसे? महात्मा गांधींनी एक फार मोठा नियम सांगितला. कोणतेही धोरण किंवा कार्यक्रम चांगला की वाईट हे कसं ठरवावं? तुमच्या आयुष्यात तुम्ही आजपर्यंत जो सर्वात हीन, दीन भुकेलेला कंगाल मनुष्य पाहिला असेल, त्याचं चित्र डोळ्यासमोर उभं करा, तुमच्या धोरणानं किंवा कार्यक्रमानं त्या हीनदीन प्राण्याच्या आयुष्यात सुखाचा एक क्षण जरी येणार असेल तरी ते, धोरण, तो कार्यक्रम योग्य आहे असे समजा.

महात्मा गांधींनी हा नियम सांगितला मग कापड धोरण चूक का बरोबर कसं ठरवायचे? १९८१ साली कर्नाटकांतील 'निपाणी' येथे तंबाखूला भाव मिळावा म्हणून शेतकऱ्यांचे प्रचंड आंदोलन झाले. एका अर्ध्या तालुक्यातून ४० हजार शेतकरी पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर येऊन बसले. हे आंदोलन पुरे २३ दिवस चालले. दुसऱ्या तिसऱ्या दिवशी मुंबई-दिल्लीच्या पत्रकारांना घेऊन सात किलोमीटर लांब पसरलेल्या ''आंदोलन नगराला'' भेट द्यायला निघालो. एक पन्नाशीच्या बाई मला मला पाहताच धावत पुढे आल्या. सगळे पत्रकार ऐकत होते. त्या म्हणाल्या, ''शरदभाऊ तुम्ही आमच्या गावात आला होता. आंदोलनात भाग घ्यायला तुम्ही सांगितलं होतंत. नुसत्या पुरूषापुरूषांनी येऊन भागणार नाही. माय बहिणींनी पण आलं पाहिजे म्हणून सांगितलं. मनात पहिल्यापासून फार यायचं होतं बघा, पण इकडे यायसारखं एक लुगडं माझ्यापाशी नाही. आज शेजारणीकडनं घेतलं अन् तडक इकडं आले बघा.''

घराबाहेर पडायचं झालं तर बरं दिसावं, निदान लाज राखली जावी इतपतसुद्धा ज्याच्या घरी कापडं नाहीत अशी माणसं आजही देशात रुपायात चार आणे आहेत. माझ्या असंख्य बहिणी दोन दांडाचं, तीन दांडाचं, जागोजाग ठिगळं शिवलेली आणि आणि जिथं ठिगळानं भागत नाहीत तिथं गाठी मारलेल्या अशी कापडं नेसतात. या माझ्या बहिणींच्या अंगावरच्या कापडातले एखादं भोक तरी कमी करेल ते कापड धोरण चांगलं. हे कसं काय व्हायचं?

या माझ्या बहिणींना तुम्ही विचारा,

''का गं बये, तू असली कापडं का घातली. देशात तर कापडाला काही तोटा नाही. दुकानं भरभरून वाहात आहेत. कापडाचे सेल लागले आहेत. रंगीबेरंगी झुळझुळीत कापडं विकत घ्या म्हणून लाखो रुपये खर्चून पेपरात, दूरदर्शनवर जाहिराती देतात मग तू असली कापडं का घालती?'' ती म्हणेल, ''काय करावं? मिळतं त्यात पोट भरणं कठीण. दरवर्षी म्हणतो कापडं करायची पण जमतच नाही.'' तुम्ही विचाराल, ''तुला का पैसा पुरत नाही? तुमच्या घरातली सगळी माणसं आळशी आहेत का कसे?'' ती म्हणेल, ''नाही, बाप्पा, घरातली सगळी माणसं, अगदी आठ वर्षाचा पोर अन् साठ वर्षाची म्हातारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबतात पण सांजी कशी ती येत नाही. अन् हातात पडलं त्या पैशानं पोट भरायची मारामार. कापडं घेतली आधी तर कारभाऱ्याला, नंतर पोराला, मला घ्यायला जमतच नाही बघा.'' मग कापडधोरण चांगलं कोणतं? ह्या प्रश्नाचं उत्तर उघड आहे. एका बाजूला कापडं तयार होतात, त्याच्याबरोबर शेतमजुरांच्या, शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या हाती मिळकत जाते. कापड तयार होण्याची मिळकत ज्यांच्या अंगावर कापड नाही त्यांच्या हाती गेली तर तयार कापड खपेल. नाहीतर नुसतंच दुकानात साठून राहील. अन् उघडे ते उघडेच राहतील. राजीव गांधींच्या कापड धोरणातून काय झालं. ज्यांच्याकडे अधिक साड्याचे ढीग लागले आहेत त्यांना जाडी भरडी कापडं नकोत, झुळझुळीत तलम, टेरिलीन, ॲक्रेलिनची कापडं पाहिजेत. माझ्या बहिणीच्या अब्रूपेक्षा राजीव गांधींना त्यांची चैन जास्त महत्त्वाची वाटते म्हणून त्यांनी परदेशातून राजीवस्त्रांची आयात करायला खुला परवाना दिला. बाहेरून यंत्रसामुग्री आणून त्यांची कापडं बनवायची व्यवस्था केली. पण हे कापड तयार झालं त्यात माझ्या बहिणींच्या हाती एक नवा पैसा तरी आला काय? मुळीच नाही. धन झाली ती परदेशातल्या कारखानदारांची, धन झाली धिरूभाई अंबानीची, नसली वाडियांची. उलट, कापसाचे भाव पडले, पेरा कमी झाला, मजुरी बुडाली, यंत्रामाग बंद पडले, हातमाग थांबले, माझ्या बहिणींच्या हातात उरणाऱ्या दोन पैशातलासुद्धा पैसा कमी झाला. इतकं देशद्रोही धोरण अगदी इंग्रजी अंमलात लॉर्ड कर्झननेसुद्धा अमलात आणायची हिंमत केली नसती. गोऱ्या इंग्रजालाही जमलं नाही ते आता काळा इंग्रज करतो आहे अन् हे काही फक्त कापड धोरणाबाबत नाही, सर्वच क्षेत्रात आहे. औद्योगिकरण, इलेक्ट्रॉनिक्स, औषधी, शिक्षण, कामगारांसंबंधी कायदे प्रत्येक क्षेत्रात उघडपणे गरिबांना आणखी कोपऱ्यात लोटण्याची तयारी आटोकाट होत आहे.

या संकटालाही तोंड देणे जमेल पण याहूनही मोठे संकट दुसरीकडे तयार होत आहे. मी गेल्या आठवड्यात पंजाबमध्ये गेलो होतो. पंजाबमध्ये, चालू असलेला वाद हा हिंदु विरूद्ध शिख असा धार्मिक स्वरूपाचा वाद नाही. मी या विषयावर अनेकवेळा बोललो आहे. १९८४ च्या मार्च मध्ये शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली ८० हजार शेतकरी विजेचे भाव कमी करून मिळावेत ह्या मागणीसाठी आंदोलनात उतरले. आठ दिवस चंडीगढ येथे राजभवनात वेढा घालून बसले. अकाली दलाच्या पुढाऱ्यांनी, इतरही काही पक्षांनी आंदोलनात घुसायचा प्रयत्न केला त्याचा शिख शेतकऱ्यांनी विरोध केला. या वादाचे स्वरूप जातीय नाही हे उघड आहे. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्धचा लढा शेकडो वर्षांपासून चालू आहे. शिवाजी महाराजांचा स्वराज्याचा लढा हे शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्धच्या लढ्याचेच पहिले रूप आणि महात्मा ज्योतीबा फुल्यांचा 'भटशाही'विरुद्धचा लढा हाही त्याच लढ्याचा एकोणीसाव्या शतकातील अवतार. तसेच, पंजाबातील शिख गुरू आणि त्यांच्यानंतर बंदा बहादुर यांच्या पराक्रमांच्या गाथा शेतकऱ्यांचे शोषण थांबवण्याकरता अवतरल्या. या शतकात सर छोटूराम यांच्या युनियनिष्ट पक्षाने हिंदु, शिख आणि मुसलमान या तिघांचीही भरभक्कम एकी केली आणि लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखालील व्यापारी व सावकार काँग्रेसचा पराभव केला. १९६५ पासून हरितक्रांती सुरू झाली. पंजाबी शेतकऱ्यांनी देश अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण केला पण हरितक्रांतीचा फायदा ह्या शेतकऱ्यांना झाला नाही. तो कर्जातच बुडाला. फायदा झाला तो व्यापाऱ्यांचा, ट्रॅक्टर विकणाऱ्या, खत विकणाऱ्या, औषध विकणाऱ्या व्यापाऱ्यांचा. पंजाबमधला शिख शेतकरी आहे आणि व्यापारी बहुतांश बिगरशिख आहेत. पण तरीही तेथील शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली १९७० सालापासून शेतकऱ्यांची निखळ अर्थवादी चळवळ बांधण्याचे भरभक्कम प्रयत्न चालू होते. १९८० सालापर्यंत अशी परिस्थिती तयार झाली की, शेतकरी संघटना ठरवेल त्याच्या हाती सत्ता जाऊ लागली. शेतकऱ्यांच्या या नव्या ताकदीचा आर्थिक पातळीवर पराभव करणे शक्य नव्हते. म्हणून मोठ्या दुष्ट बुद्धीने त्याला जातीयवादी स्वरूप देण्यात आले. देशाच्या अखंडतेचा आणि एकात्मतेचा दिवसरात्र घोष करणाऱ्यांनी 'देश फुटला तरी बेहत्तर, शेतकरी जिंकता कामा नये' अशा तऱ्हेने मोर्चे बांधले. शेतकरी आंदोलन दुर्बल झाले. मी पंजाबमध्ये सरहिंद गावी गेलो. गुरू गोविंदसिंघांच्या दोन मुलांना ज्या जागी भिंतीत चिणून मारले त्याच ठिकाणी २१ ते २३ फेब्रुवारी हे तीन दिवस पंचवीस हजारावर शेतकरी केवळ शेतकऱ्यांच्या निखळ आर्थिक प्रश्नांवर विचार विनिमय करत होते. त्यांच्यापैकी पुष्कळांना मी जवळजवळ दोन वर्षांनी भेटलो होतो. मला पाहून त्यांना भरून येते होते. नोव्हेंबर १९८४ च्या दिल्ली येथील दंग्यात महिलांवर जे अत्याचार झाले त्यांचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्रातून दहा हजार स्त्रिया पंतप्रधानांच्या घरासमोर निदर्शने करणार आहेत हे ऐकल्यानंतर "पहिली चांगली बातमी ऐकायला मिळाली. पंजाबात धर्माधर्मात भांडणे लावणाऱ्यांना मूहतोड जबाब देण्यासाठी आम्हाला हिंमत आली.'' अशी त्यांची प्रतिक्रिया आली. पंजाबमधील शेतकऱ्यांच्या लढ्याला धर्ममार्तंडांनी पाडलेली फूट दूर करता आली तरच गरिबांची लढाई यशस्वी होईल.

पंजाबमधून येताना वाटेत गुजरातमध्ये शेतकऱ्यांच्या मेळाव्यात मी हजर होतो. लक्षावधी शेतकरी जमले होते. गुजरातमध्ये हा अभूतपूर्व मेळावा असं सगळे म्हणत होते. पण शेतकरी एका बाजूला आणि

दुसऱ्या कारणासाठी जातीजातींचे आणि धर्माधर्मांचे दंगे रक्ताचे पाट वाहात आहेत. शेतकरी चळवळीत सदा धार्मिक चिन्हे आणि ध्वज आणण्याचा प्रयत्न होतो आहे. हे प्रयत्न यशस्वी झाले तर गुजरातमधील शेतकरी ताकद, आंदोलन संपेल. हा धोका महाराष्ट्रातल्या शेतकरी आंदोलनालाही आहे. महाराष्ट्रातील शेतकरी संघटना मजबूत आहे, ताकदवान आहे, म्हणून या जातीय रोगाच्या साथीचा आपल्याला धोका नाही, असा खोटा आत्मविश्वास क्षणभरही बाळगू नका. जेव्हा जेव्हा, जेथे जेथे शेतकरी आंदोलन सबळ झाले तेथे तेथे जातीधर्मवादाच्या किडींनी त्याला खलास केले आहे, असे इतिहास सांगतो. केरळातील शेतमजुरांचा उठाव सशक्त झाला त्याबरोबर जमीनदार नंबुद्रि ब्राह्मणांनी त्याला मोपल्यांचे बंड असे नांव दिले आणि हिंदु-मुसलमानाच्या दंग्याचे स्वरूप दिले. तेव्हा शेतमजुरांचा पराभव झाला. देशाची फाळणी तरी का झाली? सिंध प्रांतात आणि पूर्व बंगालात शेतमजूर तेवढे मुसलमान आणि जमीनदार सगळे हिंदु अशी स्थिती होती. मजुरांचे बंड मोडण्याकरिता जमीनदारांनी मुसलमानांचे आक्रमण म्हणून भुई थोपटायला सुरुवात केली आणि त्याचा फायदा मुस्लीम लीगवाल्यांनी घेऊन पाकिस्तान तयार केले. असाच धोका आज महाराष्ट्रात संभवतो.

'शेतकरी तितुका एक एक' हे फार महत्त्वाचे सूत्र आहे. शेतकरी छोटा असो, बागायती असो, कोरडवाहू असो त्याची जात कोणतीही असो. तो एक आहे. हे संघटनेचे ब्रीद वाक्य आहे. शेतमालाला भाव हा गरिबी हटवण्याचा एक कलमी कार्यक्रम आहे आणि देशातील सर्व समस्यांचे मूळ शेतकऱ्यांच्या शोषणात आहे. अशी संपूर्ण अर्थवादी भूमिका घेऊन शेतकरी आंदोलन पुढे सरसावत आहे. आर्थिक रणभूमीवर शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा पराभव होऊ शकत नाही याची जाणीव झाल्यानंतर भयभीत झालेला दुष्मन पुन्हा एकदा ''फोडा आणि झोडा'' नीतीचा अवलंब करायला सज्ज झाला. धर्मांच्या नावाखाली भावना भडकवून देणारे लोक वेगवेगळ्या नावाखाली गावोगाव शिरू पहाताहेत. आपापल्या जातीचे भांडवल करून पुढे झाले म्हणजे निदान आपल्या जातीच्या लोकांचा गठ्ठा पाठिंबा मिळतो हे लक्षात आल्यावर धूर्त आणि आपमतलबी पुढारी गरिबांच्या भुकेचे आर्थिक विश्लेषण बाजूला सारून वेगवेगळ्या धर्मांच्या आणि देवदेवतांच्या जयजयकारांच्या घोषणा बुलंद करू लागली आहेत आणि दुर्दैवाने त्यांच्या या कारस्थानांना यश येत आहे. राखीव जागांच्या प्रश्नावर जे दंगे माजतात त्याचा विचार करू. हा प्रश्न म्हटला की, भल्या भल्या म्हणणाऱ्या सवर्णांची आणि दलितांची माथी फिरतात. राखीव जागा असाव्यात किंवा नाहीत त्या किती असाव्यात, जन्मजात मागासलेपणा अधिक महत्त्वाचे का आर्थिक मागसलेपणा?

राखीव जागांच्या वेगवेगळ्या सेवांच्या गुणवत्तेवर होणारे परिणाम यापैकी खरे म्हटले तर कोणतीच बाब महत्त्वाची नाही. राखीव जागांचा प्रश्न हा गरीबी हटवण्याशीही संबंधित नाही आणि बेकारी दूर करण्यात तर नाहीच नाही. बहुजन समाजातील बेकारांच्या पोटातील भूक ही काही दलित समाजाच्या बेकाराच्या पोटातील भुकेपेक्षा वेगळी नसते. भुकेला जात नाही, भाषा नाही आणि धर्मही नाही. देशात शंभर तरूण दरवर्षी नोकरीला तयार होत असले तर सरकारी धोरणाप्रमाणे दहाच नोकऱ्या तयार होतात. त्या दहा नोकऱ्यांचे वाटप कशाही पद्धतीने झाले तरी नव्वद तरूण, मग कोणत्याही जातीचे असोत, बेकार उरणारच आहेत, मग या वादावर गरिबांनी एकमेकांची डोकी का फोडावीत?

पण याहीपेक्षा फालतू गोष्टींवर वादविवाद लावले जातात, या देवतेची पूजा, त्याची मिरवणूक एवढ्यातेवढ्यावरून मुडदे पाडले जातात. देवळामशिदींतून कर्णे लावून धर्माधर्मांचा प्रचार चालू आहे. ओढा खळखळ वाहात असला म्हणजे पाणी स्वच्छ राहते पण त्या पाण्याला तुंबारा बसला की त्याचे डबके होते. त्यात शेवाळं साठतं, किडे होतात आणि डबक्यातल्या डबक्यात त्यांच्या एकमेकांतील जीवघेण्या लढाया चालू होतात. राष्ट्राचे नेतृत्व महात्मा गांधींच्या हाती होते, देश स्वातंत्र्यासाठी झुंजत होता तेव्हा राष्ट्रभाषेच्या प्रचारात मद्रास प्रांत सगळ्यात अग्रेसर होता. महात्मा गांधींचे नेतृत्व जाऊन छोट्या छोट्या गांधींचे नेतृत्व आल्यावर तामिळनाडूत हिंदीला कडवा विरोध होत आहे. कारण देशातील विकासाची गती खुंटली आहे, देशाचे डबके बनले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना शहरात जाण्याचा आदेश का दिला? खेड्यातल्यापेक्षा शहरात जातीयता कमी का जाणवते? कारण उघड आहे. खेड्यांच्या तुलनेत शहरातील प्रत्येकाच्या विकासाची गती फार मोठी आहे. थोडे थोडे का होईना, सगळेच जण वर चढत असले तर दुसऱ्याला अडवण्याची किंवा पाडण्याची प्रवृत्ती शहरात होत नाही. पण खेड्यातला विकासच खुंटला. शेतकरी बुडतो आहे. शेतमजूर रोजगाराकरिता वणवण फिरतो आहे. भविष्यकाळ सर्वांचाच भेसूर आहे, आशा करण्यासारखे किंवा अभिमान बाळगण्यासारखे कोणाजवळ काही नाही. मग जे असेल त्याचाच खोटा अभिमान बाळगायचा. ब्राह्मणाने जगाला हीन मानायचे, मराठ्याने ब्राह्मणाची हेटाळणी करायची, दोघांनी मिळून महारांना कमी लेखायचे. महारांनी मांगांना, मांगांनी चांभारांना ही अशी भुकेकंगालांची लढाई गावोगाव चालू आहे. आगीत तेल ओतून पोळी भाजायला येणारे अनेक इतिहासाचे नाव घेऊन स्वाभिमान आणि अस्मितेच्याच बाता करीत लुटलेल्या आणि नाडलेल्या हीनदीनांत लढाया माजवून देणारे उदंड झाले आहेत. जातीचे राजकारण हा गठ्ठा मातांचा किफायतशीर धंदा झाला आहे. हे वर्षानुवर्षे चालले. गावाला विभागणाऱ्या हवा, भिंती ओलांडून समग्र गावाची चळवळ कधी उभी राहूच शकली नाही. गावठाणे आणि राजवाडे दोघांनाही इंडियाने फस्त केले आहे.

मी सभेला येण्यापूर्वी काही जणांनी चिठ्या पाठवून कळविले की, "गावोगाव खुलेआम जातीयवादाचा प्रचार झाला आहे. काही झाले तरी आपल्या जातीवाल्याला मते द्या. महाराला देऊ नका.'' असली भाषा देशभर एकात्मतेच्या आणि अखंडतेच्या गप्पा मारणारे करत आहेत. मी शंकरराव चव्हाण आणि राजीव गांधी या दोघांनाही विनंती करतो, त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना सक्त

**(पान २४ वर)**

# शेतकरी संघटनेच्या निवडणूक भूमिकेची पार्श्वभूमी

१७ नोव्हेंबर रोजी शेतकरी संघटनेच्या उच्चाधिकार समितीची विशेष बैठक बोलाविण्यात आली. अगदी तातडीने बोलावण्यात आली. केवळ फोनवरती निरोप देऊन समितीचे सगळे सदस्य, त्याखेरीज संघटनेचे तीनही उपाध्यक्ष आणि चौघेपाचजण विशेष निमंत्रित अशा सगळ्यांना केवळ सांगोवांगी निरोप पोहचला आणि तरीसुद्धा जवळजवळ सगळे निमंत्रित उपस्थित राहिले.

माझा उपोषणाचा सहावा दिवस होता. चालायला, बोलायला थोडाफार त्रास होत होता. तरीदेखील मी बैठकीच्या कामकाजात सगळा वेळ भाग घेतला. मधून मधून डॉक्टर लोक तंबी देत होते. आता बसू नका, बोलू नका, तरी देखील मी सगळा वेळ बैठकीत राहिलो.

अमरावतीला कार्यकारिणीची बैठक झाली होती. निवडणुका, उपोषण आणि चक्का जाम आंदोलन यांच्या आधाराने शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचा लढा लवकरात लवकर कसा यशस्वी करता येईल याची तपशीलवार चर्चा अमरावतीला झाली होती. अमरावतीलाच भरलेल्या किसान समन्वय समितीच्या बैठकीत देशभरच्या शेतकरी संघटनांनी निवडणुका आणि आंदोलन यासंबंधीत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार माझ्याकडे सोपवले होते. देशातील बहुतेक राज्यांत मतदान बहुतेक २२ तारखेलाच सुरू व्हायचे असल्याने उशिरात उशिरा १७ तारखेला या संबंधी निर्णय जाहीर करणे आवश्यकच होते; एरव्ही ते निर्णय देशाच्या कानाकोपऱ्यात पोचणे शक्य झाले नसते.

१७ तारखेच्या बैठकीत व्हायचे निर्णय तातडीचे आणि ऐतिहासिक महत्त्वाचे हे खरे. पण निर्णय तसे काही कठीण नव्हते. शेतकरी संघटनेची राजकारणाविषयीची गेल्या आठ वर्षात सुसूत्रपणे मांडलेली भूमिका लक्षात घेतली तर उच्चाधिकार समितीने जो निर्णय घेतला त्या निर्णयाला काही पर्यायच नव्हता.

आजची सर्व आर्थिक, सामाजिक व्यवस्था शेतकऱ्याच्या शोषणावर अवलंबून आहे. सर्वच राजकीय पक्ष इंडियाचे आहेत, भारताचा कुणीच नाही; निवडणुका म्हणजे शेतकऱ्यांना लुटण्याचा ठेका पाच वर्षे कुणी घ्यायचा याचाच निर्णय आहे; निवडून कुणीही आले, निवडून कोणताही पक्ष आला आणि निवडून आलेला उमेदवार कितीही धीरोदात्त नायक असला तरी चालू व्यवस्थेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या शोषणाचा प्रश्न सुटायला काहीसुद्धा मदत होणार नाही ही शेतकरी संघटनेने सातत्याने घेतलेली भूमिका आहे.

निवडणुकीच्या निकालाविषयी ही उदासीनता म्हणजे काही निवडणूक प्रक्रियेविषयीची उदासीनता नाही. निवडणुकांविषयी संघटनेचे कार्यकर्ते उदासीन राहिले तर मग राजकारणी चोरांचे चांगलेच फावेल. संघटनेने निवडणुकांचा उपयोग करायचा आहे, पण तो उपयोग संघटनेचे आंदोलनाचे सामर्थ्य वाढवण्यासाठी करायचा आहे. अगदी मतदान केंद्रे उघडू न देण्यापासून ते मतदानावर बहिष्कार, वेगवेगळ्या पक्षांना वेगळ्या तऱ्हेने पाठिंबा किंवा विरोध किंवा अगदी टोकाला जायचे म्हटले तर प्रत्यक्षपणे निवडणुकांसाठी उमेदवारही उभे येथपर्यंत वेगळे वेगळे मार्ग आहेत. पण त्या सगळ्यांचा उद्देश निवडणुकीत कुणाला जिंकवून त्याच्याकडून शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटेल अशी आशा करणे नाही. जो मार्ग स्वीकारला जाईल त्याचा उद्देश एक - शेतीमालाला भाव मिळविण्याकरिता संघटनेचे आंदोलनाचे सामर्थ्य वाढवणे.

पक्षापक्षात आवडते नावडते करायला जाणे म्हणजे उडदामाजी काळे गोरे निवडू पाहण्यासारखे आहे. आज जे ह्या पक्षात ते उद्या उडी मारून दुसऱ्या पक्षात जातात. कोणाही पक्षाकडे देशाला नवीन दिशा देणारा विचार नाही, चारित्र्यही नाही, कर्तबगारीही नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तळमळही नाही. एक एक पक्ष म्हणजे एकाएका बलदंड व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षेचे साधन. कोणाही एका पक्षावर गुणवत्तेच्या आधाराने जीव लावावा असे काही नाही. पण संघटनेच्या आंदोलनांना यश मिळायचे असेल तर त्याकरिता एक महत्त्वाची शर्त पुरी झाली पाहिजे. यातला कोणताही एक पक्ष फार बलदंड होता कामा नये. पक्ष फार सामर्थ्यवान झाला तर त्याचा उपयोग देशाचे आणि देशाबाहेरचे प्रश्न सोडविण्याकरिता होत नाही; त्याचा उपयोग, सगळ्यात जास्त, शेतकऱ्यांना लुटण्याकरिताच होतो. त्यामुळे सत्तेचा समतोल राखणे हे संघटनेच्या राजकारणातील धोरणाचे महत्त्वाचे सूत्र. १९८४ च्या निवडणुकांत, इंदिरा गांधींच्या हत्येनंतर विरोधी पक्ष अजिबात नष्ट होऊन जातील अशी परिस्थिती तयार झाली तेव्हा संघटना राजकीय समतोल ढळू नये यासाठी त्यांच्यामागे उभी राहिली.

सगळे पक्ष सारखेच असे म्हटले तरी वेगवेगळ्या कारणांनी नेहरू घराण्याचा अंमल स्वातंत्र्याच्या ४२ वर्षांपैकी ४० वर्षे चालला, स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांवर जी अवकळा आली त्या पापाचे बहुतेक सगळे रांजण इंदिरा काँग्रेसच्या घरातच भरले म्हणून इंदिरा काँग्रेस शेतकऱ्यांची शत्रू नंबर एक ही कल्पना संघटनेने अनेक वेळा मांडली आहे व नांदेडच्या अधिवेशनाच्या ठरावात त्याचा पुनरुच्चार करण्यात आला. पण त्याबरोबर

**लोकसभा निवडणूक १९८९**
**शेतकरी संघटक, ४ डिसेंबर १९८९**

विरोधी पक्षांपैकी कुणासही सर्व शक्तीने मदत करावी अशीही कार्यकर्त्यात भावना नाही हेही त्याच ठरावात स्पष्ट करण्यात आले.

शत्रू नं. १ आणि शत्रू नं. २ हा हिशोब मांडत असताना गेल्या काही वर्षांत एक नवा महाराक्षस राजकीय मंचावर आला आणि त्याचे नाव जातीय वादाचा भस्मासूर. लोकांच्या दररोजच्या पोटापाण्याचा प्रश्न असतो. पोटापाण्याच्या आणि मीठभाकरीच्या या असंतोषातून काही एक प्रबळ लढा उभा राहतो असे दिसले की नेमके जातिधर्माची एक वावटळ उठून येते आणि कष्टकरी शोषित स्त्री-पुरूषांचे प्रश्न मागे पडतात हा इतिहासाचा सतत मिळालेला अनुभव आहे. हा लढा मोपल्याच्या बंडाने शिकवला, देशाच्या फाळणीने शिकवला आणि पंजाबातील आतंकवादानेही शिकवला.

राजकीय सत्ता काबीज करायची तर त्याकरिता संघटना बांधायची दगदग करण्याची काय आवश्यकता? ज्यांच्या हातात सत्ता आहे ते लोकांना आकर्षित करण्यासाठी वेगळे वेगळे उत्सवमहोत्सव साजरे करतात आणि हाती सत्ता नसलेले फटीचर आपापल्या धर्मांच्या नावाने बांग देतात.

आपले पूर्वज, आपला धर्म, आपली जात, आपली भाषा आणि त्याबरोबर काही अभद्र वाक्‌प्रचार वापरले की विनाकारणच आपल्या पौरुषाला आव्हान होते आहे असे, अगदी आयुष्याची धूळधाण झालेल्या सुदाम्यालापण वाटू लागते. असे वातावरण तयार झाले की कोणत्या न् कोणत्या गावी, कोठे ना कोठे, काही ना काही निमित्ताने एखादी ठिणगी उडते आणि जातीय दंगलींचा कल्लोळ उठतो. पण जातीय दंगली म्हणजे आता एकदोन डोकी फुटणे, चारपाच सुरामारीचे प्रकार, काही घरांना आगी अशा मर्यादित स्वरूपाच्या राहिल्या नाही. १९४७-४८ च्या कत्तलींनासुद्धा लाजवतील असे प्रकार हरहमेश श्रीनगर, गुरूदासपूर, मीरत, भागलपूर अशा अनेक ठिकाणी घडत आहेत. जातीयवादी समाजचे समाज गुन्हेगार बनविण्याचे प्रयत्न करीत आहे. असे दंगे पेटले म्हणजे जे ते मेंढरू आपापल्या कळपात जाते, जातीयवादी विद्वेष वाढत जातात म्हणजे जातिविद्वेषाचे राजकारण करणाऱ्या सर्वांचे फावते.

इंदिरा काँग्रेस हा शत्रू नं. १ खरा; तोही काही जातीयवादापासून फार दूर आहे असे नाही. चोरूनछापून तेही जातीयवादाला खतपाणी घालतच असतात; पण खुलेआम क्षुद्रवादाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे पाप तरी ते करीत नाहीत.

इंदिरा काँग्रेस शत्रू नं. १ तर जातीयवादाचा भस्मासूर त्याहीपेक्षा मोठा शत्रू हा विचारही नांदेडच्या अधिवेशनातील ठरावात अगदी स्पष्टपणे मांडण्यात आला होता.

उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घ्यायचा निर्णय या पार्श्वभूमीवर तसा खूप सोपा होता. शत्रू नं. १ ला विरोध करणारी जी जी काही समर्थ ताकद असेल तिला पाठिंबा द्यायचा, पण शत्रू नं. १ ला विरोध करायला फक्त जातीयवादी भस्मासूरच उभा असेल तर अशा प्रसंगी शत्रू नं. १ च्याही मदतीस धावून जाणे आवश्यकच नव्हे, अपरिहार्य होते. लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्र राज्यात जातीयवाद्यांचे उच्चाटन होणे सर्वप्रथम उद्दिष्ट झाले.

निवडणुकीनंतर केंद्रात येणारे शासन कशा प्रकारचे असेल, त्याचे आसन कितपत स्थिर असेल यासंबंधी ज्या ज्या काही शक्यता दिसतात त्या सर्वच्या सर्व शेतकऱ्यांच्या निर्णायक लढ्यास अधिक सोयीस्कर असणार आहेत आणि त्यामुळे आंदोलन निवडणुकीपर्यंत स्थगित करावे हे ही अपरिहार्यच होते. आंदोलनाचा बडगा निवडणुकीच्या उंबरठ्यावर दाखवण्याचा जो काही हेतू होता तो बहुतांशी साध्य झालेलाच आहे.

निवडणूक धोरण, उपोषण आणि आंदोलन या तीन सूत्रांनी बांधलेली रणनीती कार्यकारिणीने तयार केली त्याची सर्व पूर्वपीठिका अशी आहे.

दरवेळी अशा प्रकारचा निर्णय झाला की त्याला काही, कुठेना कुठे विरोध होतोच. नगर जिल्ह्यातील कोणा एका तालुकाप्रमुखाने विरोध जाहिर केला; नाशिक जिल्ह्यातील एका वर्तमानपत्रात खोट्या सह्यांनी संघटनेचा आदेश धुडकावून लावावा, अशा जाहिराती छापल्या गेल्या. पण काही व्यक्तिगत स्नेह्यांनीसुद्धा या धोरणाविषयी शंका व्यक्त करणारी पत्रे लिहिली. शिव्यागाळ करणारी अनामिक पत्रेही आली. शेतकरी संघटनेचा १७ नोव्हेंबरचा निर्णय इतका तर्कशुद्ध आणि सुसंगत असताना त्यासंबंधी इतपतही खळखळ होण्याचे खरे म्हणजे काही कारण नव्हते. मग असे का घडले? मला वाटते अशा विरोधाचे पहिले कारण स्थानिक सोयगैरसोय आहे. ज्या मतदार संघात, विशेषतः काँग्रेस आयच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे ठरले होते तेथील कार्यकर्त्यांमध्ये थोडी नाराजी यावी हे समजण्यासारखे आहे. पण अशी परिस्थिती एकूण ९ मतदार संघात होती. त्यापैकी दोन मतदार संघात थोडीफार खळबळ झाली. ज्यांनी तक्रार केली ती त्यांची जातीयवादी पक्ष व संघटना यांच्याशी संबंधाची आहे. शेतकरी संघटना कोणत्याही पक्षाची कैवारी नाही हा विचार अजून अनेकांच्या मनात खराखुरा मुरलेला नाही. शेतकरी संघटना विरोधात उभी राहते म्हणजे राज्यकर्त्या पक्षाविरूद्ध वापरण्यास चांगले हत्यार आहे अशा हिशोबाने जी मंडळी संघटनेजवळ आली त्यांची १७ नोव्हेंबरच्या निर्णयाने मोठीच कुचंबणा झाली.

या खेरीज निवडून आलेला उमेदवार लोकसभेत गेला तरी तो शेतीमालाच्या भावाकरिता काहीही करू शकत नाही ही कल्पनाही अजून कार्यकर्त्यांच्या मनात पाहिजे तितकी रूजली नाही. कोणताही पक्ष येवो किंवा निवडून आलेला उमदेवार कितीही थोर असो लोकसभेच्या सभागृहात शेतकऱ्यांची निर्णायक लढाई होऊ शकत नाही. याबद्दल आवश्यक ती स्पष्टता कार्यकर्त्यांच्या मनात नाही.

अमक्या अमक्या उमेदवाराने शेतकरी संघटनेस फार त्रास दिला, शरद जोशींना व्यक्तिशः शिव्या दिल्या. अशा माणसांना तरी मते द्यायला सांगू नका. पण उमेदवाराची वैयक्तिक गुणवत्ता हा मुळीच मुद्द्याचा विषय

**(पान ३१ वर)**

# काळ्या इंग्रजांच्या तावडीतून सुटका होते आहे, जातीयवाद्यांच्या जबड्यात जाऊ नका

शेतकरी संघटकाचा हा अंक वाचकांच्या हातात पडेल तेव्हा विधानसभेच्या निवडणुकांच्या प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचलेली असेल.

गेल्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने जेथे जेथे डाव्या लोकशाहीवादी आघाडीचे उमेदवार उभे होते तेथे तेथे त्यांना पाठिंबा जाहिर केला होता. ज्या ठिकाणी या आघाडीचे उमेदवारच नव्हते वीष पेरून दुफळी निर्माण करणाऱ्या जातीयवादी पक्षांच्या उमेदवारांविरूद्ध, इंदिरा काँग्रेस हा शेतकऱ्यांचा शत्रू क्रमांक एक असला तरी त्या पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा व्यक्त केला. या निर्णयाचे स्पष्टीकरण सर्वांपर्यंत पोहोचविण्याइतका अवधी त्या वेळी मिळाला नाही. त्यामुळे शेतकरी संघटनेने गेल्या दहा वर्षात रुजवलेल्या काँग्रेसविरोधाचा तसेच काँग्रेसमधील आपापसातील हेव्यादाव्यांचा फायदा जातीयवाद्यांना काही प्रमाणात मिळाला आणि ते विधानसभेवर आपला झेंडा लावायच्या गर्जना करू लागले.

केंद्रात राष्ट्रीय आघाडीचे सरकार स्थापन झाले. शेतीमालाला रास्त भाव, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतमजुराला न्याय्य मजुरी या मागण्या मान्यच नव्हे तर रास्त आहेत असे स्वीकारणारे सरकार स्थापन झाले. ३१ डिसेंबर १९८९ रोजी पंतप्रधान श्री. विश्वनाथ प्रतापसिंग आणि उपपंतप्रधान व कृषिमंत्री चौधरी देवीलाल यांनी दिल्ली येथे किसान समन्वय समितीच्या बैठकीत उपस्थित होऊन शेतीसंबंधीच्या आपल्या सरकारच्या या धोरणाचा जाहिर उच्चार केला.

मार्च ८९ मध्ये नांदेड येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनात शरद जोशींनी म्हटले होते की, 'शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य जवळ येत आहे. या देशाचा नवीन पंतप्रधान काळा असेल का गोरा असेल, बुटका असेल का लांबोळका असेल हे सांगता येणार नाही. पण शेतकरी आंदोलनाने आज असे वातावरण तयार झाले आहे की जो कोणी या देशाचा पंतप्रधान होईल तो शेतकऱ्यांची कर्जमुक्ती मान्य करणाराच असेल.' शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचे हे भाकित करीत असतानाच शरद जोशींनी आपल्या भाषणात एका धोक्याचाही इशारा दिला. "शेतकरी स्वतंत्र होतो आहे म्हटल्यानंतर शेतीच्या लुटीवर मौजमजा करणारी मंडळी देशामध्ये जातीयवादाचे, धर्मवादाचे भूत उभे करून गेल्या दहा वर्षांच्या परिश्रमाने एकसंध झालेल्या शेतकरी समाजात फूट पाडण्याच्या कारवाया करतील."

वर्ष संपायच्या आतच शरद जोशींची दोनही भाकिते खरी ठरली. दिल्लीत राष्ट्रीय आघाडीच्या सरकारच्या स्थापनेने शेतकऱ्याची काळ्या इंग्रजांच्या तावडीतून सुटका होते आहे अशी आशा निर्माण झाली. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याची पहाट दिसू लागली. पण त्याचवेळी पुन्हा एकदा शेतकऱ्यांत फूट पाडण्यासाठी जातीय शक्ती डोके वर काढू लागल्या, महाराष्ट्रात जनतेने दिलेल्या काँग्रेसविरोधी कौलाचा फायदा मिळाल्याने उघडपणे नंगानाच करू लागल्या.

लोकसभा निवडणुकीनंतर मनमाड येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची व्यापक बैठक होऊन या सर्व परिस्थितीवर सांगोपांग विचारविनिमय करण्यात आला. केंद्रशासनाच्या बदलत्या धोरणाचा फायदा मिळवायचा असेल तर "शेतकरी तितुका एक एक" हे सूत्र कायम राखायला हवे हे लक्षात घेऊन जातीयवादी शक्तींना विरोध हा अग्रक्रमाचा कार्यक्रम ठरविण्यात आला. त्यानुसार अर्थवादी चळवळींना धोकादायक ठरणाऱ्या या जातीयवादी शक्तीचे खरे स्वरूप लोकांसमोर ठेवणे आणि या शक्तींना विरोध करण्याचे मनोबल लोकांमध्ये निर्माण करणे या उद्देशासाठी संपूर्ण महाराष्ट्रात 'फुले, आंबेडकर विचारयात्रे'चे आयोजन करण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले. त्याचबरोबर इंदिरा काँग्रेसला बिगर-जातीयवादी पर्याय निर्माण करण्यासाठी जनता दल आणि त्यांचे समविचारी मित्रपक्ष यांना मदत करण्याचेही ठरविण्यात आले.

२ जानेवारी ते २६ जानेवारी १९९० या काळात महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांतून जाणारी फुले-आंबेडकर विचारयात्रा आयोजित करण्यात आली. या २६ दिवसांत श्री. शरद जोशी यांनी शंभराहून अधिक मोठ्या सभा आणि अनेक छोट्या सभांमधून भाषणे करून शेतकरी संघटनेच्या वाटचालीचा शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या पहाटेपर्यंतचा आढावा घेतला आणि त्या स्वातंत्र्यावर घाला पाडू पाहणाऱ्या जातीयवादी दुःशक्तींचे स्वरूप समजावून देऊन त्यांच्यापासून दूर राहण्याचेच नव्हे तर वेळ पडल्यास त्यांना प्राणपणाने विरोध करण्याचे आवाहन केले. या विचारयात्रेची सुरुवात म. ज्योतिबा फुले यांचे जन्मगाव कडगुण येथून झाली तर सांगतासमारंभ नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नावास आणलेल्या दीक्षभूमीवर झाला. नागपूरच्या दीक्षाभूमीवर दि. २८ जानेवारी १९९० रोजी झालेल्या या सांगता समारंभास संपूर्ण महाराष्ट्रातून हजर झालेल्या शेतकरी स्त्रीपुरूषलेकराबाळांच्या महासागराने या विचारयात्रेचे यश आणि जातीयवादी दुष्टशक्तींचे अपयश निश्चित केले.

या सांगता समारंभास पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग हजर राहिले होते आणि त्यांनी लाखो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत आपले सरकार शेतकरी हितालाच प्राधान्य देणार असल्याचे घोषित केले. शेतीमालाला रास्त भाव, शेतमजुराला न्याय मजुरी आणि कर्जमाफी नव्हे - कर्जमुक्ती ही सूत्र मानणारे आपले सरकार आहे याची त्यांनी ग्वाही दिली.

इकडे विधानसभा निवडणुकांची घोषणा झाली, आणि शेतकरी संघटनेने इंदिरा काँग्रेसला बिगरजातीयवादी प्रबळ पर्याय

**लोकसभा निवडणूक १९८९**
**शेतकरी संघटक, ४ डिसेंबर १९८९**

निर्माण करण्याच्या आपल्या कार्यक्रमाला सुरुवात केली. अर्थवादी कार्यक्रमाच्या पायावर उभ्या असलेल्या वेगवेगळ्या पक्षांची आघाडी महाराष्ट्रात तयार होऊ लागली. पुरोगामी लोकशाही आघाडी असे नाव धारण करणाऱ्या या आघाडीत जनता दल, शेतकरी कामगार पक्ष, सर्व कम्युनिस्ट पक्ष यांचा समावेश आहे. या आघाडीतर्फे महाराष्ट्रात सर्वच्या सर्व म्हणजे २८८ विधानसभा मतदार संघात उमेदवार उभे करण्यात आले. ज्या ठिकाणी इंदिरा काँग्रेस आणि जातीयवादी पक्षांच्या उमेदवारांना प्रबळपणे टक्कर देऊ शकेल असा उमेदवार या आघाडीच्या घटक पक्षांकडे नव्हता अशा ठिकाणी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते जनता दलातर्फे उभे राहिले आहेत. काँग्रेसविरोध तर शेतकऱ्यांमध्ये रुजलेला आहेच आणि आता शेतकऱ्यांच्या उगवू लागलेल्या स्वातंत्र्यसूर्याला गिळू पाहाणाऱ्या जातीयवादी दुष्ट शक्तींना पाठिंबा देण्याची पाळी आता शेतकऱ्यांवर येणार नाही. पुरोगामी लोकशाही आघाडीने आता बिगरजातीयवादी असा पर्याय, जो केंद्रातील शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण राबवू इच्छिणाऱ्या राष्ट्रीय मोर्चाशी नाते जोडणारा आहे, दिला आहे. गेली ४२ वर्षे शेतीच्या लुटीवर माजलेला काळा इंग्रज आणि समाजात फूट पाडून काळ्या इंग्रजांच्या या लुटीच्या व्यवस्थेला साहाय्यभूत ठरणारा जातीयवादाचा भस्मासूर या दोघांनाही एकाच घावात जमीनदोस्त करण्याची संधी सर्वसामान्यांच्या समोर या आघाडीने ठेवली आहे.

शिवबांनी रयतेला सरदारदरकदरांच्या पारतंत्र्यातून मुक्त केले, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांनी विषमतेवर आधारित समाजव्यवस्थेतून समाजाची सुटका केली तर महात्मा गांधींनी देशाला गोऱ्या इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त केले. आता काळ्या इंग्रजांची सत्ता संपुष्टात येत आहे, शेतकऱ्याचे स्वातंत्र्य येऊ घातले आहे, शेतीमालाचा रास्त भाव आणि शेतकऱ्याची कर्जमुक्ती घेऊन. याचे श्रेय कोणाला? शरद जोशी म्हणतात "२ ऑक्टोबर १९८९ रोजी दिल्लीला किसान जवान पंचायतीसाठी महाराष्ट्रातील ज्या मायबहिणी आल्या होत्या त्यांनाच या स्वातंत्र्याचे श्रेय आहे. महाराष्ट्राच्या कोरडवाहू भागातून दिल्लीला आलेली माझी बहीण की जिच्या पायाला जन्मात कधी चप्पल माहीत नाही; काटेकुटे दगडधोंडे टोचून जिच्या पायाचे तळवे जाड झालेले आहेत, जिच्या अंगावर अनेक गाठी मारलेले, वेगवेगळ्या रंगाची ठिगळे जोडलेले लुगडे आहे, जी हजारो मैलांवरून दिल्लीत आपल्याला चहाचा कपसुद्धा विकत घेता येणार नाही हे ध्यानात घेऊन घरून फाटक्या फडक्यात गुंडाळून चार भाकऱ्या घेऊन आली होती, त्या भाकऱ्या उन्हात वाळवून जपून ठेवत होती तिने दिल्लीकरांना भारतातील खऱ्या शेतकऱ्याचे दर्शन घडविले. या माझ्या बहिणीला शेतकऱ्याच्या येऊ घातलेल्या स्वातंत्र्याचे श्रेय आहे."

शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याचे खरे श्रेय या बहिणीला आहे, ती ज्या संघटित शक्तीच्या आधारावर आपले हक्क मिळविण्यासाठी दिल्लीपर्यंत पोहोचली त्या एकसंध संघटनेला आहे. ही संघटना टिकवून ठेवणे आवश्यक आहे आणि त्यासाठी, या स्वातंत्र्यसूर्याला ग्रासू पाहाणाऱ्या शेतकरीविरोधी इंदिरा काँग्रेस आणि समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करणारे जातीयवादी यांच्या रूपातल्या राहूकेतूंना दूर करणे आवश्यक आहे. तसा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहेच. पण निवडणूक प्रचाराच्या रणधुमाळीतील भूलभुलैयांच्या आहारी जाऊन त्या निर्धारात ढिलाई येता कामा नये. आजवर सर्वसामान्यांच्या आयुष्याची होळी करून मौजमजा करणाऱ्या या दुष्ट आणि भ्रष्ट शक्तींचा बीमोड करण्याची संधी आली आहे ती गमावली तर पुढल्या पिढीला पुन्हा दारिद्र्याच्या खाईत खितपत पडावे लागेल आणि 'उषःकाल होता होता.....' असं म्हणून पुन्हा एकदम आयुष्याच्या मशाली पेटविण्याची पाळी त्यांच्यावर येईल.

ही केवळ निवडणूक नव्हे तर शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, शेतीमालाला रास्त भाव आणि शेतमजुरांना न्याय्य मजूरी यांवरील हे सार्वमत आहे.

●

**(पान २० वरून)**

ताकीद द्यावी. एक पोटनिवडणूक जिंकण्याच्या मोहाखातर देश फोडू शकणाऱ्या आणखी एका वादाला त्यांनी खतपाणी घालू नये.

शेतकरी संघटनेच्या सगळ्या कार्यकर्त्यांना आणि शेतकऱ्यांना मी हात जोडून विनंती करतो, या जातीयवादी प्रचाराला बळी पडू नका. जो शेतकरी जातीच्या कारणाकरिता मते देईल तो शेतकरी संघटनेचाही घात करेल आणि स्वतःचाही आत्मघात केल्याशिवाय राहणार नाही.

या निवडणुकीत माझी काय अपेक्षा आहे? काय जिंकायचे आहे? ज्या दिवशी निवडणुकातील भूमिका आम्ही ठरविली त्या दिवशी आम्ही निवडणूक जिंकलो आहोत. राजवाड्यांत आणि गावठाणात कोंडले गेलेले हजारो कार्यकर्ते एकत्र आले आहेत. निवडणुकीच्या या निमित्ताने त्या भिंती तोडून एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून महिनाभर फिरले तरी मला पुरे. हजारो वर्षांच्या या भिंती आम्ही दूर करू शकलो. राजवाडा आणि गावठाण एकत्र झाले तर आमचा विजय निश्चित आहे. ह्या निवडणुकीत शुभकार्याचा मंगल प्रारंभ झाला असे मी म्हणेन, पण कोणत्या परिस्थितीत या ऐक्यानंतर मिळणारे यश आज यायचे की काही काळानंतर यायचे, एवढाच प्रश्न शिल्लक राहतो. गरिबांची लढाई प्रभावी करण्यासाठी आज एकाच घोषणेची आवश्यकता आहे. आम्ही सर्वांनी एक घोषणा करायची गरज आहे, "आज या दिवशी आमच्या जाती जाती गळून गेल्या, राख झाल्या."

मी मते मागत नाही. या निवडणुकीतील संघटनेची भूमिका आपल्यापुढे मांडली. गरिबांचे आंदोलन फुटून जाऊ नये आणि यशस्वी व्हावे याकरिता काय करावे हे सांगितले. आता शेवटचे एक वाक्य. या कसोटीच्या काळात असे वागा की ज्यामुळे तुमच्यावरच पश्चातापाची पाळी येऊ नये.

*जय भारत जय शेतकरी संघटना*

*(नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ करताना श्री. शरद जोशी यांनी दिलेले भाषण)*

# लोकसभेची मध्यावधी निवडणूक आणि शेतकरी संघटना

**मध्यावधी निवडणुकीची पार्श्वभूमी**

लोकसभेच्या निवडणुकीच्या धावपळीला सुरुवात झाली आहे. निवडणुकीची ही भाकड म्हैस मलीदा तर खूप खाऊन जाणार आहे, पण त्यातून काही निघण्याची आशा जवळ जवळ शून्य. इतक्या निरर्थक निवडणुका आजपर्यंत कधी झाल्या नाहीत आणि यापुढे होऊ नयेत अशी निदान प्रार्थना करायला हवी.

काश्मिर, पंजाब, तामिळनाडू आणि आसाम या राज्यांतील उग्रवादी आणि ठिकठिकाणचे नक्षलवादी आपापल्या प्रदेशांत जवळ-जवळ सार्वभौम सत्ता प्रस्थापित करून बसलेले आहेत. महागाईचा डोंब उसळला आहे. बेकारी वाढते आहे. इराकचे युद्ध आणि त्यामुळे निर्माण झालेली पेट्रोल टंचाईची परिस्थिती यामुळे दुष्काळात तेरावा महिना येऊन पडलेला आहे. सरकारी खजिना रिता आहे, एवढेच नव्हे तर, त्यात जे जे काही येऊन पडेल ते नोकरशहाच हडप करून टाकताहेत.

या परिस्थितीला तोंड कसे द्यायचे, कुणी द्यायचे? भारतीय जनतेने याचे एक उत्तर १९८९ सालच्या निवडणुकीत स्पष्ट दिले आहे. भारतीय जनतेचा अर्थशास्त्रज्ञांवर आणि तंत्रज्ञांवर फारसा विश्वास उरला नाही. त्यांचे बोलणे तिला समजतही नाही. आणि आजपर्यंत सगळे तंत्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ नुसते वांझच ठरले असे नाही तर त्यांच्या सल्ल्याप्रमाणे चालून देश अधिकाधिक खड्ड्यातच चालला आहे. तज्ज्ञ नव्हे पण निखळ सचोटीचा कुणी एक महात्मा सापडला तर तो निदान देशाचे अधःपतन तरी थांबवील ही त्यांची भावना. भारतीय परंपरा माणसाला ओळखते, पुस्तकांना नाही.

१९८९ साली याच कारणांनी मतदारांनी विश्वनाथ प्रतासिंग यांच्याकडे कल दाखविला. ज्यांच्या प्रामाणिकतेबद्दलच शंका ठेवायला जागा होती त्यांना थोडे बाजूला करून वर्षादीडवर्षात कसेबसे स्वतःच्या पायावर उभे राहणाऱ्या राष्ट्रीय मोर्चास सर्वात जास्त जागा मिळवून दिल्या. विश्वनाथ प्रतासिंगांच्या आसपास अनेक संशयास्पद मंडळी असतांनाही लोकांनी, निदान व्यक्तिशः त्यांना आशास्थान मानले. पण त्याबरोबर इतर पक्षांना आणि नेत्यांना संपवून टाकले नाही. इंदिरा काँग्रेस, भाजपा, दोन्ही अंगाचे कम्युनिस्ट पक्ष यांचेही काही स्थान टिकवून ठेवले. मतदाराचा कौल स्पष्ट होता. देशाची धुरा सांभाळायला समर्थ महापुरूष कोणीच नाही पण नेता म्हणून मानल्या जाणाऱ्या सगळ्या आंधळ्यापांगळ्यांनी एकत्र येऊन काम केले तर तेवढाच एक आशादायी पर्याय आहे.

पण हे आंधळे-पांगळे एकमेकांच्या आधाराने चालण्यापेक्षा एकमेकांच्या पायात पाय घालून पाडापाडी करण्यातच धन्यता मानू लागले. राष्ट्रीय मोर्चाचे सरकार पडले आणि चंद्रशेखर यांचे सरकार तर धड तीन महिनेही चालले नाही.

इंदिरा गांधींच्या काळात राष्ट्रपतींना रबरस्टँप बनविण्यात आले त्याचा सर्वात भयानक परिणाम यावेळी दिसून आला. चंद्रशेखर सरकार पडले त्यावेळी निवडणुका नव्याने घेण्यात अर्थ काहीच नव्हता, फक्त एक हताशपणा होता. लोकसभेच्या सदस्यांची पुन्हा निवडणूक लढविण्याची इच्छा नव्हती; निवडणूक म्हणजे हजार पंधराशे कोटी रुपयांचा चुराडा, निवडणूक म्हणजे दुर्मिळ पेट्रोलची उधळमाधळ, निवडणूक म्हणजे अतिबिकट काळात अधिकारहीन शासन खुर्चीवर ठेवणे, निवडणूक म्हणजे जातीयवादी कठमुल्लांना देशात धुमाकूळ घालण्याची खुले आम संधी. असे असतांनाही राष्ट्रपतींनी निवडणुका घेण्याचे ठरविले.

नव्याने निवडणुका घेतल्या म्हणजे लोकांचा कौल काही वेगळा येईल असे मानायला जागा नव्हती. १९८९ सालीही लोक पुढाऱ्यांविषयी उदासीन होते. आज त्या सर्वांविषयी घृणा तयार झाली आहे. एवढाच काय तो फरक. काँग्रेसविरोधकांच्या नाकर्तेपणामुळे ४० वर्षे देशाचा अधःपात घडवून आणणारी काँग्रेससुद्धा बरी अशी एक भावना आज आहे, पण काँग्रेसचे राज्य स्थापन झाले तर ती भावना धड तीन महिनेसुद्धा टिकायची नाही.

एखादा पक्ष बहुमत घेऊन निवडून आला तरी त्यामुळे काही देशाचे भले होणार आहे. अशीही परिस्थिती नाही. सगळे पक्ष एकजुटीने कामाला लागले तरीदेखील हे प्रश्न सोडवायला मोठे बिकट आहेत, कोण्या एका पक्षाच्या शासनाच्या तर ते आवाक्याबाहेरचेच आहेत. समजा, इंदिरा काँग्रेस सत्तेवर आली आणि त्यांनी नोकरशाही आटोक्यात आणायचे ठरवले, अगदी चांगला कार्यक्रम बनवला तरी अशा कार्यक्रमाला विरोधी पक्ष पाठिंबा देणार नाहीत. कारण ती त्यांची राजकीय आवश्यकता आहे. राष्ट्रीय मोर्चाचे शासन दिल्लीला आले आणि त्यांनी असाच कार्यक्रम हाती घेतला तर इंदिरा काँग्रेस, त्याच कारणाने त्याच्या विरोधात उभी ठाकेल.

**''कित्तावही'' राष्ट्रपती?**

राष्ट्रपती ही संस्था समर्थ असती तर त्यांनी सर्व पक्षांवर दडपण आणून संयुक्त सरकारे चालविण्यास त्यांना भाग पाडले असते. प्रत्येक पक्षाच्या शिखरस्थ नेत्याने अहंकारापोटी संयुक्त प्रयत्नांत सामील होण्यास विरोध केला असता तर त्या त्या पक्षांतील दुसऱ्या फळीच्या नेत्यांना बोलावूनसुद्धा राष्ट्रपतींना हे साधता आले असते. पण राष्ट्रपतींनी हे केले नाही. ते म्हणाले की मी ''कित्तावही'' राष्ट्राध्यक्ष आहे. कित्तावही अध्यक्ष म्हणजे घटनेतील तरतुदींच्या शब्दांवर बोट ठेवून चालणारे! कित्तावही अध्यक्षांनी निवडणूक घेण्याचा

लोकसभा मध्यवधी निवडणूक १९९१
शेतकरी संघटक, ६ मे १९९१

निर्णय दिला.

पण, कित्तावही अध्यक्षांचा निर्णय कित्तावही नव्हता. त्यात एक धूर्त राजकीय चाल आहे. अल्पमतधारी काँग्रेस विरोधकांतील फाटाफुटीचा फायदा घेऊन देशभर जवळ जवळ अविरतपणे सत्ता चालवत आले आहे. त्यांच्यात दुफळी, तिफळीच नव्हे तर अगदी बेबंदशाही माजली आहे आणि याचा अंकगणिती फायदा इंदिरा काँग्रेसला मिळणार आहे हे न समजण्याइतके राजीव गांधीही भोळे नाहीत आणि राष्ट्रपतीही आंधळे नाहीत. किंबहुना, जनता दलातील फुटीर गटास शंभरेक दिवस सत्तेवर ठेवण्यात, जनता दलात नजीकच्या भविष्यकाळात भरून निघणार नाही अशी बेदिली माजावी एवढाच त्यांचा डाव होता.

## आर्थिक कार्यक्रमांचे वावडे असलेले पक्ष

निवडणुकांच्या घोषणा झाल्या, वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवार याद्या जाहीर होऊ लागल्या, वेगवेगळ्या पक्षांचे जवळ-जवळ एकाच तोंडावळ्याचे जाहिरनामे त्यांच्या लेखकांनी तरी पुन्हा एकदा तपासून पाहिले असावेत किंवा नाही याबद्दल शंका आहे. देशाला विकासाच्या मार्गाकडे समर्थपणे नेणारा विचारही कोणत्या पक्षाकडे नाही, असे काही ऐतिहासिक सामूहिक कर्तृत्व करण्याची इच्छासुद्धा कोणत्या पक्षाकडे नाही. देशापुढील सगळ्यात मोठे संकट आहे आर्थिक. पण कोणत्याच पक्षाच्या ठळक घोषणांत आर्थिक प्रश्नांचा उल्लेखही नाही. येत्या निवडणुकीत आर्थिक प्रश्नांना काही थाराच नाही.

इंदिरा गांधींनी निवडणुका जिंकण्यासाठी ''गरिबी हटाव'' सारख्या अतिरेकी घोषणा दिल्या. पण त्यांच्या अतिरेकात निदान अर्थवाद होता. आता सर्वच पक्ष निव्वळ राज्यकारणी बनले आहेत. इंदिरा काँग्रेस स्थैर्याचे तुणतुणे वाजवते आहे. पण स्वातंत्र्यानंतरच्या ३० वर्षात तरी स्थैर्याला काही तोटा नव्हता! पण देशाची काही प्रगती झाली नाही. साठून राहिलेल्या, शेवाळ्याने भरलेल्या दुर्गंधी तळ्याला ते स्थिर असले तरी कोणी पिण्याकरिता वापरीत नाही. राखीव जागांसारख्या किरकोळ प्रश्नाला अवास्तव महत्त्व देऊन आपण सामाजिक अन्याय दूर करीत असल्याची वल्गना हा आणखी एक नमुना. आर्थिक कार्यक्रमावर आता कुणाचा विश्वास नाही याचा सर्वात नागडावाघडा फायदा घेत आहेत ते भाजपा व शिवसेनेसारखे जातीयवादी. हताश झालेल्या जनतेला राम मंदिरासारख्या किरकोळ प्रश्नावर पेटवून सत्ता हाती घेण्याचा मनसुबा आणि डाव त्यांनी चांगला रचला आहे.

संसदेच्या निवडणुकीचे भोंगे लवकरच वाजू लागतील, प्रचाराचा गदारोळ उठेल. पूर्वी गडाचा बुरूज टिकेनासा झाला की त्याच्या पायात एक तरूण जोडपे गाडत असत, त्यांच्या डोक्यावर शिळा ठेवत असतांना त्यांनी मारलेल्या किंकाळ्या ऐकू येऊ नयेत म्हणून ढोल-नगारे, तुताऱ्याभेऱ्यांचा एकच हलकल्लोळ उडवीत. या निवडणुकीच्या गोंगाटात भारतातील जनसामान्यांचाच नव्हे तर सगळ्या देशाचाच बळी जाण्याची खरी भीती आहे.

## शेतकरी संघटना आणि राजकारण : निवडणुकीबाबत उदासीनता

अशाही परिस्थितीत एकदा निवडणुका होणार म्हटल्यानंतर हौसे, गवसे आणि नवसे यांची धावपळ सुरू व्हायची राहिली नाही. कोणी उमेदवारी मिळावी म्हणून तर कोणी निवडणुकीच्या या सगळ्या बाजारात हाती काही लागते का ते पाहावे म्हणून धावपळ करू लागले. निवडणुकीच्या निकालासंबंधीच्या आपापल्या आडाख्याप्रमाणे पुढारी मंडळी घाणीवरील माश्यांप्रमाणे एका ढिगावरून दुसऱ्या ढिगाऱ्यावर जाऊन बसू लागले. सगळ्यात वाईट परिस्थिती समाजवादी जनता (दलाची) पार्टीची. पंतप्रधान त्यांचा, केंद्रीय मंत्रीमंडळ त्यांचे. पण मंत्रीमंडळातील कितीजणं काँग्रेसमध्ये गेली, जनता दलात गेली किंवा अगदी भाजपातसुद्धा गेली याचा हिशोबसुद्धा सांगणे कठीण आहे.

या उलट, एक मोठी अभिमानाची गोष्ट. किरकोळ एकदोन अपवाद सोडता शेतकरी संघटनेच्या सर्वच कार्यकर्त्यांनी या निवडणुकीकडे फारसे लक्ष दिले नाही. आजही, संघटनेने कोणत्याही पक्षाकडे कल दाखविलेला नाही. जातीयवादी पक्षांचा कडवेपणाने विरोध हे खरे, पण इतर पक्षांपैकी कोणताही शेतकऱ्यांना विशेष प्रेमाचा वाटावा अशी काही स्थिती नाही.

## संघटनेची राजकारणविषयक भूमिका

निवडणुकांविषयीची ही उदासीन भूमिका संघटनेच्या राजकारणविषयक भूमिकेशी सुसंगत आहे. या विषयी मी अनेकदा लिहिले आहे. त्याची पुनरावृत्ती येथे करण्याची गरज नाही. पण सारांशाने सांगायचे झाले तर संघटनेची राजकारणाविषयीची सूत्रे,

१) संघटनेचा हेतू राज्यसत्ता मिळविणे हा नाही, राज्यसत्तेवर गेलेली शेतकऱ्यांची मुलेसुद्धा शेतकऱ्यांची राहात नाहीत.

२) शेतकऱ्यांचे शोषण हे आजच्या व्यवस्थेचे सूत्र आहे. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी हे सूत्र बदलणार नाही. थोडक्यात, शेतकऱ्यांच्या दृष्टीने सगळेच पक्ष सारखेच चोर आहेत.

३) शेतकऱ्यांना शेतीमालाचा भाव हा संघटित ताकदीच्या आधारानेच मिळू शकेल, निवडणुकांनी नाही. परंतु, निवडणुकांचा उपयोग आंदोलनाची ताकद वाढविण्याकरिता केला पाहिजे. हा उपयोग कसा करता येईल या संबंधी वेगळे वेगळे धोरण प्रत्येक निवडणुकीच्या आधी स्वतंत्रपणे ठरवावे लागेल.

४) गुणवत्तेच्या आधाराने कोणत्याही पक्षाविषयी फार काळ मैत्रीची भावना असणे संभवच नाही. पण, अंकगणिती हिशोबाने परिस्थितीनुरूप संघटनेस वेगवेगळ्या पक्षांची ''छोटा चोर, मोठा चोर'' या हिशोबाने संबंध ठेवावे लागतील आणि शेतकरीविरोधी पक्षांमध्ये कोणी एक फार बळजोर होत नाही अशी काळजी घ्यावी लागेल.

५) स्वातंत्र्यानंतर जवळ जवळ पूर्णवेळ सत्तेवर असलेला इंदिरा काँग्रेस पक्ष हा शेतकऱ्यांचा शत्रू क्रमांक एक

खरा पण जातीयवादी - मग ते भगवे, हिरवे, निळे, पिवळे – कोणत्याही रंगाचे असोत, केवळ महाराक्षस आहेत.

**सर्वच पक्ष चोर**

१९८७ साली चाकणला कांद्याचे पहिले आंदोलन उभे राहिले त्यावेळी दिल्लीत जनता पक्ष सत्तेवर होता. त्याच काळात निपाणी भागातही तंबाखूचे पहिले आंदोलन झाले. महाराष्ट्रत तरी शेतकरी आंदोलनाची सुरुवात ही काँग्रेस सत्तेवर नसतांना झाली. सुरुवातीच्या काळात, त्यामुळे, शेतकरी संघटना हे काँग्रेसचेचे पिल्लू आहे असाही प्रचार चाले. जनता पक्षाच्या शासनाची वाताहत झाली, इंदिरा लाटेवर काँग्रेसचे शासन भरभक्कम शक्तीने सत्तेवर आरूढ झाले. त्या काळात चाकणचे आणि नाशिकचे आंदोलन पेटले. संघटनेच्या आंदोलनात सामील होणाऱ्यांत विरोधी पक्षांविषयी सहानुभूती बाळगणारी कार्यकर्ती मंडळी मोठ्या प्रमाणावर होती. त्यामुळे संघटनेची प्रवृत्ती साहिजकच इंदिरा काँग्रेसविरोधाकडे झुकणारी होती.

१९८४ सालच्या निवडणुकीत शेतकऱ्यांचा प्रश्न निवडणुकीतला सर्वप्रथम मुद्दा बनवण्याचा प्रयत्न संघटनेने गावबंदीच्या कार्यक्रमाने केला. पण, निवडणुकांच्या दोनच महिने आधी इंदिरा गांधीची हत्या झाली आणि गावबंदीच्या कार्यक्रमाचा प्रभाव फिका पडला. वर्ध्यासारख्या एखाद्या जिल्ह्यातच तो कार्यक्रम अगदी ८४ च्या निवडणुकांतही प्रखरपणे राबविण्यात आला. १९८४ ची निवडणूक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर झाली नाही, आर्थिक प्रश्नांवर झाली नाही, इंदिराजींच्या हत्येच्या दुःखाच्या पार्श्वभूमीवर झाली. त्यामुळे, इंदिरा काँग्रेसची सत्ता हटण्याचे किंवा कमजोर होण्याचे दूर राहिले. राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची सत्ता कधी नव्हे इतकी संख्याबळात मजबूत झाली, विरोधी पक्षांचा पार धुव्वा उडाला.

हाती आलेल्या बेबंद सत्तेचा उपयोग राजीव गांधींच्या शासनाने कोणताही धरबंध न ठेवता शहरी सुखवस्तुंच्या ऐषारामासाठी वापरायला सुरुवात केली. अशा कठीण

# शेतकरी संघटना कोणाचाही प्रचार करणार नाही

**शेतकरी भावांनो,**

**आणि मायबहिणींनो,**

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. या निवडणुकीत शेतकरी संघटना कोणत्याही पक्षाच्या बाजूने उभी राहाणार नाही हे पुणे पंचायतीच्या वेळीच स्पष्ट झाले होते. या निर्णयाचे स्पष्टीकरण देणारा माझा लेख शेतकरी संघटकच्या याच अंकात दिला आहे.

निवडणुकीच्या काळात संघटनेच्या कार्यकर्त्यांकडे राबवायचा असा महत्त्वाचा इतर कार्यक्रम कोणताच नाही. कोणत्याही पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या प्रचारात शिरण्याचे संघटनेच्या कार्यकर्त्यांना काहीच प्रयोजन नाही. व्यक्तिगत पातळीवर कोणा उमेदवारास मदत करावयाची असल्यास तशी मदत संघटनेचा बिल्ला लावून तरी करू नये.

आपण कितीही नाही म्हटले तरी निवडणुकीतील सगळा गदारोळ आपल्या कानीकपाळी पडणारच आहे. या वेळच्या प्रचारात घटनेने त्याज्य म्हटलेले असतांनासुद्धा, जातीयवादी पक्षांनी जातीयवादाचा उघड उघड वापर करून आपापल्या उमेदवारांचा प्रचार करण्याचा विडा उचलला आहे. जातीयवादाचे विष हे समाजाच्या एकसंधतेला अत्यंत घातक असल्याचे संघटनेने वारंवार मांडले आहे. 'शेतकरी तितुका एक एक' या संघटनेच्या सूत्राचा अर्थच तो आहे.

अर्थवादी चळवळीला जातीयवादासारखा क्षुद्रवादाने आजपर्यंत नेहमीच मागे ढकलले आहे. १९८९ साली हाती येत असलेले शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यही या जातीयवादी भस्मासूराने गिळून टाकले. आपलाही त्यावेळचा थोडा गाफीलपणा नडला. या भस्मासुराला नष्ट करण्याची संधी पुन्हा चालून आली आहे. कदाचित् ही शेवटची संधी असेल.

गेल्या वर्षदीडवर्षातील उपद्व्यापांना मिळालेल्या यशामुळे उन्मत्त झालेल्या भस्मासुराने या निवडणुकीत घटना पायदळी तुडवून आचार संहितेचा भंग करण्याचा चंग बांधला आहे. त्याला नष्ट करण्याची ही संधीच चालून आली आहे.

त्यासाठी या जातीयवादी भस्मासुराच्या निवडणुकीतील कृष्णकृत्यांचे पुरावे गोळा करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांचे देखरेख गट प्रत्येक मतदारसंघात तयार झाले आहेत. हे देखरेख गट शिवसेना, भाजपा या जातीयवादी पक्षांवरच नव्हे तर इतरही पक्षांवर देखरेख ठेवून त्यांच्याविरूद्ध पुरावे गोळा करणार आहेत. ज्या ज्या कार्यकर्त्यांना निवडणुकीतील कृष्णकृत्यांची माहिती मिळेल त्यांनी ती माहितीपत्रके पोस्टर्स, भाषणाचा टेप, भित्तीपत्रकांचे फोटो, फलकांचे फोटो वगैरे, आपल्या भागातील देखरेख गटांच्या कार्यकर्त्यांकडे पाठवावी किंवा आंबेठाण येथील नियंत्रण कक्षास कळवावी.

या पुराव्यांच्या साहाय्याने या जातीयवादाच्या भस्मासुराला आपल्या मार्गातून दूर करणे शक्य आणि आवश्यक आहे.

आर्थिक चळवळींचा गळा घोटणाऱ्या जातीयवादाचा निःपात करण्याची ही संधी आहे आणि वर म्हटल्याप्रमाणे कदाचित् शेवटचीच संधी आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण ही संधी वापरण्यात पूर्णतः यशस्वी होऊ आणि आपल्या आर्थिक आंदोलनाचा मार्ग खुला करून घेऊ याबद्दल मला विश्वास आहे.

१९९१ च्या लोकसभा निवडणुका या महाराष्ट्रापुरत्या तरी जातीयवादी प्रचाराने डागाळलेल्या शेवटच्या निवडणुका ठराव्यात.

**– शरद जोशी**

काळात, राजीव गांधींविरूद्ध एक अक्षर उच्चारणे कठीण झाले असतांना शेतकरी संघटनेने ''राजीवस्त्रांची'' होळी करण्याचे धारिष्ट्य दाखविले. नंतर, विश्वनाथ प्रताप सिंगांना राजकीय जीवनात स्थान मिळवून देण्याकरिता मोठे प्रयत्न केले. त्याचे फळ १९८९ च्या निवडणुकीत मिळाले. कोणीही बलदंड पक्ष राहिला नाही. एवढेच नव्हेत तर, शेतीमालाला भाव आणि शेतकऱ्याची कर्जमुक्ती या कार्यक्रमाची ग्वाही देणारे विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधान झाले.

त्यानंतर गेल्या १६ महिन्यांत काही सिद्ध झाले असेल तर ते एवढेच की कोण्या राजकीय पक्षाच्या आधाराने काही किरकोळ फायदे पदरात पाडून घेता येतील पण या फायद्यांच्या मर्यादा फारच तोटक्या असतील. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे शिवधनुष्य आपल्याला पेलत नाही हे विश्वनाथ प्रताप सिंगांच्याही फार थोड्या काळातच लक्षात आले. शेतीमालाचा भाव काय आणि कर्जमुक्ती काय, त्यांनी शक्य तितका अंगचोरपणा दाखवला. शेवटी, कर्जमुक्तीच्या बाबतीत शहरवासियांकडून होणाऱ्या कोल्हेकुईला घाबरणारे पंतप्रधान आरक्षणासारख्या क्षुल्लक विषयावर युवक विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रक्षोभ सोसायला तयार झाले.

## नुसता समतोल पुरेसा नाही

या काळातला आणखी एक धडा घेण्यासारखा आहे. सत्तेचा समतोल शेतकरी आंदोलनास पोषक खरा, शेतकरी आंदोलन प्रभावी होण्यासाठी, किंबहुना ती एक आवश्यक अट आहे, पण राजकीय सत्तेचा समतोल असला म्हणजे आंदोलनाच्या यशासाठी राजकीय भूमिका तयार होतेच असे नाही. त्या करिता निदान आणखी दोन अटी पुऱ्या होणे आवश्यक आहे. राजकीय समतोल असतांना शासनाचे नेतृत्व जर एखाद्या प्रामाणिक आणि सज्जन अशी प्रतिमा असलेल्या नेत्याकडे असेल तर आंदोलन उभे राहणे कठीण होते. मोरारजी देसाई, इंदिरा गांधी, शंकरराव चव्हाण यांच्या सारख्या उग्र मुखवट्याचे शासक आंदोलन उभे करण्याचे निम्मे काम स्वतःच करून टाकतात. या उलट, विश्वनाथ प्रताप सिंग किंवा शरद पवार अशा नेत्याची करणी कशीही असो त्यांच्याविरूद्ध जनसामान्यांत संतापाचा वडवानल उफाळून येत नाही.

आंदोलनाची आणखीही एक आवश्यक अट आहे. राजकीय समतोलातील शासन सर्वार्थाने परके वाटले पाहिजे. शासनाकडून शेतकऱ्यांच्या हिताकरिता काही होईल अशी आशासुद्धा शिल्लक राहता कामा नये.

## राष्ट्रीय कृषिधोरण व राजकीय पक्ष

१९८९ साली सत्तेचा समतोल निर्माण झाला पण शेतकरी आंदोलनास आवश्यक अशा बाकीच्या अटी पुऱ्या झाल्या नाहीत. शेतकरी आंदोलनाने घाव घातला पण जखमी सावज निसटून गेले.

## कार्यक्रमशून्य राजकारण

येत्या निवडणुकांच्या राजकीय तारांगणांत इंदिरा काँग्रेस, जनता दल, कम्युनिस्ट इत्यादि ओळखीच्याच चेहऱ्यामोहऱ्याचे पक्ष आहेत. निवडणुकीत तोंडाला येतील ती आश्वासने देणे, प्रलोभने दाखविणे, पैशाचा अफाट व्यापार करणे, आवश्यक तर जाती, धर्म, भाषा इत्यादि भेदाभेदांचा कुशलतेने वापर करून निवडणुका खिशात टाकण्याचे तंत्र वाकबगारपणे हाताळणारी मंडळी या पक्षांत भरलेली आहेत. यांच्यापैकी कोणाकडेच ठाम विचार असा नाही आणि कार्यक्रम अंमलात आणण्याची ताकद त्याहूनही नाही.

## राष्ट्रीय कृषिधोरणाचा अर्थ

यांच्यामध्ये निवड काय करायची? राष्ट्रीय कृषि धोरणाचेच उदाहरण घ्या. या धोरणासंबंधी मी काय शिफारशी केल्या ते काही नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. शेतकरी संघटनेच्या आणि आंदोलनाच्या गेल्या दहा वर्षांच्या काळात तो जो एक विचार पुढे आला त्याचे सारांशाने मांडलेले रूप म्हणजे मी सादर केलेला मसुदा. त्यात नवीन असे काहीच नव्हते. शेतीविषयीचे धोरण हा काही राष्ट्रीय धोरणातील एक छोटा अंश नाही तर महत्त्वाचा आणि मध्यवर्ती भाग आहे. शेतीचे धोरण एकदा सुनिश्चित झाले म्हणजे इतर सर्व क्षेत्रांतील धोरणे आपोआप ठरतात; व्यापार, वाहतूक, शिक्षण आणि संरक्षणविषयक धोरणसुद्धा त्या आधारानेच ठरते.

शेतीत तयार होणाऱ्या बचतीवर भांडवलनिर्मिती अवलंबून आहे. ही बचत शेतकऱ्यांकडून ओरबाडून नेण्याची नेहरूपद्धती देशाला हानिकारक ठरली आहे. काळ्या इंग्रजांच्या या राजवटीमुळे देशावर सर्व बाजूंनी आर्थिक, सामाजिक आणि राजकीय संकटे कोसळत आहेत. शेतीतील बचत शेतकऱ्यांकडे राहिली तर त्यामुळे शेतीतील उत्पादन वाढते, शेतीतील गुंतवणूक वाढते, शेतावर राबणाऱ्याचे जीवनमान सुधारते, बिगरशेती उद्योगधंदे सुरू होतात. शेतीवरील लोकसंख्येचा बोजा कमी होतो. थोडक्यात, शेतीमालाचा भाव हा विकासाचा एकसूत्री कार्यक्रम आहे.

शेतीचा विकास हा सुधारल्या तंत्रज्ञानाने होतो; पाणी, बियाणे, खते, औषधे, बाजारपेठ, पतपुरवठा साठवणूक अशातऱ्हेची व्यवस्था सुधारल्यानेही होतो. पण तंत्रज्ञान भलेही सुधारले आणि व्यवस्था भरभक्कम झाली पण शेती जर तोट्याची राहिली तर शेतीचा विकास शक्य नाही. सत्तावीस नक्षत्रांतील पावसाळ्याची नऊ वजा केली तर उरते शून्य असा हिशोब आहे.

शेतकऱ्यांची मागणी दयाधर्माची नाही, भिकेची नाही. जो कष्ट करील त्याला घामाचे दाम मिळावे, यासाठी सर्व देशातील नेहरूप्रणित लायसेन्स्-परमिट आणि सूट-सबसिडीची व्यवस्था मोडीत काढून कार्यक्षम अर्थव्यवस्था तयार झाली पाहिजे. त्यासाठी पतपुरवठा, पीकविमा, बाजारपेठ, आयातनिर्यात, शेतीमालावरील प्रक्रिया या सर्व विषयांची धोरणे कोणत्या स्वरूपाची असली पाहिजेत यावर माझ्या मसुद्यात मोठा भर आहे.

या प्रकारचे धोरण म्हणजे चाळीस वर्षांतील काळ्या इंग्रजांच्या सत्तेवर ओढलेला शेतकऱ्यांचा आसूडच होय. याला नोकरशाही कडाडून विरोध करणार हे स्पष्टच होते. राजकीय प्रबळ इच्छाशक्तीचा पाठिंबा मिळाला तर धोरणाच्या मसुद्याला निदान संसदेची मान्यता मिळण्याची शक्यता आहे. राजकीय इच्छाशक्तीच दुबळी ठरली तर शेतकऱ्यांचे

ऐकणारे दिल्लीच्या पिशाचमहालात कुणी नाही.

## राष्ट्रीय कृषिधोरण आणि जनता दल

विश्वनाथ प्रताप सिंगांनी मला मसुदा तयार करायला सांगितला हे खरे, पण पहिल्यापासूनच मी तयार केलेला मसुदा त्यांना राजकीय अडचणीत आणील अशी धाकधूक त्यांना वाटतच होती. तसे त्यांनी एकदा बोलूनही दाखविले होते. त्यांना भेटायला येणाऱ्या लोकांत दररोज आलतूफालतू लोकांची खूप गर्दी असे. अगदी, आपल्या पाल्यांना इंजिनिअरिंग, मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळविण्यासाठी पंतप्रधानांचे वजन वापरण्याचे प्रयत्न करणाऱ्या लोकांचीसुद्धा एकच गर्दी असे. ऑगस्ट १९९० पासून नोव्हेंबर १९९० पर्यंत पंतप्रधानांना राष्ट्रीय कृषि नीतीचा मसुदा पाहायला आणि त्यावर चर्चा करायला वेळ मिळाला नाही यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. मसुद्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी अधिकारीवर्गाचाच एक गट तयार केला त्या वेळी अधिकारीवर्ग आणि शेतकरी आंदोलन यांच्यात समझोता निघण्याची शक्यता नाही याची जाणीव त्यांनाही असली पाहिजे. किंवा या गटाच्या चर्चेतून काही निष्पत्ती झालीच तरी त्यापायी खूप वेळ निघून जाणार आहे हे त्यांच्या लक्षात आले नव्हते असे कसे म्हणता येईल? मंडल आयोगाच्या प्रश्नावर तडकाफडकी घोषणा करू शकणारे पंतप्रधान राष्ट्रीय कृषिनीतीच्या बाबतीत पावले मागे ओढतात याचा अर्थ स्पष्ट आहे. निवडणुकीच्या पूर्वी, गरजेपोटी का होईना, शेतकरी आंदोलनाच्या इतक्या जवळ आलेल्या नेत्याला शेतकऱ्यांच्या मागणीकडे लक्ष देणे पंतप्रधानपदी बसल्यानंतर परवडत नाही, हे स्पष्ट झाले.

## राष्ट्रीय कृषिधोरण आणि देवीलाल

चंद्रशेखर शासनाने घेतलेली भूमिका त्याहूनही शेतकरीविरोधी होती. चौधरी देवीलाल यांचे स्थान त्या शासनात असे काही भक्कम की शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ताऊजी बोलतील तेच खरे! ताऊजींचा आणि शेतीचा तसा संबंध काही नाही. शेतकऱ्याच्या नावावर राजकारण करू पाहाणारे जे अनेक पुढारी देशात झाले त्यांतले ते एक. इतरांच्या तुलनेने ते जास्त यशस्वी झाले, इतकेच. त्यांचा पाठिंबा खरा जातीच्या आधारावर. त्यांच्या जिभेवर ग्रामीण विरूद्ध शहरी संघर्षाच्या घोषणा. पण शेतकऱ्यांच्या समस्येचे जरासुद्धा आकलन नसलेले ताऊजी शेतकऱ्यांचा कार्यक्रम काय सांगतात? शेतकऱ्यांनी सत्ता हाती घेतली पाहिजे, शेतकऱ्यांची मुले वरिष्ठ नोकरदार झाली पाहिजेत, नियोजन मंडळात त्यांचे प्रतिनिधी पाहिजेत, परदेशी राजदूतात शेतकऱ्यांची मुले पाहिजेत. शेतकरी-कल्याणाचा त्यांचा परमोच्च कार्यक्रम म्हणजे तीस हजार रुपयांच्या सबसिडीने शंभरेक छोटे डॉक्टर वाटणे आणि पंचतारांकित हॉटेलातील अतिमहागड्या भोजनात शेतकऱ्यांना निम्म्याने सूट देणे!

ताऊ आणि त्यांच्या भोवती जमलेली मंडळी व त्यांची वर्तणूक अशी की सर्वसामान्य सज्जन माणसांच्या मनात त्यांच्याविषयी जुगुप्सा निर्माण होते. शेतकऱ्यांच्या नावाने मिरविणाऱ्या या मंडळींमुळे इमानदार शेतकरी आंदोलनाचे प्रचंड नुकसान झाले.

ताऊजींनी सरळ सरळ नोकरशहांनी तयार केलेलाच तथाकथित कृषिधोरणाचा मसुदा स्वीकारला. घाईघाईने तो मसुदा मंत्रीमंडळाकडूनही मंजूर करून घेण्याचा त्यांचा इरादा होता. पण मसुदा तातडीने मान्य करण्यातला धोका स्वतः पंतप्रधानांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी तो मसुदा विश्वविद्यालये आणि इतर संस्था यांच्याकडे टिकाटीप्पणीसाठी पाठविण्याचा आग्रह धरला.

## राष्ट्रीय कृषिधोरण आणि इंदिरा काँग्रेस

इंदिरा काँग्रेसला तर आमच्या राष्ट्रीय कृषिनीतीविषयी आपुलकी वाटण्याचे काहीच कारण नाही. कारण, हे नवीन धोरण म्हणजे त्यांच्या चाळीस वर्षांच्या सर्वच कारभाराचा पंचनामा आहे.

थोडक्यात, धोरण आणि कार्यक्रम यांच्या आधाराने शेतकऱ्यांचा असा आज कोणताच पक्ष नाही आणि सत्तेचा समतोल राखण्याकरिता संघटनेला आपली पासंग वापरण्याचीही आवश्यकता नाही. हे लक्षात घेतले म्हणजे शेतकरी संघटना आणि कार्यकर्ते येत्या निवडणुकीविषयी उदासीन असावेत हे त्यांच्या प्रगल्भतेचे लक्षण आहे.

## खरा मुकाबला जातीयवादी ब्रह्मराक्षसाशी : पंचायतीचा सूचक निर्णय

पुण्यातील पंचायत चालू असतानाच या निवडणुकांचे वारे वाहू लागले होते. त्यामुळे पंचायत पुरी भरायच्या आधीच विसर्जित करावी लागली. पंचायतीने फक्त एकच निर्णय घेतला आणि तो म्हणजे, जातीयवादी पक्षांची निवडणुकीसाठी असलेली मान्यता रद्द करण्यात आली नाही तर मतदान केंद्रे उघडू न देण्याचा सत्याग्रह करणे. निवडणूकप्रक्रियेमध्ये, प्रतिकात्मक का होईना, अडथळा आणण्याचा सत्याग्रहाचा निर्णय म्हणजे संघटना कोणत्याही पक्षाच्या बाजूने उभी राहणार नाही याचे सूचकच आहे.

## निवडणूक आयोगापुढील अर्ज

पंचायत झाल्यानंतर त्या वेळेपर्यंत जमा झालेल्या ५३,००० सह्यांसहित राष्ट्रपतींना द्यावयाचे निवेदन १४ मार्च १९९१ रोजी राष्ट्रपतींपुढे ठेवण्यात आले. त्यांनी ते निवेदन पंतप्रधानांकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविल्याचे औपचारिक उत्तरही दिले, पण त्यामुळे जातीयवादी पक्षांना निवडणुकीत भाग घेण्याची घटनेतील तरतुदींप्रमाणे परवानगी आहे वा नाही हा प्रश्न तडीस लागण्याची काही शक्यता दिसली नाही. त्यामुळे हा प्रश्न धसास लावण्यासाठी निवडणूक आयोगापुढे एक अर्ज करण्यात आला. या अर्जातील युक्तीवाद साधा आणि सरळ आहे.

घटनेच्या प्राविधानातच, भारतीय गणराज्य हे समाजवादी, निधार्मिक आणि लोकशाही असल्याची ग्वाही आहे.

जातीजमातींमध्ये वंश, धर्म, जात, भाषा, प्रदेश यांच्या आधाराने वैरभावना निर्माण करणे हे भारतीय दंडसंहितेनुसार गुन्हेगारी कृत्य आहे.

लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ च्या कलम १२३ प्रमाणे धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या आधाराने मते मागणे हा भ्रष्ट मार्ग ठरविण्यात आला आहे, आणि त्यास शिक्षा सांगितली आहे.

शिवसेना सुमारे २५ वर्षांपूर्वी स्थापन झाली व तेव्हापासून प्रथमतः दाक्षिणात्य, मग

गुजराथी, मग पुरभैये, कानडी अशा समाजांविरुद्ध वैरभावना निर्माण करण्याचा कार्यक्रम त्यांनी कित्येक वर्षे राबविला.

अलिकडे अलिकडे त्यांनी हिंदुत्व मांडण्यास सुरुवात केली आहे. व्यवहारात त्यांच्या या हिंदुत्वाचा अर्थ असा की लोकांच्या मनातील विद्वेषभावनांवर फुंकर घालणे, श्रीनगर किंवा इतर ठिकाणच्या काही मुसलमान व्यक्तींच्या कृत्यांचे दाखले द्यायचे आणि त्यामुळे हिंदू तेवढे जात्याच राष्ट्रप्रेमी आणि मुसलमान तेवढे, विरुद्ध पुरावा नसेल तर राष्ट्रद्रोही; त्यांना सर्वांना पाकिस्तानात पाठविले पाहिजे, मशिदी पाडल्या पाहिजेत, हिंदु राष्ट्र तयार झाले पाहिजे अशा तऱ्हेचा विचार म्हणजे शिवसेनेचे हिंदुत्व.

अशा तऱ्हेचा विचार करून १९८७ साली शिवसेनेने विलेपार्ले येथील एक पोटनिवडणूक जिंकली.

ऑगस्ट १९८९ मध्ये शिवसेनेने निवडणूक आयोगाकडे राज्यस्तरावरील राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी अर्ज केला. त्यासाठी शिवसेनेची एक घटनाही त्यांनी निवडणूक आयोगापुढे ठेवली. आजपर्यंत ही घटना गुलदस्तात ठेवण्यात आली आहे. या घटनेत शिवसेना निधर्मी व लोकशाहीवादी पक्ष असल्याचे जाहिर केले आहे. या दस्तावेजाच्या आधाराने शिवसेनेस राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली.

७ एप्रिल १९८९ रोजी, विलेपार्ले येथील पोटनिवडणुकीत शिवसेनेचे प्रमुख रमेश प्रभु यांची झालेली निवडणूक मुंबई उच्च न्यायालयाने भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध झाल्याने रद्द ठरविली.

त्यानंतरही शिवसेना हिंदुत्वाचा प्रचार करणार, शिवसेनेचा लोकशाहीवर विश्वास नाही, निवडणूक आयोगापुढे सादर केलेला दस्तावेज म्हणजे निवडणूक चिन्ह मिळविण्यासाठी केलेले नाटक होते असे खुलेआमपणे शिवसेनेचे नेते गुरकावीत होते.

१९८९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत त्यांनी आपला विषारी प्रचार चालू ठेवला आणि विधानसभेवर भगवा झेंडा फडकावण्याच्या उन्मादात १९९० च्या विधानसभा निवडणुकीत तर शिवसेनेच्या नेत्यांनी अत्यंत बेताल आणि निरर्गल प्रचार केला.

शिवसेनेचा प्रचार हा संविधानविरोधी होता असा पहिला निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने वामनराव महाडिक यांची निवडणूक रद्द ठरवताना दिला. त्यानंतर गोरेगांव, केज, कुर्ला येथील शिवसेनेच्या उमेदवारांच्या निवडणुकाही मुंबई उच्च न्यायालयाने रद्द ठरविल्या आहेत, एवढेच नव्हे तर शिवसेनेचे नेते बाळ ठाकरे, मनोहर जोशी आणि छगन भुजबळ यांच्यावर गुन्हेगारीची व्यक्तिगत जबाबदारी ठेवण्याचे ठरविले आहे.

मान्यता मिळविण्यासाठी शिवसेनेने कपट नाटक केले, निवडणूक आयोगासमोर दिलेल्या वचनाचा खुले आम भंग केला, अशा तऱ्हेने ते प्रचार करत राहिले तर जातीवैमनस्याचा भडका उडण्याचा धोका आहे. यासाठी निवडणूक आयोगाने शिवसेनेला बहाल केलेली मान्यता काढून घ्यावी. असा अर्ज शेतकरी संघटनेतर्फे निवडणूक आयोगाकडे करण्यात आला.

या अर्जाविरूद्ध शिवसेनेच्या वकिलांनी वकिली डावपेचाचे युक्तिवाद केले. कोणत्याही राजकीय पक्षाला एकदा मान्यता दिली की निवडणूक आयोगाला ती मान्यता रद्द करण्याचा काहीही अधिकार नाही असा त्यांचा युक्तिवाद होता. यापुढे जाऊन त्यांनी असेही तर्कट मांडले की निवडणूक आयोगाला मान्यता काढून घेण्याचा अधिकार असो वा नसो, कोणाही तिऱ्हाईत व्यक्तीस अशा तऱ्हेचा अर्ज करण्याचा कोणताही अधिकार नाही.

निवडणूक आयोगाने या विषयावर जो निर्णय दिला त्याचे मराठी भाषांतर खालील प्रमाणे होईल.

''अगदी टोकाचे उदाहरण घ्यायचे झाले तर (समजा) एक राजकीय पक्ष आयोगाकडून महत्त्वाची माहिती लपवून किंवा खोटी माहिती पुरवून मान्यता मिळवितो आणि (त्या पक्षाने) असे केले नसते तर त्याच्या मान्यतेचा प्रश्नच निर्माण झाला नसता अशा लपवाछपवीकडे किंवा खोटी माहिती पुरविण्याकडे निवडणूक आयोगाचे लक्ष वेधण्यात आले तर निवडणूक आयोग असहाय्यपणे स्वस्थ राहील आणि तिऱ्हाईत व्यक्तींच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करील काय? माझ्या मते या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे नाही असे आहे. असा पक्ष निवडणूक आयोगाला फसवू शकत नाही आणि निवडणूक आयोग त्या पक्षाच्या प्रतिनिधींखेरीज इतर कोणीही अशी माहिती घेऊन आला तर आपले दरवाजे बंद ठेवू शकत नाही. अशा तिऱ्हाईत व्यक्तीने पुरविलेल्या सर्व माहिती आणि घटना यांची नोंद घेणे आवश्यक वाटल्यास त्यांचे म्हणणे ऐकून घेणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे.''

थोडक्यात निवडणूक आयोगाने तिऱ्हाईत व्यक्तींचा हक्क मान्य केला आहे, एवढेच नाही, तर त्या पलिकडे जाऊन पक्षांची मान्यता काढून घेण्याचा अधिकार आयोगास आहे एवढेच नव्हे तर लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ चा भंग करण्याबद्दल व्यक्तिगत उमेदवारच नव्हे तर सर्व पक्षावर कार्यवाही करण्याचा निवडणूक आयोगाचा हक्क असल्याचेही जाहिर केले आहे.

निवडणूक आयोगाने घेतलेल्या या भूमिकेमुळे इतका गदारोळ उठला की पक्षांच्या मान्यतेविषयींच्या सर्वच प्रकरणांच्या सुनावण्या आगामी लोकसभा निवडणुकी पूर्ण होईपर्यंत स्थगित करण्यात आल्या.

खरे म्हणजे, निवडणूक आयोगासमोर सुनावणीस आलेली इतर प्रकरणे आणि शिवसेनेविरूद्धचा अर्ज यात फार मोठा फरक आहे. भारतीय जनता पार्टीने रामरथयात्रेत कमळ या निवडणूक चिन्हाचा वापर केल्यामुळे ते चिन्ह गोठविण्यात यावे असे एक प्रकरण होते. म्हणजे भारतीय जनता पार्टीविरूद्ध त्यांच्या निवडणूक चिन्हाचा एका प्रसंगी गैरउपयोग केल्याचा आरोप होता. निवडणूक चिन्हाचा धार्मिक कारणासाठी उपयोग करू नये हे भाजपला तत्त्वतः तरी मान्य आहे. मान्य नसल्यास ते तसे जाहिरपणे बोलत तरी नाहीत. यात्रेतील रामरथावर कमळाचा उपयोग करणे हा धार्मिक वापर आहे किंवा नाही याबद्दल त्यांचा मतभेद आहे.

पण शिवसेनेची गोष्ट अगदी वेगळी आहे. निवडणुकीत आणि राजकारणासाठी शिवसेना धर्माच्या नावाचा वापर करते हे त्यांना मान्य आहे. एवढेच नव्हे तर त्याचा त्यांना अभिमान आहे. निर्धार्मिकतेची आपण खोटी शपथ घेतली आणि निवडणूक आयोगासमोर कपट नाटक करून निवडणूक चिन्ह पदरी पाडून घेतले असे ते खुलेआमरित्या सांगतात. पाचपाच निवडणूक अर्ज प्रकरणी उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्णय देऊ त्यांच्या उमेदवारांच्या निवडणुका रद्दबातल केल्या तरीसुद्धा आपण धर्माच्या नावाचा असा गुन्हेगारी वापर चालूच ठेवणार आहोत अशी त्यांची अरेरावी चालूच आहे.

वर उद्‌धृत केलेल्या निवडणूक आयोगाच्या निकालाकडे पाहिले तर शिवसेनेची राजकीय पक्ष म्हणून मान्यता आताच सुनावणी झाली असती तर तातडीने रद्द झाली असती यात काही शंका नाही. किंबहुना, शिवसेना त्यांचा गुन्हेगारी मार्ग चोखाळीत राहिली तर शिवसेनेची राजकीय पक्ष म्हणून मान्यता रद्द होणार यात आता काही शंका राहिलेली नाही. शिवसेना सध्या पॅरोलवर सुटलेली आहे एवढेच.

खुनासारखा गंभीर आरोप हायकोर्टाच्या पातळीवर सिद्ध झाला म्हणजे केवळ सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे किंवा राष्ट्रपतींपुढे दयचे अर्ज सादर झाला आहे या सबबीखाली गुन्हेगाराला मोकळे सोडता येत नाही. गुन्हेगार सराईत असेल तर त्याला सोडले जाण्याची शक्यताच नाही आणि गुन्हा सिद्ध झाल्यानंतर बाहेर पडता आले तर आपली गुन्हेगारी बिनदिक्कतपणे पुढे चालणार अशी शेखी मिरवणाऱ्या गुन्हेगाराला जामिनावरसुद्धा सोडत नाहीत.

निवडणूक कायद्याखालील अपराधी हे गुन्हेगारी कायद्यात मोडतात. शिवसेनेला अशा तऱ्हेने थोडावेळसुद्धा मोकळे सोडणे तसे अयोग्यच आहे. अगदी अट्टल गुन्हेगार चुकून मोकाट सोडला गेला तर दोनपाच माणसांचे मुडदे पडतील. शिवसेनेच्या उपद्‌व्यापांमुळे किती रक्तपात होईल आणि किती विद्वेष पसरेल याचा हिशोब सांगणेसुद्धा कठीण. पण असे असूनही शिवसेनेला पॅरोलवर सोडले आहे हे खरे. पण या पॅरोलवर कैद्यावर निवडणूक आयोगानेही आचार संहिता सर्व पक्षांकडून मान्य करून घेतली आहे. या आचार संहितेत धर्माच्या नावावर प्रचार करण्यावर बंदी आहे. एवढेच नव्हे तर तो गुन्हा आहे हे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणताही पक्ष आचार संहितेच्या या कलमाचा भंग करताना आढळला तर त्या एकूण पक्षावरच निवडणूक आयोग कार्यवाही करेल. अशी कार्यवाही करण्यात जनहितेच्छू तिऱ्हाईतांची मदत झाली तर ठीकच आहे. न झाल्यास आयोग स्वतःच्या प्रयत्नांनी आणि ताकदीने अशी कार्यवाही पार पाडेल असा निर्धारही प्रमुख निवडणूक आयुक्तांनी जाहीर केला आहे.

## शेतकरी संघटनेचे देखरेख गट

येत्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने पॅरोलवर सुटलेल्या या कैद्यावर आणि त्याच्या वृत्तीच्या इतर सर्वांवर देखरेख ठेवण्याचे निश्चित केले आहे. लोकसभा निवडणुका आटोपताच शिवसेनेविरूद्धचा अर्ज सुनावणीस निघेल त्यावेळी, या निवडणुकीत शिवसेनेची जी कृष्णकृत्ये नजरेस येतील ती निवडणूक आयोगासमोर सज्जड पुराव्यानिशी मांडण्यात येतील. शेतकरी संघटना ही देखरेख काही फक्त शिवसेनेवरच ठेवणार आहे असे नाही. निवडणुकीत जातीच्या वा धर्माच्या नावाचा वापर करून इतर पक्षांतर्फे प्रचार होत असेल तर त्यांच्यावरही देखरेख ठेवून त्यांच्याही कृष्णकृत्यांचे पुरावे जमा करण्यात येणार आहेत. लोकसभेच्या प्रत्येक मतदार संघात कार्यकर्त्यांचा एक देखरेख गट स्थापन करण्यात येणार असून निवडणूक प्रचारामध्ये निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आचार संहितेच्या दृष्टीने जे जे भ्रष्टाचारी प्रकार आढळतील त्यांची पुराव्यानिशी नोंद करण्यात येईल. महाराष्ट्रभर जमा होत असलेल्या या माहितीचे केंद्रीय नियंत्रण कक्षामध्ये दररोज संकलन करण्यात येईल. विशेष गंभीर प्रकरणे तातडीने निवडणूक आयोगाच्या दिल्लीतील मुख्य नियंत्रण कक्षास कळविण्यात येतील. जातीयवादाचा ब्रह्मराक्षस हा सर्वच अर्थवादी चळवळींचा, म्हणून शेतकरी आंदोलनाचाही गळा घोटणारा शत्रू असल्याने जाती-धर्मासंबंधाने झालेल्या निवडणूक भ्रष्टाचाराची नोंद हा शेतकरी संघटनेच्या देखरेख पथकांचा या निवडणूक काळातला अग्रक्रमाचा कार्यक्रम राहाणार आहे. परिणामी, १९९१ च्या लोकसभा निवडणुका, या महाराष्ट्रापुरत्या जातीयवादी, प्रचाराने डागाळलेल्या शेवटच्या निवडणुका ठरतील.

●

---

**(पान २२ वरून)**

होऊच शकत नाही. हे सूत्र एकदम समजले म्हणजे अशा तऱ्हेच्या आक्षेपांना जागाच रहात नाही आणि शेतकरी संघटनेला कहार आणि शरद जोशींना शिव्या देणारे नेते काय फक्त राज्यकर्त्या पक्षातच आहेत? ते सगळ्याच पक्षात, जवळ जवळ सारख्याच प्रमाणात आहेत.

अशा तऱ्हेचे आक्षेप घेतले जावेत, शंका विचारल्या जाव्यात, अगदी परखडपणे विचारल्या जाव्यात हे योग्यच आहे. १९८० साली मी म्हटले होते, की आंदोलनांच्या डावपेचांसंबंधी तुमच्या मनात येतील ते प्रश्न अवश्य विचारा. पण काही प्रश्नांना मी लगेच उत्तरे दिली नाहीत तर राग मानू नका. लढाईतील डावपेचांसंबंधी सगळीच रहस्ये खुली करण्यासारखी नसतात. याचा फायदा घेऊन जातीयवादी शरद जोशी विकले गेले अशा हाकाट्या मारू लागतील. संघटनेने ठरवलेले धोरण जातीयवादाला रोकणारे आहे याचा हा पुरावा आहे. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यवर्षाच्या लढाईचा अंतिम चरण अगदी नजिक आला आहे. लढाई जिंकल्यानंतर विजयोत्सवानंतर या रणनीतीचे सगळे अर्थ सांगता येतील आणि समजूही शकतील. तो पर्यंत "सौराज्य मिळवायचं औंदा" एवढा एकच विचार मनात बाणवून ठेवावा.

●

# लोकसभा निवडणूक १९९१
# अपात्र नेत्यांनी मांडलेली जनतेची अग्निपरीक्षा

१९९१ सालची लोकसभेची मध्यावधी निवडणूक आजपर्यंतच्या सर्व निवडणुकांपेक्षा अगदी वेगळीच दिसते आहे.

निवडणूक प्रचारासाठी साधारणतः तीन आठवड्यांचा अवधी मिळतो. सर्वच पक्ष आणि सगळेच उमेदवार या तीन आठवड्यातल्या दिवसान् दिवसाचा, प्रत्येक तासाचा, अगदी मिनिटाचासुद्धा दिवस रात्र न पाहता; थंडी, वारा, ऊन, पाऊस यांना न जुमानता मतदारांशी संपर्क साधण्याच्या प्रयत्नासाठी वापर करण्यास धडपडतात. यंदाच्या निवडणूक प्रचारात असा उत्साह उमेदवारांतही दिसत नाही आणि मतदार जनतेत तर त्याहूनही नाही.

जास्तीत जास्त भर महागड्या प्रचंड फलकांवर, झेंडे आणि कापडी फलकांच्या वापरावर आणि श्राव्य व दृक्‌श्राव्य कॅसेटवर आहे. सर्व पक्षांचे राष्ट्रीय नेते विमानाचा वापर करून इकडेतिकडे धावत आहे. त्यांच्या भाषणांना दहावीस हजारावर माणसे कोठेच जमत नाहीत. अनेकांच्या सभांना तर काही ठिकाणी दोनपाचशे माणसे जमा करणेसुद्धा मुश्किल झाले आहे.

औट घटकेचे पंतप्रधान चंद्रशेखर यांना आपल्याला भवितव्य नाही याची स्पष्ट कल्पना येऊन गेली आहे. त्यांच्या पक्षात त्यांच्या आसपास अगदी किमान गुणवत्तेचासुद्धा एकही माणूस नाही. पण चंद्रशेखर यांची पंतप्रधान म्हणून स्वतःची प्रतिमा मात्र चांगली उजळ राहिली आहे. चंद्रशेखरांच्या हाती जमेची बाजू त्यांची व्यक्तिगत प्रतिमा एवढीच आहे. ''सर्वात गचाळ पक्षाचे सर्वोत्तम नेते'' असे एका व्यंगचित्रकाराने त्यांचे वर्णन केले आहे. त्यांच्या वैयक्तिक प्रतिमेतून काही चमत्कार घडवून आणता येईल अशा आशेने त्यांची धडपड चालू आहे. काळजीवाहू शासनाने धोरणात्मक बदल काही करू नयेत हा संकेत त्यांनी पार उधळून लावला. पंजाबमध्ये निवडणुका घेण्या न घेण्याचे ठरवणे हा मोठा जटील प्रश्न. अगदी सुस्थिर शासनाच्या पंतप्रधानांनाही या विषयी निर्णय घेणे शक्य झाले नाही. पण, देवदूतसुद्धा जे करायला कचरतात त्याबद्दल पागल माणसाला भीती वाटत नाही. पंजाबमध्ये निवडणुका जाहीर झाल्या, उमेवारांनी अर्ज भरले, त्यातील विधानसभेच्या सहा मतदारसंघांत आणि लोकसभेच्या एक मतदार संघात स्वतंत्र उमेदवारांचे खून आतापर्यंत पडले आहेत. त्यामुळे तेथील निवडणुका आधीच स्थगित झाल्या आहेत. निवडणुकीच्या तारखेपर्यंत आणखी काय काय होईल ते पाहात राहाणे या पलिकडे सर्वसामान्य जनांच्या हाती काहीच नाही.

अशी भयानक परिस्थिती पंजाब, आसामपुरतीच मर्यादित आहे असे नाही. लोकसभेत प्रभुत्व गाजविणारी दोन राज्ये म्हणजे उत्तर प्रदेश आणि बिहार. खासदारांची सर्वात मोठी गठ्ठा संख्या या दोन राज्यांत आहे. दोन्ही राज्यांत सर्वच पक्षांनी हाताशी गुंड धरून हैदोस सुरू केल्याचे दिसत आहे. गया येथील लोकसभेच्या एका उमेदवाराचा खून झाला आहे. शेवटपर्यंत किती लोकांचे जीव धोक्यात येतात, किती रक्तपात होतो, मतदान केंद्रांवर किती ठिकाणी छापे घालण्यात येतात आणि खोटे मतदान किती होते याची कल्पनासुद्धा करणे आज कठीण आहे. दिल्लीवर राज्य कोणत्याही पक्षाचे येवो, त्या पक्षाच्या खासदारांचे बोलविते धनी बिहार आणि उत्तर प्रदेशचे गुंडच राहाणार अशी ही भयानक परिस्थिती आहे.

थोडक्यात, या निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय घटनेतील शेवटची संस्था कोसळून पडत आहे. राज्यांची स्वायत्तता कधीच संपली. मुख्यमंत्री निर्माल्य झाले. लोकसभा दंग्याधोप्याचा आखाडा झाला, मंत्रीमंडळी नामधारी झाले. न्यायसत्ता प्रतिष्ठा गमावून बसली, पत्रकारितेतील प्रामाणिकतेची विक्री झाली. ४४ वर्षांच्या या अधोगतीत भर पडली ती निवडणूक आयोगाच्या सर्वाधिकारा-बद्दल जबरदस्त शंका निर्माण होऊन.

पक्षांजवळ सांगण्यासारखेसुद्धा काही राहिले नाही. सर्वच पक्षांचे जाहिरनामे म्हणजे या किंवा त्या गटाला खूश करण्यासाठी करावयाच्या कामांची जंत्री आहे. आर्थिक-सामाजिक दृष्ट्या त्यांत काही सूत्रबद्धता शोधायला जाणेसुद्धा निरर्थक आहे. अगदी एकही अपवाद न करता सर्वच जाहिरनामे कचऱ्याच्या पेटीत टाकून देण्याच्या लायकीचे आहेत.

४० वर्षे देशाच्या अधःपतनास जबाबदार असलेली कॉंग्रेस सगळ्या दोषाचे खापर दोनचार वर्षेच सत्ता हातळलेल्या विरोधी पक्षांवर टाकू पाहात आहे. बिकट आर्थिक परिस्थितीस आणि राजकीय परिस्थितीस तोडगा काढणे आपल्यालाही शक्य नाही हे कॉंग्रेस नेत्यांनाही माहीत आहे. किंबहुना, पंजाब काय, काश्मिर काय, आसाम काय या सर्व समस्यांचा जनकच कॉंग्रेस पक्ष. देशातील बेकारी, महागाई, चलनवृद्धी, भ्रष्टाचार, कर्जबाजारीपणा हे पातक कोणाचे? खरे म्हटले तर इंदिरा कॉंग्रेस शहाजोगपणाचा आव आणून हे प्रश्न सोडवू शकण्याचा दावा करते हे हास्यास्पद आहे. आणि लोक असे दावे ऐकून घेतात हे चित्र एकाच वेळी करूण आणि विनोदी आहे.

मग, लोकांना आकर्षित करण्यासाठी इंदिरा पक्षाकडे कार्यक्रम कोणता? सगळी काही घोषवाक्य वापरून झाली. 'गरीबी हटवा' या घोषावर एक निवडणूक जिंकली त्यानंतर गरीबी वाढतच गेली. 'राष्ट्रीय एकात्मते'वर दुसरी निवडणूक जिंकली त्यानंतर देशाच्या चिरफळ्या पडल्या. 'काम करणारं शासन' म्हणून आरोळी टोकून तिसरी निवडणूक जिंकली आणि सर्व शासनच ठप्प झाले. आता देण्यासारखे घोषवाक्य एकच राहिले. इंदिरा कॉंग्रेस स्थैर्य देऊ शकते. कारण, पक्ष घराणेशाहीला बांधलेला आहे. निदान, पंतप्रधान कोणी व्हावे याबद्दल तरी या पक्षात वाद नाही. जनतेने पुरेसे बहुमत

**लोकसभा मध्यवधी निवडणूक १९८९**
**शेतकरी संघटक, २१ मे १९९१**

इंदिरा काँग्रेसच्या पदरात टाकले तर पंतप्रधानांची खुर्ची स्थिर राहील यात बरेचसे तथ्य आहे. पण एक पंतप्रधानांची खुर्ची सोडली तर स्थिर काहीच राहात नाही. केंद्रीय मंत्रीमंडळ नाही, मुख्यमंत्री तर त्याहूनही नाही. पुण्यातील इंदिरा काँग्रेसच्या उमेदवारांनी आपल्या जाहिरातीत एक व्यंगचित्र वापरले आहे. एक मध्यमवयीन जोडपे. त्यातील पत्नी म्हणते, 'आपले तरी कुठे पटत होते? पंधरा वर्षे आपण केलाच ना संसार? विरोधी पक्षाच्या लोकांना एवढेसुद्धा जमत नाही.' थोडक्यात, सुखी, संपन्न, कृतकृत्य करणाऱ्या संसाराची आता आशासुद्धा राहिली नाही. देवाने गाठी बांधल्या आहेत, मग एक दिवस मरण येईपर्यंत संसार कसाबसा निभावून न्यायचा आहे हीच आता सर्वोच्च आकांक्षा!

भारतात तसा स्थिरतेचा तुटवडा कधी पडला नाही. इंग्रजांनी, काठीला सोने बांधून काशीपर्यंत बिनधास्त जाता येईल अशी व्यवस्था केली तेव्हापासून इंग्रजांच्या राज्यात अगदी छान स्थिरताच होती! स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या ४० वर्षांच्या राज्यात दोन पंतप्रधान अगदी यमुनाकाठी नेईपर्यंत स्थिरच राहिले. पण या स्थिरतेचा लाभ सर्वसामान्य जनांना झाला नाही. अस्थिरतेचा बागुलबुवा दाखवून सर्वसामान्यांना लुटून मूठभर लोकांचीच धन करण्यात आली. पंजाब, काश्मिरसारखे प्रश्न अगदी सज्जड स्थिर शासनाच्या कालावधीतच तयार झाले. अस्थिरतेमुळे देशापुढे प्रमुख समस्यांपैकी कोणतीही एक निर्माण झाली असे तर नाहीच, उलट देशापुढील सर्वात मोठी समस्या म्हणजे अपात्र नेत्यांच्या हाती आलेले स्थिर शासन. सैरभर झालेल्या लोकांनी मोठ्या आशेने कोणा एक नेत्याच्या पदरी भरघोस मतदान टाकावे आणि त्या नेत्याने मिळालेल्या सामर्थ्याचा उपयोग स्वतःचे आसन स्थिर करण्यात आणि आर्थिक मनमानी करण्यात करावा असे वारंवार झाले. आणखी एक स्थिर शासन या देशाला मिळाले तर या देशाला वाचविणे अशक्य होईल.

सर्वसमर्थ बहुमत ज्याला मिळावे अशा पात्रतेचा एकही नेता देशात नाही. अशा अपात्र नेत्यांपैकी एकाच्या हाती स्थिर बहुमत आले तर सत्तामदाने त्या नेत्याचे डोके फिरेल या पलिकडे काही व्हायचे नाही. सगळेच किरकोळ प्रकृतीचे काडीपैलवान आहेत. त्यापैकी कोण एकाला बदामची खीर पाजली म्हणजे तो काही हिंदकेसरी होणार नाही. हे सगळे किरकोळ पैलवान एकत्र आले आणि निष्ठेने देशापुढील प्रश्न सोडवण्याच्या कामास लागले तरच देशाला काही आशा आहे. स्थिर शासन, मखख शासन! लोकांच्या समस्यांबद्दल संवेदनाशील राहाण्याची मखख शासनाला काही गरजच नसते. नोकरशाही मोठी स्थिर आहे. पेन्शन मिळेपर्यंत त्यांना अस्थिरतेचा धोका काहीच नाही. पण, स्थैर्याने नोकरशाहीची गुणवत्ता वाढली नाही; ती अधिक मग्रूर, बेजबाबदार आणि उदरंभरी झाली, मखख झाली.

स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात लहानशा दुःखाबद्दल किंवा छोट्याशा अन्यायाबद्दलसुद्धा पार लोकसभेपर्यंत प्रतिसाद आणि प्रतिक्रिया उमटत असत. आज सर्व व्यवस्था अशी मखख बनली आहे की एखाद्या आईच्या समोरून तिचा मुलगा किंवा पत्नीच्या समोरून तिचा पती गुंडांनी किंवा पोलिसांनी दरादरा ओढत नेऊन मारून टाकला तर त्याबद्दल कोठे अवाक्षरही उमटत नाही. लहानशा अन्यायानेसुद्धा सत्ताधीशांच्या खुर्च्या डळमळण्याचा धोका तयार होत नसेल तर ते शासन लोकांच्या कामी कधीच लागणार नाही. शासन स्थिर असण्यात काय फायदा? शासन संवेदनशील पाहिजे. पण वादळात सापडलेल्या आणि बावरलेल्या जनतेला स्थिरतेचे आकर्षण दाखवून पुन्हा एकदा गटविणे हा इंदिरा काँग्रेसच्या जाहिरनाम्याचा मध्यवर्ती कार्यक्रम.

राष्ट्रीय मोर्चाचे स्वरूपच गेल्या आठनऊ महिन्यांत बदलून गेले आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधी आघाडी म्हणून राष्ट्रीय मोर्चाचा उदय झाला. ग्रामीण भारतातील जनतेचे प्रतिनिधीत्व करणारी ही आघाडी सत्तेवर आली आणि राष्ट्रीय मोर्चाचे स्वरूप बदलून गेले. मागासवर्गांवर आणि जातींवर सहस्त्रावधी वर्षे प्रचंड अन्याय झाले. यात काहीच वाद नाही. समाजाने लादलेले मागासलेपण दूर करण्याकरिता विशेष प्रयत्नांची आवश्कता आहे यातही काही शंका नाही. पण जातिव्यवस्थेचा महाराक्षस गाडण्याकरिता जातीयवादाचाच झेंडा उभारण्याचा मार्ग राष्ट्रीय मोर्चाने स्वीकारला. देशाच्या विकासाची गती आणि गुणवत्ता अशी असू शकते की ज्यामुळे पिढ्यान्‌पिढ्या रुजलेली जातीयता संपूनच जाईल. पण, अशा पुरुषार्थाची महत्त्वाकांक्षा राष्ट्रीय मोर्चात राहिलेली नाही. नोकऱ्यांच्या भुलावणीने मागासवर्गाची गठ्ठा मते घेण्यातच त्यांना आज धन्यता वाटत आहे. मंडल आयोगाच्या अहवालाला मार्क्स्‌च्या कॅपिटल सारग्रंथापेक्षाही जास्त महत्त्व असल्यासारखे बोलत आहेत, केवळ राष्ट्रीय मोर्चाचे नेतेच नव्हेत तर डावे उजवे कम्युनिस्ट पक्षसुद्धा!

देशापुढच्या जटील आणि घोरगंभीर समस्या सोडविण्याची कोणाही पक्षात ताकद नाही, इच्छाही नाही. त्यामुळे कसबी जादूगाराप्रमाणे लोकांची नजर दुसरीकडे वळवून हातचलाखी करण्याची सर्वच पक्षांची हुन्नर चालू आहे.

या सगळ्या धडपडीत भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेसारखे, मुळात आर्थिक कार्यक्रम किंवा दृष्टिकोनच नसलेले पक्ष मागे थोडेच राहाणार आहेत? राममंदिराच्या एका प्रश्नाने, १९८४ साली संपुष्टात आलेला भारतीय जनता पार्टी हा पक्ष एकदम राष्ट्रीय महत्त्वाचा ठरला आणि आता सत्ता काबीज करण्याची स्वप्ने पाहू लागला. शिवसेनेचे उद्दिष्ट मर्यादित आहे. मुंबईतील भूखंड आणि तस्करी म्हणजे सोन्याची खाण आहे! त्या खाणीवर ताबा मिळविण्याकरिता मते पाहिजेत. मते मिळविण्याकरिता आज मराठी तरुणांना भडकवा, उद्या हिंदू माथेफिरूपणाला आवाहन करा हा शिवसेनेचा कार्यक्रम राहिला आहे. या जातीयवाद्यांनी सर्वच नियम धाब्यावर बसवले आणि सत्ता जणू आता आपल्या हाती येणार आहे. अशा कैफात ते बोलू लागले आहेत. सुदैवाने न्यायव्यवस्थेचे काही निर्णय आणि शेतकरी संघटनेने निवडणूक आयोगाकडे दाखल केलेले अर्ज याचा काहीसा परिणाम या पक्षांच्या प्रचारावर झाला आहे.

शिवसेनेचे बाळ ठाकरे अजूनही काही ऐतिहासिक नाटकांतील वीरश्रीपूर्ण

**(पान ४० वर)**

# आयाबहिणींचे राज्य हवे, टग्यांचे राज्य नको.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. खेडेगावांचा देश आहे. ह्या देशातील बहुसंख्य लोक शेतीवर जगतात. स्त्रियांचा आणि काळ्या आईचा संबंध तर फार जुना आहे. स्त्रियांनीच शेतीचा शोध लावला आणि आजही पुरुषांपेक्षा त्याच शेतीवर जास्त राबतात. त्या करतात त्यातली काही कामे नजरेस येतात तर काही येतसुद्धा नाहीत. पण एवढे नक्की की शेती तगून राहिली आहे, ती प्रामुख्याने स्त्रियांच्या कष्टांवर.

नवल असे की कसणाऱ्या स्त्रियांचा शेतीवर ताबा नाही, आणि शेतकऱ्यांचा देशातील व्यवस्थेवर आणि शासनावर ताबा नाही. सगळे निर्णय ठरतात ते वर. बहुतेक सगळे दिल्लीलाच. गावात रहाणाऱ्या व शेतीवर जगणाऱ्या कोट्यावधी जनतेला कोणी विचारीत नाही. निदान पंचायत राज्यव्यवस्थेत तरी त्यांचा हातभार असावा. तोही आधी कमी होता आणि दिवस न् दिवस घटत चालला आहे. ही परिस्थिती बदलणे निकडीचे झाले आहे. त्याकरिता महाराष्ट्र राज्यात पंचायत राज्यव्यवस्था कसकशी आली हे समजून घेतले पाहिजे.

### पंचायत राज्याची वाटचाल

१९७९ साली देश स्वतंत्र झाला. पुढची दोन अडीच वर्षे फाळणीमुळे मोडलेली घडी सावरण्यात गेली. ह्या काळात एकीकडे भारताची नवी घटना तयार करण्याचे काम चालू होते. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने नव्या प्रजासत्ताक घटनेचा स्वीकार केला. या घटनेत राज्यव्यवस्थेत जी बांधणी दिली गेली तीमध्ये राज्य आणि संघराज्य ह्यांचाच तपशील होता. राज्यांच्या प्रदेशात जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर शासन कसे चालावे याची काहीच तरतूद केलेली नव्हती.

१९५० च्या मार्चमध्ये गरीब, मागास परिस्थितीतून बाहेर पडण्याचा एक मार्ग म्हणून नियोजनमंडळाची स्थापना झाली. आणि १९५१ च्या एप्रिल महिन्यात पहिल्या पंचवार्षिक योजनेची सुरुवात झाली. त्याचा एक भाग म्हणून ५५ निवडक भागांत ग्रामीण सामूहिक विकास योजना नावाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. ह्या कार्यक्रमाला लोकांचा पाठींबा असावा, लोकांनी बघ्याची, लाचारीची भूमिका घेऊ नये तर ते काम आपले मानून पुढे न्यावे अशी कल्पना होती. थोडक्यात, जनतेचा सहभाग असलेला ग्रामीण विकासाचा कार्यक्रम असे ह्या योजनेचे रूप होते.

१९५५ साली दुसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली. त्या वेळेपर्यंत हे स्पष्ट होते की, पंचवार्षिक योजनांबद्दल लोकांना आत्मीयता वाटत नाही. ग्रामीण भागातील लोकांनी ह्या कार्यक्रमाविषयी फारसा जिव्हाळा दाखविला नाही. तेव्हा शासनाने आपला पवित्रा बदलला. पहिल्या पाच वर्षांप्रमाणे "जनतेचा सहभाग असलेला शासकीय कार्यक्रम" असे धोरण न ठेवता "शासनाचा सहभाग असलेला जनतेचा कार्यक्रम" असे विकास योजनांचे रूप असले पाहिजे असे म्हणण्यात येऊ लागले.

ग्रामीण भागात ही गोष्ट कशी साधावी ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरिता श्री. बलवंतराय मेहता ह्यांच्या हाताखाली सामूहिक विकास योजनांचा अभ्यास करण्याकरिता एक मंडळ नेमण्यात आले. ह्या समितीने एक वर्षाने आपला तीन भागांचा भला मोठा अहवाल सादर केला. आणखी दोन वर्षांनी १९५९ च्या जानेवारी महिन्यात राष्ट्रीय विकास मंडळाने मेहता अहवालाच्या शिफारशी मान्य केल्या. त्याला धरून "सर्वांगीण ग्रामीण विकासाकरिता जनतेचे शासन असा पुकारा करत करत वेगवेगळ्या राज्यात पंचायत राज्यव्यवस्था सुरू झाली.

**पंचायत राज्य निवडणुका**
**भूमिकेची आवश्यकता १९८७**
**शेतकरी संघटक,**
**अमरावती महिला अधिवेशन विशेषांक**
**१० नोव्हेंबर १९८९**

पंचायत राज्य प्रथम आले राजस्थानमध्ये. नंतर आंध्रप्रदेशात. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. ह्या शासनाने महाराष्ट्रात पंचायत राज्य कसे असावे ह्याकरिता एक नवीन समिती नेमली. श्री. वसंतराव नाईक तिचे अध्यक्ष होते. ह्या सिमतीच्या शिफारशी सरकारने मान्य केल्या. अशाप्रकारे १ मे १९६५ पासून महाराष्ट्रात पंचायत राज्यव्यवस्था सुरू झाली.

### पंचायत राज्यासंबंधी चार भूमिका

ढोबळ मानाने पंचायत राज्याकडे पहाण्याचे चार दृष्टिकोण आपल्याला दिसतात.

### (१) सर्वोदयी भूमिका :

महात्मा गांधींनी आपले आयुष्य दरिद्रिनारायणाच्या सेवेला वाहिलेले होते. इंग्रजी राजवटीने गावखेड्यातील लक्ष्मी धुवून नेऊन इंग्लंडची धन केली. देशातील शहरी मध्यस्थांनीही ह्या लुटीत हात धुवून घेतले. गरिबातील गरीब माणूस आपल्या पायांवर उभा रहावा म्हणून ब्रिटिश सरकार आणि शहरी मध्यस्थ ह्या दोघांविरुद्ध गांधी उभे ठाकले. समाजाचे गरिबी व श्रीमंतीमुळे दोन तुकडे झाले आहेत हे गांधींना दिसत होते म्हणून त्यांनी खादीचे अर्थशास्त्र लोकांपुढे मांडले. तसेच भारताचा खरा विकास व खरे कल्याण इंग्रजांची शासनपद्धती चालू ठेवून साधणार नाही. त्यातून निवडणुकांचा बाजार, पक्ष नावाची एक नवीन जात आणि स्वार्थी आपमतलबीपणा यांना ऊत येईल असेही गांधींना वाटत होते.

फार प्राचीन काळापासून भारतामध्ये गावगावडा अबाधित चालत राहिला. इंग्रजांनी पहिल्यांदा गावगाड्याचा कणा मोडला. म. गांधी आणि त्यांचे अनुयायी यांना जुन्या गावगाड्याबद्दल ओढ वाटत होती. हा गावगाडा स्वातंत्र्यानंतर पुन्हा उभा रहावा, ग्रामस्वराज्य हा देशाचा पाया व्हावा असे ह्या मंडळींना वाटत होते. भारत म्हणजे दिल्लीच्या हुकुमाने हलणारा देश नसावा तर, सर्व देशाची व समाजाची रचना गावाभोवती

असावी असे त्यांचे मत होते.

प्रत्येक गावात एक गावसभा असावी, ही गावसभा देशातील खरी सत्ता असावी. गावपातळीवर सर्व लोकांनी शक्यतो एकमताने नाहीतर निदान सहमतीने निर्णय घ्यावेत. ह्या प्रक्रियेत पक्ष असणार नाहीत. प्रत्येक गाव स्वायत्त असेल, स्वावलंबी असेल आणि आपले प्रश्न आपणच सोडविण्याचा आग्रह धरील. गावसभा ग्रामपंचायत निवडेल. म्हणून मुळात गावसभा, त्यानंतर त्यांची गावपंचायत, त्यानंतर विभागीय समाज आणि त्याची पंचायत समिती, त्यानंतर जिल्हा परिषद, त्यानंतर राज्य समाज व राज्य परिषद, व राष्ट्रीय समाज आणि त्याची लोकसभा असे चित्र दिसेल असा गांधीवाद्यांचा पंचायत राज्याचा आराखडा होता.

भारताची सामाजिक, आर्थिक, राजकीय रचना गावगाड्याभोवती उभी केली तर, लोकांचे व कष्टकऱ्यांचे श्रम वाया जाणार नाहीत. ते कोणी लुबाडणार नाहीत. आपल्या मानवी गरजा भागविण्याकरिता लोकांना कोणाच्या तोंडाकडे पहावे लागणार नाही. शेतीतील संपत्ती गावात राहील आणि मग शहरांची श्रीमंतीची सूज उतरेल. अशी ही म. गांधींच्या विचारसरणीतून विकसित झालेली सर्वोदयवादी भूमिका आहे. पण ही भूमिका राज्यकर्त्यांना अव्यवहार्य तर वाटलीच पण स्वप्नाळूही वाटली म्हणून पंचायत राज्यव्यवस्था आणतानाही कोणीही तिचा पाठपुरावा केला नाही.

### (२) तज्ज्ञांची भूमिका

पंचायत राज्याकडे पहाण्याची दुसरी भूमिका म्हणजे नोकरशहा, तज्ज्ञ, उच्चविद्याविभूषित तंत्रज्ञ ह्या मंडळींची. अर्थातच ही भूमिका सार्वजनिक व्यासपीठावरून कोणी मांडत नाही. पण सरकारी अंमलबजावणीत ही भूमिका प्रभावी ठरते. नवे अत्याधुनिक तंत्रज्ञान, भरपूर उत्पादन, भरपूर संपत्तीची निर्मिती ह्यावर त्यांचा भर असतो. नोकरशहा किंवा तज्ज्ञांच्या दृष्टीने पंचायत राज्याला तात्त्विक, राजकीय महत्त्व काही नाही. पण योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करणे हे आपले काम सुकर करण्यात पंचायत राज्यांची मदत असावी एवढीच त्यांची अपेक्षा असते. एखादी कंपनी वेगवेगळ्या पातळीवर एजंट नेमते. त्याप्रमाणे पंचायत राज्य म्हणजे विकासाच्या कामाच्या एजन्सी असेच त्यांना वाटते. काही वेळा पंचायत राज्य संस्थांना अधिकार व सत्ता द्यायला ही मंडळी तयार होतात पण ते अधिकार मर्यादित असावेत ह्यावर त्यांचा कटाक्ष असतो. सत्ता विखुरली जाऊ नये पण कामाची अंमलबजावणी चोख व्हावी असे त्यांना वाटत. थोडक्यात, निर्णय-प्रक्रिया स्वतःच्या म्हणजे दिल्ली-मुंबईच्या ताब्यात ठेवायची; फक्त नेमलेली कामे मात्र लोकांनी आपलीच कामे असे समजून पार पाडायची अशी ही तज्ज्ञ मंडळीची दुसरी भूमिका!

### (३) स्थानिक स्वराज्याची भूमिका

पंचायत राज्याकडे पहाण्याची तिसरीही एक भूमिका आहे. ह्या मताप्रमाणे पंचायत राज्य म्हणजे स्थानिक स्वराज्याचा पाया. शहरातील नगरपालिकांप्रमाणे ग्रामीण भागात पंचायत राज्य आले पाहिजे पण त्यात जनतेने विकास कार्यक्रमात अधिक पुढाकार घेतला पाहिजे. वेगवेगळे उपक्रम हाती घेतले पाहिजेत, विकासाची धोरणे स्वतःच ठरविली पाहिजेत. ह्या मताप्रमाणे लोकांनी ग्रामीण जीवनातील प्रत्येक अंगाबद्दल –

(१) निर्णय घेताना
(२) धोरण ठरविताना
(३) नियोजन करताना
(४) अंमलबजावणी करताना
(५) साधन सामुग्री उभारताना
(६) ह्या सामुग्रीचे वितरण करताना
(७) देखरेखीच्या बाबतीत

स्वतंत्र निर्णय घेतले पाहिजेत.

थोडक्यात, तिसऱ्या भूमिकेप्रमाणे पंचायत राज्य एक सत्ताकेंद्र बनते. सत्तेची एक नवी व्यवस्था बनते. त्याची वेसण दिल्ली-मुंबईच्या हातात राहणार. पण मुख्य म्हणजे पंचायत राज्याने महसूल प्रशासनाचे काम सांभाळावे. त्या संदर्भात शांतता व सुव्यवस्था राखण्याची जोखमीची जबाबदारी अंगावर घ्यावी. पंचायत राज्य म्हणजे स्थानिक स्वराज्य ही भूमिका पंडित नेहरूनीही घेतली. लोक अडाणी. तेव्हा ते एवढ्या जबाबदाऱ्या कशा पेलणार? अशी शंका काहींना येते. नेहरू म्हणतात, "लोकांना संधी दिल्याशिवाय त्यांच्या प्रशासनाची ताकद तरी कशी येणार? म्हणून मूठभर नोकरशहांच्या ऐवजी ह्या कोट्यावधी लोकांकडेच खरी सत्ता गेली पाहिजे." अशोक मेहताही म्हणतात की, "पंचायत राज्य हे लोकसंघटनेचे साधन आहे; असे असेल तरच ते तांत्रिक विकासाचे साधन बनू शकते."

### (४) सामूहिक विकासाकरिता स्थानिक स्वायत्ततेची भूमिका :

विकास कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक संस्था स्वायत्त असल्या पाहिजेत अशी एक चौथी भूमिका आहे. खुद्द बलवंतराय मेहता समितीनेच ही भूमिका मांडली. ह्या अहवालाला मान्यता मिळाली. म्हणजेच आजचे पंचायत राज्य ह्या भूमिकेवरच आधारलेले आहे.

आपले राष्ट्रीय नियोजन लोकांपर्यंत पोचले पाहिजे. पण अनुभव असा की, ग्रामीण विकासाच्या कामातही लोक राजीखुषीने आणि उत्साहाने पुढाकार घेत नाहीत. त्यामुळे खेड्यापाड्यातली जनता स्वावलंबी बनली नाही. त्यावर तोडगा असा की, सामूहिक विकासाचे आणि ग्रामीण विकासाचे नियोजन व अंमलबजावणी ह्या गोष्टी आपण लोकांकडे दिल्या पाहिजेत. लोकांवर विश्वास टाकला पाहिजे म्हणजे मग लोकप्रतिनिधी पंचायत राज्य सत्ताकेंद्र न करता त्याचा वापर विकासयंत्रणा म्हणून करतील.

बलवंतराय मेहता समितीचा अहवाल म्हणतो की लोकांच्या स्थानिक गरजा आणि आकांक्षा लक्षात घेतल्या जात नाहीत. त्या दिशेने स्थानिक गरजेच्या गोष्टींवर खर्च केला जात नाही. लोकांना धोरण, देखरेख, नियंत्रण करायला वाव दिला जात नाही. लोकांच्या हाती आवश्यक ती सत्ता आणि निधी दिला जात नाही. म्हणूनच लोक विकासकार्याविषयी उदासीन रहातात. तेव्हा पंचायत राज्य बनवू या. मग लोक आपोआप स्वतःचा विकास साधतील.

**प्रत्यक्षात काय घडले?**

इतके मोठे लोक ह्या विषयावर बोलले, इतक्या समित्या नेमल्या गेल्या, त्यांचे अहवाल आले, कायदे झाले, पंचायत समित्या झाल्या, जिल्हा परिषद उभ्या राहिल्या पण ह्या सगळ्यातून लोकांच्या हातात काय पडले?

स्वराज्य आणि विकास ज्या संस्थांनी साधायचा त्यातून लोकांना स्वराज्यही मिळाले नाही आणि सुराज्यही मिळाले नाही. लोकांच्या हक्काचा, कल्याणाचा, विकासाचा बोलबाला पंचवीस वर्षे झाला पण खेड्यातील बायांना आज पिण्याच्या पाण्याकरिता मैल-दीड मैल चालावे लागते. पिण्याच्या पाण्याने शहरात बागा फुलतात पण कैक खेड्यात साधे एक नळकोंडाळे नसते. लाखो बायका आज उघड्यावर शौचाकरिता जातात. गावागावातून अजून चार सर्वजनिक संडास आपल्याला बांधता आले नाहीत. बऱ्याचशा खेड्यातून गरिबांच्या घरी वीज नाही, तर गॅस कोठला? पूर्वीच्या खेड्यात जतन केलेली वने होती. जळणाचा प्रश्न म्हणून असा तीव्र नव्हता. गोऱ्या साहेबाच्या राज्यापासून जंगलाधिकारी निर्माण झाले आणि तेव्हापासून बाया-बापड्यांना जळण गोळा करायला वणवण फिरावे लागते आहे.

स्वराज्याची तर दशाच झाली आहे. आजचे पंचायत राज्य हे विकास केंद्र नाही. स्वराज्याचे सत्ताकेंद्रही नाही. तर दिल्लीची सत्ता गल्लीत राखणारे केंद्र बनले आहे. आजचे पंचायत राज्य - सज्जनांचे, गोरगरिबांकरिता नाही. ती टग्यांची मिरास बनली आहे. गावातल्या लोकांचा एकोपा तर दूरच राहिला, त्या ऐवजी जुनाट भाऊबंदकीला, हेव्यादाव्यांना नवे खतपाणी मिळत आहे. आपली गावे विकासाचा झरा न बनता सडलेल्या राजकारणाची डबकी बनत आहेत. गेली पंचवीस वर्षे पंचायत व्यवस्था चालू आहे, त्याचा उपयोग एकच झालेला दिसतो. देश किंवा राज्य पातळीवर ज्या पुढाऱ्यांची सोय लावता येणार नाही त्यांना चरायला कुरण देऊन गुंतवून ठेवण्याचे काम पंचायत राज्य करत आहे. त्यामुळे खेड्यापाड्यातले गुंडांचे राज्य तयार झाले आहे. पण शेतीत कसणारे, शेतीत राबणारे, गावकुसातले आणि गावकुसाबाहेरचे लोक देशोधडीला लागले आहेत. म्हणूनच पंचायत राज्यात खेड्यातली दारू, शिवीगाळ, मारहाण आणि आया-बहिणींचे हाल संपलेले नाहीत. सर्व स्त्रिया आणि कष्टकरी तेवढे अनाथ बनले आहेत.

म्हणजेच, पंचायत राज्य फसले आहे ह्याचे मूळ कारण आपल्या राज्यकर्त्यांच्या आर्थिक नियोजनात आहे. त्यांना देशाचे सारे भांडवल शहरांकरिता, बड्या कारखानदारांकरिता, शहरी मध्यम वर्गाकरिता आणि खेड्यातल्या मूठभर बड्या शेतकऱ्यांकरिता पाहिजे असते. मग शेतीच्या, खेड्यापाड्यांच्या, खेडूत बायकांच्या आणि कष्टकऱ्यांच्या वाट्याला काय येणार? म्हणूनच पंचायत राज्यांना भरीव आर्थिक साधने नाहीत पण पंचायत राज्याचा डोलारा मात्र आहे. ह्याचा अर्थ असा की आपल्या राज्यकर्त्यांची तसेच राज्यकर्त्या पक्षाची सत्तेची खिरापत वाटून राज्य करण्याची ती एक युक्ती आहे. म्हणून तर, पंचायत राज्यातले बहुतेक तथाकथित लोकप्रतिनिधी भ्रष्ट बनतात व खेड्यापाड्यातील गोरगरिबांना लाचार बनवितात.

**असे का घडले?**

पंचायत राज्य का फसले हा प्रश्न आपल्याला पडतो. पण १९४७ साली आपण स्वतंत्र झालो तेव्हापासून आजतागायतचे राजकारण पाहिले तर, हा प्रयोग फसणारच होता ही गोष्ट लक्षात येते.

काँग्रेसच्या नेत्यांनी स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधींच्या विचारांकडे आणि कार्यक्रमाकडे पाठ फिरविली. १९४७ नंतर पंडित नेहरूंसकट काँग्रेसच्या सर्व नेत्यांनी महात्मा गांधींच्या नावाने जपमाळ ओढली; पण हा देश शेतीचा आहे, खेडुतांचा आहे, दरिद्रीनारायणाचा आहे ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. आपल्या सर्व योजना शहरातल्या व ग्रामीण भागातल्या सत्ताधाऱ्यांकरिता राबविण्यात आल्या.

अगदी पंचायत राज्याचेच उदाहरण घेऊ. गांधीजी जन्मभर ग्रामस्वराज्याबद्दल बोलत होते. पण भारताच्या स्वातंत्र्योत्तर घटनेबद्दलचा मूळ आराखडा जेव्हा काँग्रेसच्या नेत्यांनी गांधींना दाखविला तेव्हा पंचायत राज्याचा साधा उल्लेखसुद्धा त्यात नव्हता. महात्मा गांधींनी त्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. आणि केवळ गांधीजींचा राग शमविण्याचा एक उपाय म्हणून घटनेच्या चौथ्या भागात चाळिसाव्या कलमात पंचायत राज्याचा नाही, तर ग्रामस्वराज्याचा निर्देश करण्यात आला. पण ही एक वरवरची रंगसफेदी होती. गांधींचा आग्रह ग्रामस्वराज्याचा, लोकपंचायतीनी पायावर आपले शासन उभे करावे असा होता. आताच्या घटनेत पंचायत राज्य हा गाभ्याचा भाग नाही तर घटनेचे ते केवळ एक कसेबसे चिकटवलेले शेपूट आहे. तसे नसते तर, आपल्या केंद्र व राज्य शासनांनी – खुद्द घटनेने – पंचायत राज्याला स्वतःची अशी भरपूर साधनसामुग्री उपलब्ध करून दिली असती. मग गावखेड्यांनी दिल्ली-मुंबईला दिले असते, त्याच्याकडे लाचारीने बघितले नसते. पण आज अवस्था उलटी आहे. पंचायत राज्य याचक म्हणजे भिकारी आहे. आर्थिक साधनांकरिता ती आशाळभूतपणे वर डोळे लावून असते. हे ग्रामस्वराज्य नसून ग्रामस्वराज्याची थट्टा आहे.

**महाराष्ट्राचा विचार केला तर चित्र काय दिसते?**

श्री. यशवंतराव चव्हाण एक धोरणी नेतृत्व. श्री. वसंतराव नाईक हे पण कुशल प्रशासक. पांढरपेशांच्या हातातून बहुजन-समाजाच्या हातात सत्ता नेण्यासाठी चव्हाण फार धोरणीपणाने वागले. जिल्हा परिषदांमार्फत येथल्या शेतकरी, बहुजन-समाजाला जागे करून त्यांच्यात नेतृत्वात बळ निर्माण करण्याचा उदात्त हेतू त्यांनी मनात बाळगला.

पण आर्थिक विकासाचा कार्यक्रम शहरी दृष्टिकोण बाळगूनच त्यांनी राबविला, ही त्यांची मर्यादा. त्यामुळे चव्हाण व नाईक ह्यांनी महाराष्ट्रात पंचायत राज्य आणले पण त्या राज्याला आर्थिक साधनांचा भरपूर पुरवठा तेही करू शकले नाहीत. साहजिकच पंचायत राज्य फसले आणि होता होता आज ते भ्रष्टाचाराचे आणि फसवणुकीचे केंद्र बनले.

**पंचायत राज्याला कोण वाचविणार?**

राजकारणी पुंडांनी पंचायत राज्य

**(पान ४० वर)**

१९८६ च्या नोव्हेंबरमध्ये चांदवड येथे झालेल्या शेतकरी महिला अधिवेशनामध्ये स्त्रियांच्या वेगवेगळ्या समस्यांवर चर्चा होऊन शेवटी एक फार महत्त्वाचा निष्कर्ष निघाला की स्त्रियांची चळवळ चालवितांना स्त्रियांच्या व्यक्तिगत दुःखाच्या प्रश्नावर फार ताकद लावू नये. सासरी होणार त्रास, हुंडाबळी अशासारखे प्रश्न कितीही सोडवत राहिले तर ते सोडवता सोडवता कार्यकर्त्यांचा दम संपून जातो पण प्रश्न काही संपत नाहीत त्यामुळे, स्त्रीचळवळीमध्येसुद्धा सामूहिक प्रश्न जनआंदोलनाच्या तंत्राने सोडवायचा हा चांदवड अधिवेशनातील निर्णय स्त्री चळवळीतला क्रांतीकारक निर्णय आहे.

असे जनआंदोलन उभे करण्यासाठी जे काही कार्यक्रम चांदवड अधिवेशनात ठरविण्यात आले त्यामध्ये "जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका समग्र महिला १०० टक्के लढविणार." हा एक कार्यक्रम होता. ग्रामीण भागातील स्त्रियांची सध्याची जी परिस्थिती आहे ती पाहता त्यांना सामाजिक जीवनामध्ये स्थान मिळविणे आणि त्याकरता लागणारा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण होणे हा या कार्यक्रमाचा महत्त्वाचा हेतू होता.

१९८६ साली शेतकरी महिला आघाडीने लगेच निवडणुकांची तयारी सुरू केली. शेतकरी महिला आघाडीने आपला निवडणूक जाहिरनामा तयार केला, ज्या महिला पंचायत राज्य निवडणुकांना उभ्या राहणार होत्या त्यांच्यासाठी प्रशिक्षण शिबिर घेतले, जिल्हा परिषदा-पंचायत समित्यांच्या कामकाजासंबंधी मार्गदर्शक पुस्तिका तयार केली. हे सर्व करीत असताना पंचायत राज्याच्या साहाय्याने विकासाच्या नावाने जी काही कामे झाली त्यांचा आढावाही घेतला. तो घेत असता विकासाच्या बाबतीत महिलांचा दृष्टिकोन सध्याच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा आहे हे ध्यानात आले. महात्मा गांधींनी म्हटलं होतं की विकासाचं धोरण ठरवतांना सगळ्यात नाडलेला, पीडलेला माणूस जो असेल तो नजरेसमोर आणा आणि त्याच्यावर जर या धोरणाचा चांगला परिणाम होणार असेल तरच ते धोरण योग्य आहे असे माना. यापुढे जाऊन, सगळ्यात नाडलेली, पीडलेली स्त्री नजरेसमोर आणून तिच्या कष्टातून तिला सोडविणारे धोरण आखण्याचा निर्णय घ्यायला हवा असे म्हणणे योग्य होईल.

विकासाच्या बाबतीतील ग्रामीण महिलांच्या दृष्टिकोनाचे एक उदाहरण पहा. गावामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करायची असेल तर सध्याच्या व्यवस्थेत काय होते? कुठेतरी विहीर खणून किंवा शेजारी नदी असेल तर तिथे इंजिन किंवा मोटार बसवून गावात पाणी आणलं जातं. गावामध्ये प्रचंड मोठ्या खर्चाची टाकी उंचावर उभारली जाते. त्यात पाणी साठवायचं आणि मग ते गावभर नळाने फिरवायचं. या सर्व व्यवस्थेमध्ये टाकी बांधण्याचाच खर्च जवळजवळ ८० टक्के असतो. हा टाकीचा खर्च मंजूर होत नाही म्हणून आज पुष्कळ योजना पडून राहिल्या आहेत. पण चांदवड अधिवेनशाच्या काळात शेतकरी संघटनेच्या आवाहनावरून आसखेड या गावात अशी योजना राबवली गेली की गावातील महिलांचे डोक्यावर पाण्याने भरलेले हंडे घेऊन नदीचा चढउतार पार करण्याचे रोजचे दोन तासांचे कष्ट बंद झाले.

काय केले आसखेड गावाने? गावाजवळून एक नदी वाहते. त्या नदीपासून गावापर्यंत पाईप टाकले आणि इंजिनने पाणी वर आणून रोज दोन तासांसाठी घराघरात नळांनी पाणी फिरवले. बाया त्या दोन तासांत घरातली भांडी भरून ठेवू लागल्या. हांडे-घागरी भरून डोक्यावर घेऊन चढ चढण्यातले कष्ट संपले आणि वेळही कमी लागू लागला.

ग्रामीण स्त्रीच्या दृष्टीने शौचालये, जळण अशासारख्या समस्या आहेत. पण महाराष्ट्रात पंचायत राज्य संस्था सुरू होऊन २५ वर्षे होऊनही स्त्रियांच्या दृष्टीने विकासाची धोरणे राबवलीच गेली नाहीत, कारण आतापर्यंत डोक्यावरून पाणी आणण्याचं काम ज्यांना पडत नाही ती माणसं धोरणं आखत होती, उघड्यावर संडासला जावे लागण्यात कसे लाजिरवाणे होते याची कल्पना नसलेली मंडळी निर्णय घेत होती. म्हणून ग्रामीण भागातील विकासकामांची आखणी ग्रामीण स्त्रीच्या दृष्टिकोनातून व्हावी यासाठी शेतकरी महिला आघाडीने चांदवडला हा कार्यक्रम जाहिर केला.

पण शेतकरी महिला आघाडीने आपला निवडणुकीचा निर्णय जाहिर केल्यापासून निवडणुका सतत पुढे ढकलल्या गेल्या. शेतकरी महिला आघाडीने दरम्यानच्या काळामध्ये दारूच्या दुकानांच्या बंदीसाठी आंदोलने केली. तसेच, जिल्हा परिषदा आता त्यांच्या मूळ मुदतीपेक्षा फार काळ सदस्यांच्या अधिपत्याखाली चालत राहिल्या म्हणून शेतकरी महिला आघाडीने या जिल्हा परिषदा बरखास्त करून नव्याने निवडणुका घ्याव्यात या मागणीसाठी 'जिल्हा परिषद कब्जा' आंदोलन केले. सध्या महिलांकरिता पंचायत राज्य संस्थांत ३० टक्के राखीव जागा ठेवण्याचा जो निर्णय झाला आहे त्याचे सर्वांत जास्त श्रेय हे शेतकरी संघटनेच्या शेतकरी महिला आघाडीने पंचायत राज्यावर कब्जा करण्याची जी कल्पना मांडली त्याला आहे.

चांदवड अधिवेशनात शेतकरी महिला आघाडीने म्हटले होते की पंचायत राज्य संस्थांत महिला आल्या पाहिजेत; मग त्या कोणत्याही पक्षांच्या असल्या तरी चालेल. मग आता महिलांसाठी ३० टक्के राखीव जागा झाल्या असल्याने शेतकरी महिला आघाडीने स्वंतत्रपणे भाग घेण्याचे काहीच कारण नाही अशी स्थिती असल्यासारखे वाटते. तरीही मग आता शेतकरी महिला आघाडीने हा निर्णय का घेतला?

स्त्रियांसाठी ३० टक्के राखीव जागांचा निर्णय घोषित झाल्यानंतर सर्व पक्षांच्या आणि निवडणूकविषयक सर्वच हालचालींकडे लक्ष दिले तर असे दिसते की या राखीव

**पंचायत राज्य निवडणुका**
**भूमिकेचे प्रास्ताविक**
**शेतकरी संघटक, ६-२१ ऑक्टोबर १९९०**

जागांचा महिलांना फायदा होण्याऐवजी त्याचे दुष्परिणाम होतील. याचे मुख्य कारण या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने जाहिर केलेले तंत्र आहे. कोणत्या जागा राखीव ठेवाव्यात या संबंधी शासनाने जी पद्धती ठरविली आहे ती अत्यंत चुकीची आहे.

शासनाने ठरविलेल्या पद्धतीप्रमाणे सर्व मतदार संघांतून पहिल्या वेळी १, ५, ९ --- अशा क्रमांकाचे मतदार संघ तर पुढच्या वेळी २, ६, १० --- अशा क्रमांकाचे मतदारसंघ महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतील. सर्वच मतदारसंघात महिला मतदार ५० टक्के असतात. पण राखीव जागा ठेवण्याच्या या पद्धतीने सर्वच मतदार संघातील मतदारांत स्त्रियांच्या नियोजनातील सहभागाच्या हक्काची जाणीव निर्माण होणार नाही. जिल्हा परिषदेच्या एका मतदारसंघात पंचायत समितीचे दोन मतदारसंघ असतात. राखीव जागा ठरविण्याच्या शासनाच्या या पद्धतीमुळे एखाद्या जि. प. मतदार संघात जि.प.ची एक जागा पं.स. ची एक जागा अशा दोन जागा महिलांसाठी राखीव होण्याची शक्यता आहे, तर एखाद्या जि. प. मतदार संघात एकही जागा स्त्रियांसाठी राखीव नाही असेही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जेथे दोन जागा महिलांसाठी राखीव होतील तेथील पुरूष कार्यकर्त्यांच्या मनात स्त्रियांच्या सहभागाबद्दल प्रतिकूल भावना तयार होईल तर दुसऱ्या ठिकाणच्या मतदारांमध्ये स्त्रियांच्या सहभागाच्या हक्काची जाणीवच निर्माण होणार नाही. हा या पद्धतीचा एक दुष्परिणाम.

दुसरं म्हणजे, एखाद्या मतदार संघात एखाद्या पुरूष कार्यकर्त्याने आधीच्या काळात चांगले काम केले असेल आणि त्याची जागा स्त्रियांसाठी राखीव झाली तर त्याला आपले सारे श्रम वाया गेल्याची भावना होईल. बरं, आपल्या चांगल्या कामाच्या जोरावर दुसऱ्या मतदार संघात उभं राहायचं ठरवले तर 'उपरा' म्हणून निवडून येण्याची शक्यता कमी. अशा परिस्थितीत चांगल्या 'कार्य'कर्त्यांच्या मनातसुद्धा स्त्रियांच्या राखीव जागांच्या कल्पनेबद्दल प्रतिकूल भावना तयार होणार.

पुन्हा, दर पाच वर्षांनी राखीव जागा बदलणार, असल्याने दोन तृतीयांश मतदारसंघातील विद्यमान सदस्य पुढील निवडणुकीत उभे राहू शकणार नाहीत. त्यामुळे आपल्या मतदारसंघात चांगलं काम करून लोकांची मान्यता मिळविणे, मतदारसंघ सांभाळून ठेवणे अशी महत्त्वाकांक्षा ठेवण्याला काही वावच राहात नाही.

हे शासनाने राखीव जागा निश्चित करण्यासाठी ठरविलेल्या पद्धतीचे होणारे दुष्परिणाम आहेत.

वेगवेगळ्या पक्षांच्या हालाचालींकडे पाहिल्यास असे दिसते की या पद्धतीवर मात करण्यासाठी त्यांनी उपाय काढला आहे. जी जागा राखीव ठरेल तिथे जो कुणी पुरूष पुढारी उभा राहिला असता त्याच्याच घरची एखादी स्त्री उभी करून महिलांच्या जागा भरल्याचे समाधान मानायचे.

म्हणजे अशा स्त्रियांना स्त्रीप्रश्नाचा अभ्यास असो किंवा नसो, स्त्रियांच्या विकासाविषयीच्या दृष्टिकोनाबद्दल माहिती असो, नसो, त्या केवळ पुढाऱ्यांच्या खानदानातल्या आहेत म्हणून त्या उभ्या राहतील आणि निवडूनही येतील. कदाचित्, पण अशा तऱ्हेच्या स्त्रिया निवडून गेल्याने स्त्रीचळवळीला फायदा होण्यापेक्षा तोटाच होण्याची शक्यता जास्त.

तीस टक्के राखीव जागा आणि त्या निश्चित करण्याच्या पद्धतीमुळे इतर जागांवर स्त्रियांचा काहीच अधिकार राहात नाही. एखाद्या मतदार संघात एखादी चांगली स्त्री-कार्यकर्ती असेल आणि ती जागा राखीव नसेल तर तिला तिथं उभं राहण्याची शक्यता राहात नाही. बंदी आहे म्हणून नव्हे. पण तिथे ती निवडून येणार नाही. जसं बिगरराखीव जागांवर अनुसूचित जाती-जमातीची माणसं निवडून आल्याचं उदाहरण सापडणं मुश्किल तशीच ही बाब. कारण लोकांच्या मनात प्रतिकूल भावना तयार होतील की बायांसाठी तिकडे राखीव जागा आहे मग ही बाई इकडे कशाला उभी राहिली? हा या पद्धतीचा फार मोठा दुष्परिणाम आहे.

असेच दुष्परिणाम नगरपालिका व महानगरपालिकांमधील स्त्रियांच्या राखीव जागांच्या बाबतीतही होणार.

या सर्व गोष्टींचा विचार करून शेतकरी महिला आघाडीने ऑगस्ट १९९० मध्ये झालेल्या बैठकीत पहिल्यांदा अशी कल्पना मांडली की राखीव जागांची संकल्पनाच मुळात अमान्य असली तरी आता या निर्माण झालेल्या राखीव जागा स्त्रियांच्या प्रश्नाविषयी काम करणाऱ्या स्त्रीचळवळीतील कार्यकर्त्यांना मिळायला पाहिजेत. तसेच राखीव जागा ठेवण्यामागील स्त्रियांच्या नियोजनातील सहभागाच्या हक्कांच्या प्रस्थापनेचा जो हेतू आहे त्याची जाणीव सर्वच मतदारांच्या मनात निर्माण व्हाही या हेतूने शेतकरी महिला आघाडीने राखीव जागा ठरविण्याची एक पद्धती सुचविली होती.

सूचना अशी होती की जिल्हा परिषदेची एक जागा आणि त्याच्या अंतर्गत असलेल्या पंचायत समितीच्या दोन जागा यातील कोणतीही एक जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवावी. तसेच नगरपालिकांच्या बाबतीत तीन मतदार संघाचा एक संयुक्त मतदारसंघ करून तेथे प्रत्येक मतदारास तीन मतांचा हक्क देऊन त्यापैकी किमान एक मत स्त्री उमेदवारास द्यायला हवे अशी मतदानाची पद्धती ठेवावी. या पद्धतीमुळे सर्व मतदारांमध्ये स्त्रियांच्या सहभागाच्या हक्काची जाणीव तयार होईल. पण शासनाने ही सूचना दुर्लक्षित करून दुष्परिणामकारक अशी आपली पद्धतीच वापरून राखीव जागा निश्चित केल्या.

या परिस्थितीवर विचार करण्यासाठी शेतकरी महिला आघाडीची बैठक २४ सप्टेंबर १९९० रोजी घेण्यात आली. आदल्या दिवशी शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक होऊन जिल्हा परिषद निवडणुकीतील भूमिका ठरविण्याचा अधिकार शेतकरी महिला आघाडीला देण्यात आला होता.

सर्व परिस्थितीचा विचार करून राखीव जागांच्या धोरणामुळे स्त्रियांसाठी समाजात वेगळा 'डबा' तयार होण्याचे टळावे यासाठी शेतकरी महिला आघाडीने या निवडणुका व्यापक स्वरूपात स्वतंत्रपणे लढविण्याचा निर्णय घेतला. शासनाने निर्माण केलेल्या ३० टक्के राखीव जागा तर शेतकरी महिला आघाडी लढवील पण ५० टक्के अस[illegible] स्त्रियांना ५० टक्[illegible]स तरी हक्क असायला हवा याची जाणीव निर्माण करण्यासाठी इतरही जागा लढवील. ●

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक, फेब्रुवारी १९९२
# शेतकरी महिला आघाडीचा जाहिरनामा

महाराष्ट्रात जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या निवडणुका दिनांक १२ फेब्रुवारी १९९२ रोजी घडवून आणण्याचे अखेरीस महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मान्य केले. या निवडणुका पाच वर्षांपूर्वीच म्हणजे फेब्रुवारी १९८७ मध्येच व्हायचे ठरले होते. पण, नोव्हेंबर १९८६ मध्ये चांदवड अधिवेशनात शेतकरी महिला आघाडीने या निवडणुका लढविण्याचे घोषित केले आणि त्यानंतर आजपर्यंत या निवडणुका घेण्याचे धाडस शासनाला झाले नव्हते.

होऊ घातलेल्या निवडणुकीत ३० टक्के जागा महिलांकरिता राखून ठेवण्याचे शासनाने मान्य केले आहे; त्यामुळे महिला आंदोलनाच्या शिडातील हवा काढून घेतल्यासारखे होईल अशी शासनाची कल्पना आहे.

राखीव जागा ठरविण्याची पद्धत शासनाने अशा कपटाने ठरवली आहे की त्यामुळे खऱ्याखुऱ्या महिला आंदोलनाचे नुकसानच व्हावे. कोणत्याही राजकीय पक्षास स्त्रियांचे खरेखुरे प्रतिनिधी निवडून आणण्यात अजिबात स्वारस्य नाही. जेथे जेथे मतदारसंघ स्त्रियांकरिता राखीव असेल तेथे तेथे प्रस्थापित पुढाऱ्यांच्या घरातीलच एखाद्या महिलेला उभे केले म्हणजे भागेल असे आडाखे ते मनाशी बांधीत आहेत.

स्त्रियांसाठी जागा राखीव ठेवल्याने एक मोठी संधी ग्रामीण भागातील महिलांसमोर चालून आली आहे. ही संधी हातची जाणार नाही आणि ग्रामीण महिलांच्या समस्यांची जाण असलेले महिलांचे खरेखुरे प्रतिनिधीच जिल्हा परिषदेत व पंचायत समितीत जातील याची खात्री करून घेतली पाहिजे.

महाराष्ट्रभरच्या ग्रामीण महिलांचे सर्वंकष प्रतिनिधित्व करणारी एकमेव संघटना म्हणजे शेतकरी महिला आघाडी.

★ शेतकरी महिला आघाडी म्हणजे जात-पात, धर्म-पंथ, भाषा-प्रांत या भेदांपलीकडे जाऊन केलेली शेतकरी महिलांची एकजूट आहे. १० नोव्हेंबर १९८६ रोजी चांदवड येथे भरलेल्या महिला अधिवेशनात जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका लढवून त्या ताब्यात घेण्याची घोषणा केली गेली. या निर्णयाला शेतकरी संघटना तसेच इतर शेतकरी कष्टकऱ्यांच्या अनेक संस्थांनी संपूर्ण पाठिंबा व्यक्त केला.

★ शेकडो वर्षे पाशवी बळाच्या आधारे उत्पादक श्रमाचे फळ हिरावून घेतले गेले. हिंसाचार केला गेला. ह्यात खऱ्या हरल्या सगळ्या स्त्रिया. समाजातील असुरक्षिततेमुळे स्त्रियांना घरात गाडून घ्यावे लागले. घरातील अत्याचारही त्यांना निमूटपणे सोसावे लागले.

★ स्वातंत्र्य मिळाल्यानंतर गेल्या चव्वेचाळीस वर्षात शोषण अधिकच उग्र झाले. काळ्या साहेबांच्या शहरी राज्यामध्ये गावखेड्यात पुढारी गुंडांचे आणि शहरांत पुढारी दादांचे साम्राज्य चालू झाले.

★ सहकारी संस्था, कारखाने, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या ग्रामीण गुंडांचे अड्डे बनले.

★ स्त्रियांना निर्भयपणे जगता यावे म्हणून शेतकरी महिला आघाडीने गुंडांचे बालेकिल्ले बनलेल्या पंचायत राज्य संस्थांमध्ये शिरकाव करून त्या गुंडांचे पारिपत्य करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे.

★ पंचायत राज्य स्त्रियांनी हाती घेतल्याने ग्रामीण भागातील स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढेल. आयाबहिणींची प्रतिष्ठा वाढेल. मुख्य म्हणजे विकासाच्या कार्यक्रमांकडे स्त्रियांच्या नजरेतून पाहिजे जाईल. स्त्रियांचे आरोग्य, कुपोषण, गावासाठी पाण्याची सोय, स्वच्छता ह्या सर्व कार्यक्रमांना अग्रक्रम लाभेल. आज नुसता भ्रष्टाचार आणि स्वार्थ यांचे थैमान माजले आहे. त्याला आळा बसून खऱ्या अर्थाने विकासाचे कार्यक्रम हाती घेतले जातील. त्यात अडचणी येतील तेव्हा शासनावर दबावही आणता येईल.

**पंचायत राज्य निवडणूक १९९२**
**शेतकरी संघटक, २१ डिसेंबर १९९१**

★ विटनेर (जळगाव), येणोरा (वर्धा), मेटीखेडा (यवतमाळ), सालोड कसबा (अमरावती) इत्यादी ग्रामपंचायती ताब्यात घेऊन शेतकरी महिला आघाडीने त्या त्या गावांमध्ये खऱ्याखुऱ्या अर्थाने विकास कार्यक्रम राबवायला सुरुवात करून आपल्या कामाचे उदाहरण पुढे ठेवले आहे.

★ गावगुंडांच्या साम्राज्याचा पाया उखडणे आणि गावागावात निर्भय वातावरण निर्माण करणे हे महत्त्वाचे काम शेतकरी महिला आघाडी पार पाडणार आहे.

१९८६ सालापासून ग्रामीण महिलांसाठी शेतकरी महिला आघाडीने दारू दुकान बंदी व लक्ष्मीमुक्ती हे कार्यक्रमही जोमाने चालवले आहेत. लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमात घरच्या माणसांनी लक्षावधी शेतकरी महिलांना स्वतःच्या नावे जमीन स्वखुशीने करून दिली आहे.

स्त्रियांना जमिनीवर मालकी देण्यापलिकडे सीतोशेती व माजघरातील प्रक्रिया शेती अशा कार्यक्रमांमुळे शेतकरी स्त्रियांना स्वयंसिद्धा बनविण्याचा व्यापक कार्यक्रम आखण्यात आला आहे.

स्वयंसिद्धा स्त्रियांचे अभिमानस्थळ प्रतिक म्हणून यवतमाळ जिल्ह्यातील रावेरी येथे सीतेचे मंदिर बांधण्याचा संकल्पही शेतकरी महिला आघाडीने केला आहे.

शेतकरी महिला आघाडी पुढील विकास कार्यक्रम अग्रक्रमाने राबवील –

(१) स्त्रियांना मालमत्ता व मिळकत यावरील मालकीत व्यापक सहभाग मिळवून देणे.

(२) गावागावातील दारूची दुकाने पंचायतींवर ठराव करून बंद करवणे.

(३) पाणी पुरवठा, तलाव, धरणे यांच्या योजना तयार केल्या गेल्या त्या

कारखान्यांना, शेतीला पाणी पुरविण्याकरिता, मोठ्या योजनांच्या कंत्राटाच्या पैशाचा फायदा घेण्याकरिता आणि राजकीय डावांच्या खेळी खेळण्याकरिता. केवळ पिण्याचे पाणी भरण्याकरिता दररोज मैलोगणती चालून डोक्यावर हंड्यांच्या उतरंडी घेऊन तासन् तास राबणाऱ्या स्त्रियांना काय पाहिजे आहे याचा विचार कोणी केला नाही. तो कार्यक्रम शेतकरी महिला आघाडी हाती घेईल.

(४) आरोग्याच्या योजनांसारखे प्रकल्प आखले गेले, त्यातही बहुराष्ट्रीय औषध कंपन्यांची सोय पाहिली गेली, सरकारी नोकरांच्या बढतीचा प्रश्न महत्त्वाचा मानला गेला. कोट्यावधी स्त्रियांना मात्र आजही कुपाटी वापरावी लागते. आयांची आणि त्यांच्या मुलाबाळांची आबाळच होते आहे. आरोग्याच्या ग्रामीण गरजा लक्षात घेऊन स्वस्त, उपयुक्त औषधपाण्याची सोय करण्याचा कार्यक्रम हाती घेतला जाईल.

(५) इंधन आणि ऊर्जेचे प्रकल्प परदेशी आणि स्वदेशी तंत्रज्ञान व कारखानदारांच्या फायद्याकरिता झाले. संध्याकाळच्या वेळी चुलीत जाळण्यासाठी काटेवाटेने काटक्याकुटक्या जमा करीत चालणाऱ्या स्त्रीचा विचार झालाच नाही. गावातल्या प्रत्येक चुलीला पुरेसे इंधन मिळेल ह्यासाठी शेतकरी महिला आघाडी वेगवेगळे कार्यक्रम हाती घेण्याचा प्रयत्न करेल.

(६) रोजगाराच्या योजनांच्या नावाने खड्डे खणणे, खडी फोडणे असली कामे बायांच्या वाट्याला येतात. धुळ्याच्या अक्काबाई राजपूतप्रमाणे प्रसूतिवेदनांच्या शेवटच्या क्षणापर्यंत खडी फोडण्याचे काम कोणाच्याही नशिबी येऊ देणार नाही असा शेतकरी महिला आघाडीचा निर्धार आहे.

(७) पंचायत राज्याच्या संस्था महाराष्ट्रभर ताब्यात घेऊन एक किमान कार्यक्रम शेतकरी महिला आघाडीने निश्चित केला आहे. या संस्थांना शासनाच्या आर्थिक गुलामगिरीतून सोडविले तरच हा कार्यक्रम प्रत्यक्षात येऊ शकेल. त्यासाठी या संस्थांची स्वतःची आर्थिक ताकद वाढविण्याच्या योजनाही हाती घेतल्या जातील.

थोडक्यात, येत्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत शेतकरी महिला आघाडीचा कार्यक्रम आहे –

**स्त्रीचा सन्मान, लक्ष्मीमुक्ती, दारुदुकानबंदी आणि पाणी, औषध, जळण आणि रोजगार यांची महिलाप्रधान व्यवस्था.** ●

**(पान ३३ वरून)**

भाषणांप्रमाणे भाषणे करतात पण बाकीचे नेते दबून दबूनच बोलत आहेत. निवडणुक आयोगासमोरील कार्यवाहीमुळे शिवसेनेच्या खोकडाची शेपटी बरोबर सापळ्यात अडकल्यासारखी झाली आहे.

येत्या तीन दिवसांत प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात होईल आणि त्यानंतर आठवड्या-भरात निवडणुकीचे निर्णय हाती येतील. तोपर्यंत सर्व काही, फार रक्तपात न होता पार पडो अशी इच्छा. सर्वांनी मते द्यावीत, निर्भयपणे द्यावीत, आपल्याला योग्य वाटेल अशा उमेदवारास द्यावीत. निवडणूक प्रक्रियेत कोणताही अडथळा आणू नये. सध्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेता पुण्याच्या शेतकरी पंचायतीने जाहिर केलेला सत्याग्रहाचा कार्यक्रमसुद्धा स्थगित ठेवण्यात आला आहे. देश घायाळ झालेला आहे. पण इतिहासात अनेक वेळा अशा प्रसंगी महात्मे उदयास आणण्याचे सामर्थ्य या देशाने दाखविले आहे. हे पुन्हा घडेल याबाबत माझ्या मनात शंका नाही. तोपर्यंत, आज तातडीने या निवडणुकांच्या काळात एकच खबरदारी आपण घेऊ शकतो. देशाच्या जखमा बऱ्या करणारा धन्वंतरी येईपर्यंत जखमांमध्ये जातीयवादाच्या जंतूंचा शिरकाव होणार नाही. आणि त्यांचा प्रभाव वाढणार नाही एवढी खबरदारी प्रत्येक मतदाराने घेतली पाहिजे. काही नाही तरी, जातीय-वादाला दूर ठेवण्याइतकी सुबुद्धता भारतातील मतदारांत आणि विशेषतः शेतकरी समाजात आहे असे सिद्ध झाले तर संकट टळेल आणि विकासाची वाट मोकळी झाली असं होईल.

**(पान ३६ वरून)**

रसातळाला नेले आहे. त्याला कोण वाचविणार असा प्रश्न आपल्याला पडेल. ह्याचे उत्तर एकच आहे, स्त्रिया. देशातील समग्र स्त्रिया - ग्रामीण स्त्रिया, लढाऊ शेतकरी स्त्रिया, हजारो वर्षे शेतीत राबलेल्या आणि गुलामगिरीची किंमत मोजून शहाण्या झालेल्या स्त्रिया.

पंचायत राज्याची सूत्रे आता आपल्या ताब्यात घेतली पाहिजेत. पंचायत राज्याचे शेत राजकारणी कुंपणानेच खाल्ली आहे. ते मुक्त करण्यासाठी स्त्रियांनी संघटित होऊन लढले पाहिजे.

आपल्याला काय हवे आहे?

१) स्वराज्य हवे, फक्त सुराज्य नको.

२) भारत हवा, इंडिया नको.

३) राज्य गावाचे हवे, दिल्लीचे नको.

४) परिवर्तन हवे, माणूस गमावलेला विकास नको.

५) नियोजन लोकांचे, लोकांकडून, लोकांसाठी हवे.

नियोजन वरून लादलेले नको.

६) लोकसंघटना हवी, नोकरशाहीची साखळी नको.

७) आयाबहिणींचे राज्य हवे, टग्यांचे राज्य नको.

८) सेवा-केंद्र हवे, सत्ताकेंद्र नको.

ह्या सर्व बाबतीत स्त्रियांची एकजूट होऊ शकते. स्त्रियांचे, गावांचे, शेतीचे शोषण कायमचे बंद झाले पाहिजे. म्हणून पंचायत राज्य जिंकले पाहिजे.

शेतकरी संघटनेने इंडिया-भारत शोषणसंबंधाचे अर्थशास्त्र मांडले. ह्या विचारातून शेतकऱ्यांच्या गरिबीचा इतिहास समजतो. स्त्रियांच्या गुलामगिरीची मीमांसा समजते. तसेच ह्या पंचायत राज्यव्यवस्थेच्या अवकळेची कारणपरंपराही समजते.

पंचायत राज्याच्या निवडणुका म्हणजे ह्या इंडिया-भारत लढ्याचा एक भागच मानला पाहिजे. चांदवडच्या निर्णयाचा अर्थ या संदर्भात समजून घेतला पाहिजे.

*(सौ. विद्युत भागवत यांनी शेतकरी महिला आघाडीसाठी संपादित केलेल्या 'शेतकरी महिला व पंचायत राज्य' या पुस्तकाचे पहिले प्रकरण)*

# खऱ्या विकास कार्याच्या सुरुवातीसाठी
# शेतकरी महिला आघाडी

**माझ्या शेतकरी भावांनो**
**आणि मायबहिणींनो,**

पुऱ्या १३ वर्षांनी महाराष्ट्रात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. मध्यंतरीच्या काळांत लोकसभेच्या चार निवडणुका झाल्या, राज्य विधानसभेच्या निवडणुका तीनदा झाल्या. पंचायत राज्याच्या निवडणुका घ्यायला मात्र शासनाला सवड होत नव्हती.

जुन्या जिल्हा परिषदांचे आणि पंचायत समित्यांचे सदस्य त्यांच्या जागी कंटाळून गेले. एक कॉंग्रेसी सदस्य तर म्हणाला "आता खाऊन खाऊन कंटाळा आला" तरी शासनाला या निवडणुका घ्यायची हिम्मत होत नव्हती.

शेतकरी महिला आघाडीने नवीन निवडणुका घडवून आणण्याची मागणी नेटाने चालवली होती. राजीव गांधी पंतप्रधान असतांना "१९८९ साली या निवडणुका होतील" अशी त्यांनी ग्वाही दिली होती. त्यांचा शब्द पाळण्याचीसुद्धा महाराष्ट्र शासनाची इच्छा नव्हती.

शेतकरी महिला आघाडीने या दिरंगाईचा निषेध केला. शेतकरी महिलांनी हा प्रश्न वेशीवर टांगण्यासाठी एक दिवस मोठा सत्याग्रहाचा कार्यक्रम केला. प्रत्येक जिल्ह्यात ह्या परिषदांच्या कार्यालयांना घेराव घातला. अध्यक्षांच्या कार्यालयांत जाऊन त्यांची मानाची खुर्ची कब्जांत घेण्याचा कार्यक्रम केला. तरीही शासन ढिम्म हलायला तयार नव्हते.

तशा या निवडणुका मार्च १९८७ मध्ये व्हायचे ठरले होते. सगळ्या तयाऱ्या झाल्या होत्या. पण नोव्हेंबर १९८६ मध्ये चांदवड येथे शेतकरी महिला अधिवेशन झाले. लाखांच्या संख्येने महिला उपस्थित राहिल्या. स्त्री शक्तीच्या त्या भव्य आणि समर्थ दर्शनाने सगळेच दिपून गेले.

चांदवड अधिवेशनाचा एक महत्त्वाचा ठराव जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या निवडणुकांसंबंधी होता. होऊ घातलेल्या निवडणुकांत सर्वच्या सर्व जागा महिलांनी लढवण्याचा निर्धार या ठरावांत जाहिर करण्यांत आला होता. या घोषणेने तर गावगन्ना पुढाऱ्यांचे धाबेच दणाणले. लगेच निवडणुका पुढे ढकलण्याची घोषणा झाली. एकदा, दोनदा, तीनदा, पांच..... वेळा निवडणुकांची अशी कुतरओढ झाली.

स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याला तोंड कसे द्यायचे हे शासनाला समजेना. मग शासनाने एक युक्ती काढली. "जीवावर बेतलेले शेपटावर निभवावे" अशा हिशोबाने पंचायत राज्यातील ३०% जागा महिलांकरिता राखीव ठेवण्यांत आल्या. गणित असे की निदान उरलेल्या ७०% जागा तरी सुरक्षित रहाव्यात.

१९८९ च्या निवडणुकांत कॉंग्रेस शासन बुडता बुडता वाचले. राज्य शासन स्थिर नाही. जिल्हा परिषदांच्या उचापती कोठे करत बसतां? अशा धास्तीने निवडणुका आणखी पुढे ढकलण्यांत आल्या. कोर्टाच्या आदेशाचे केवळ निमित्त शासनाने वापरले. कोर्टाचा आदेश इच्छा असली तर कसा पटकन बाजूला करता येतो हे सुधाकरराव नाईकांनी आता दाखवून दिलेच आहे!

तेवढ्यांत, महाराष्ट्रांत आयाराम गयारामांचे पीक आले. केन्द्रांतही कॉंग्रेसचे राज्य आले. विरोधी पक्ष खिळखिळे होऊ घातले. आता सामन्याला कोणीच नाही असे वाटू लागल्यावर पळपुट्या शासनाला निवडणुका जाहीर करायची तेरा वर्षांनी हिम्मत झाली आहे.

महिलांकरिता जागा राखीव ठेवणे ही कल्पना मुळातच हास्यास्पद आहे. महिला म्हणजेच काही मागास जातीजमातीच्या नव्हेत की त्यांच्या करता जागा राखीव ठेवाव्या. अशा तऱ्हेने राखीव जागा ठेवणे म्हणजे समग्र महिला समाजाचा अपमान आहे. पण ७०% जागा पुढाऱ्यांना सुरक्षित करण्यासाठी शासनाने ही चालबाजी केली आहे.

बरे, ३०% जागा राखीव ठेवायचे तर ठरवले. पण कोणते मतदारसंघ राखीव ठेवायचे? अनुसूचित जातीजमातींकरतां मतदार संघ राखीव ठेवण्यांत येतात. ज्या मतदार संघात अशा जातीजमातींची लोकसंख्या मोठी असेल अशांपैकी काही मतदार संघ निवडले जातात.

ही पद्धत महिलांच्या बाबतीत कशी लागू करणार? महिलांचे प्रमाण सगळ्या मतदारसंघांत सारखेच. निम्म्याला निम्मे. मग राखीव मतदार संघ निवडायचे कसे? शासनाने चिठ्ठ्या टाकून राखीव मतदार संघ ठरवले. पुढच्या निवडणुकांच्या वेळी यावेळच्या सर्वसाधारण मतदार संघाच्या नावांच्या चिठ्ठ्या पुन्हा टाकणार आहेत. म्हणजे यावेळच्या सर्व राखीव जागा पुढच्या वेळी बिगरराखीव होणार. आणि यंदाच्या साधारण जागांपैकी निम्म्या जागा पुढच्या वेळी राखीव होणार असा पोरखेळ शासनाने मांडला आहे. पंचायत राज्य व्यवस्थेची ही क्रूर चेष्टा आहे.

महिलांना सामाजिक जीवनांत स्थान मिळवून द्यायचे तर निवडणुकांतील त्यांच्या सहभागाचा परिणाम एकूण एक मतदारसंघांत जाणवला पाहिजे. सध्याच्या पद्धतींत काय होणार आहे? ७० % मतदारांना महिला उमेदवारांना मते द्यायची संधीही मिळणार नाही. महिलांचे जणू वेगळे महिलास्थान तयार करायला सरकार निघाले आहे!

चिठ्ठ्यांच्या पद्धतीचा आणखी एक मोठा गंभीर परिणाम होणार आहे. काही होतकरू कार्यकर्ते परिश्रमाने एखाद्या मतदार संघात काम करून तयारी करतात. निवडणुका तोंडावर आल्यावर सरकार जाहीर करणार की ही जागा राखीव आहे. म्हणजे त्या उमेदवाराने केलेले सगळे कार्य वाया जाणार आणि चांगले उमेदवार नाउमेद होणार. चिठ्ठी पद्धतीचा याहूनही सर्वात

**पंचायत राज्य निवडणूक १९९२**
**शेतकरी संघटक, ६ फेब्रुवारी १९९२**

भयंकर असा एक परिणाम आहे. यावेळी निवडून आलेल्या ३०% महिला सदस्यांना पक्के ठाऊक असणार की पुढच्या निवडणुकीत त्यांचा संघ सर्वसाधारण ठरणार. म्हणजे त्यांच्या मतदारसंघात उमेदीने काम करण्याची त्यांची इच्छाच संपणार. ७०% पुरुष सदस्यांची परिस्थिती तशीच. पुढच्या निवडणुकांत त्याच मतदारसंघातून पुन्हा उभे राहण्याची शक्यता त्यांच्यापैकी फक्त निम्म्या सदस्यांनाच असणार. पण कोणा निम्म्या सदस्यांच्या वाट्याला हे भाग्य येणार हे माहिती नसल्याने सगळेच्या सगळेच गळबटून जाणार हे उघड आहे. चिठ्ठ्यांच्या पद्धतीने महिलांसाठी ३०% राखीव जागांची निवड हा शासनाने पंचायत राज्य नेस्तनाबूत करण्याची आखलेली योजना आहे.

महिला आघाडीने खूप प्रयत्न केले. शासनाला पर्यायी योजना दिली. एका मंडलात एक जिल्हा परिषदेची आणि दोन पंचायत समित्यांच्या अशा तीन जागा असतात. या तीनांपैकी एक जागा क्रमाक्रमाने राखीव ठरवल्यास चिठ्ठी पद्धतींतील सर्व दोष दूर होतात हे सविस्तरपणे सांगितले. पण शासन जरासुद्धा ऐकायला तयार नाही.

राज्यकर्त्यांचा डावपेच स्पष्ट आहे. महिलांकरिता जागा राखीव ठेवण्याची त्यांची भावनाच खोटी आहे. कोणता मतदारसंघ राखीव आहे अथवा बिगरराखीव याचे त्यांना काहीच भलेबुरे सोयरसुतक नाही. मतदारसंघ बिगरराखीव असला तर टग्या पुढारी उभा राहणार. महिलांकरिता राखीव असला तर त्याच पुढाऱ्यांची, घरांतील एखादी मायबहिणी कळसुत्री बाहुलीसारखी उभी करणार. कामकाजात काही फरक नाही. खाबूगिरीत बाधा नाही. महिला आंदोलनाचा असा बोजवारा करण्याचा शासनाचा इरादा आहे.

भरीत भर म्हणून शासनाने आणखी एक मनाचा कोतेपणा दाखवला. शेतकरी महिला आघाडीला राखीव चिन्ह द्यायला नकार दिला. डाव असा की महिला आघाडीची काही मते तरी बाद होऊन जावीत.

पुऱ्या तेरा वर्षांनी निवडणूक होते आहे. पण ही काही खुली लोकशाही लढत नाही. आपल्या पैलवानाला सोयीचा होईल असा तयार केलेला हा आखाडा आहे.

असल्या बनावट सामन्यांच्या मैदानांतही उतरायचे शेतकरी महिला आघाडीने ठरवले आहे. महिलांसाठी राखीव असलेल्या सगळ्या जागा, म्हणजे ३०% जागा महिला आघाडीच्या क्रियाशील कार्यकर्त्या लढवणार आहेत. काही थोडया सर्वसाधारण जागासुद्धा आघाडी लढवेल. निर्णय मोठा धाडसाचा आहे. शेतकरी महिला आघाडी हा काही पक्ष नव्हे. तिच्या मागे ना सत्तेचे पाठबळ, ना पैशाचे. महिलांच्या जागृतीच्या आणि असंख्य शेतकरी पुरुषांच्या पाठबळाच्या भरवशावर महिला आघाडीने हा निर्णय घेतला आहे.

खरे म्हटले तर शेतकरी महिला आघाडीखेरीज कोणा इतर संघटनेला किंवा पक्षाला महिलांच्या राखीव जागा लढवण्याचा काही अधिकारच नाही. या निवडणुकांसाठी आघाडीने आपला तपशीलवार जाहीरनामा प्रसिद्ध लगेच करून टाकला. त्यात काहीच अडचण आली नाही. कारण आघाडीचा महिलांसंबंधीचा विचार आणि कार्यक्रम सुस्पष्ट आहे. इतरांना जाहिरनाम्यांत काय लिहावे याचीच पंचाईत पडली आहे.

गेली सहा वर्षे सातत्याने आघाडीने ग्रामीण महाराष्ट्रांतील महिलांत अभूतपूर्व जागृती घडवून आणली आहे.

महिलांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी चांदवड आणि अमरावती येथे अतिप्रचंड उपस्थितीची अधिवेशने भरवली. जिल्ह्याजिल्ह्यांत संमेलने केली.

ज्यांनी सूर्य पाहू नये आणि ज्यांना सूर्याने पाहू नये अशा भल्या घरच्या महिला गावोगाव, राज्यभर आणि इतर राज्यांतही जाऊन आघाडीची बांधणी करू लागल्या.

दारू म्हणजे सगळ्या स्त्रियांच्या संसारांत माती कालवणारी अवदसा. आणि गावांतील दारूचे दुकान म्हणजे पुढाऱ्यांचा अड्डा. या दुकानांना बंद करण्याचे आंदोलन आघाडीने प्रखरपणाने चालवले. शासन नमले. ज्या गावांतील पंचायत दारूचे दुकान बंद करण्याचा ठराव करील तेथे त्याचा अंमल होइल असे सरकारने मान्य केले. पण प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र शून्य. अंमलबजावणी होइल कशी? दारूची दुकाने बंद झाली तर पुढाऱ्यांचे प्राणच जातील ना!

आघाडीचा सर्वांत क्रांतिकारी कार्यक्रम म्हणजे लक्ष्मीमुक्तीचा. सीतामाईच्या काळापासून स्त्रियांच्या नावाने कधी मालमत्ता झाली नाही. घरांतल्या पाळीव जनावरांप्रमाणे स्त्रिया राहिल्या. मालकाने लाथ मारून हाकलले तर त्यांची स्थिती बेवारशीच; सीतामाईसारखी. गेल्या १५ महिन्यांत महाराष्ट्रांतील २ लाख स्त्रियांच्या नावाने जमिनी लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमामुळे झाल्या.

१० नोव्हेंबर १९९१ ला शेगांव येथे शेतकरी मेळावा झाला. चतुरंग शेतीच्या कार्यक्रमांत स्त्रियांना अग्रमानाचे स्थान देण्यांत आले आहे. नव्या शेतीचे जिवंत तंत्रज्ञान प्रयोगांनी तयार करण्याची जबाबदारी "सीता शेती" कार्यक्रमाने शेतकरी महिलांकडे दिली आहे.

शेतमालावर प्रक्रिया करून चढता भाव मिळवण्याचा माजघर शेतीचा कार्यक्रम. त्याचीही जबाबदारी शेतकरी महिला आघाडीने स्वीकारली आहे.

महिलांची, महिलांसाठी झटणारी ग्रामीण महाराष्ट्रांत आज एकच एक संघटना आहे ती म्हणजे शेतकरी महिला आघाडी. निवडणुकांपासून ती दूर राहिली तर महिलांच्या प्रश्नाची ज्यांना समज नाही, कळकळ नाही अशा कळसूत्री बाहुल्या राखीव जागांवर जाऊन पडतील आणि त्यामुळे महिला आंदोलनाचे प्रचंड नुकसान होईल. महिला आघाडीला जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लढवण्या पलिकडे पर्यायच नव्हता. महिलांशी आघाडीचे अतूट नाते आहे. निवडणुकांमुळे हे नाते तुटणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

कोणी विचारेल मग महिला आघाडी ३०% जागाच का लढवत आहे? चांदवड अधिवेशनांत ठरल्याप्रमाणे सगळ्या १००% जागा का लढवत नाही? या प्रश्नाचे उत्तर उघड आहे. जेव्हा राखीव जागा नव्हत्या तेव्हा सर्वच्या सर्व जागा लढवायला काही प्रत्यवाय नव्हता, पण ३०% जागा राखीव

झाल्याने परिस्थिती बदलते. बिगरराखीव जागाही महिला आघाडीने लढवल्या असत्या तर पुरुषांच्या मनांत विनाकारण विरोध आला असता. अशा विरोधाने कोणाची हौस भागत असेल तर गोष्ट वेगळी. पण महिलांचे व आंदोलनाचे त्याने काहीच भले होणार नाही; नुकसानच होईल. शिवाय ज्या बिगरराखीव मतदारसंघात विशेष कर्तृत्ववान समर्थ महिला उमेदवार उपलब्ध असेल तेथेही आघाडी निवडणुका लढवणार आहेच.

या निवडणुका लढवून आघाडीला साध्य काय करायचे आहे? महिला आघाडीच्या जाहिरनाम्यांत या प्रश्नाची व्यापक चर्चा आहे. त्याचा सारांश येथे सांगतो.

दारु दुकान बंदी आणि स्त्रियांच्या मालमत्तेवरील हक्काचा प्रश्न महिला आघाडीने आजपर्यंत हिरीरीने मांडला आहे. तामीळनाडूप्रमाणे महाराष्ट्रांतही सर्व दारुची दुकाने बंद व्हावीत हा आघाडीचा आग्रह आहे.

शेतकरी महिलांना व्यापक मालमत्तेचा अधिकार असणारा महाराष्ट्र हा सर्व जगांत पहिला प्रदेश व्हावा ही आघाडीची महत्त्वाकांक्षा आहे.

"सीता शेती", "माजघर शेती" या स्वयंभू कार्यक्रमांतून महिलांना स्वयंसिद्धा बनवावे हा महिला आघाडीचा निश्चय आहे.

स्वयंसिद्ध बनलेल्या महिलांनी यवतमाळ जिल्ह्यांतील रावेरी गावी "स्वयंसिद्धा सीतेचे" मंदिर बांधून जगभरच्या स्त्रियांना एक प्रेरणास्थान तयार करावे असा महिला आघाडीचा संकल्प आहे.

पण या पलिकडे जाऊन पंचायत राज्य व्यवस्थेमार्फत विकासाचा एक अगदी वेगळा कार्यक्रम राबवण्याचे महिला आघाडीने ठरवले आहे.

महात्मा गांधींनी सर्व आर्थिक सामाजिक धोरणांसाठी एक महत्त्वाचे सूत्र सांगितले. कोणतेही धोरण चांगले का वाईट कसे ठरवावे ? समाजांतील जो सर्वांत दुर्बल पीडित मनुष्य असेल त्याच्यावर त्या धोरणाचा परिणाम काय होईल असा प्रश्न विचारावा. जर त्या शेवटच्या पायरीवरील मनुष्याच्या आयुष्यांत काही सुधारणा होणार असेल तर ते धोरण योग्य; अन्यथा अयोग्य असा हा महात्माजींचा मंत्र. दीनदुबळ्यांच्या डोळ्यांनी पहायला शिका, दांडग्याच्या नाही असा त्याचा थोडक्यात अर्थ.

महिला आघाडीच्या जाहीरनाम्यात हेच तत्त्व स्वीकारले आहे. थोड्या फरकाने. सर्वांत दीन पीडित स्त्रीच्या दृष्टीकोनातून विकासाच्या कार्यक्रम तपासला गेला पाहिजे असे हे नवे सूत्र आहे.

या सूत्राचा व्यवहारात काय अर्थ लागतो ?

उदाहरणार्थ, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न घ्या. स्वातंत्र्यानंतर ४५ वर्षांनी लाखो गावांना आज पिण्याचे पाणी नाही. डोक्यावर हंड्यांच्या उतरंडी वाहत मैलच्या मैल बाया दिवसामागून दिवस पाणी भरत आहेत.

पाण्याचे नियोजन करणारी मंडळी, त्यांना कधी अशी उतरंड उचलावी लागली नाही. त्यांना पाणी वाहणाऱ्या स्त्रीच्या काबाडकष्टांचे काय होय ? त्यांच्या योजना भव्य दिव्य. धरणे, कालवे, तळी, टाक्या. नोकरशहांच्या फायद्याच्या, कंत्राटदारांच्या लाभाच्या आणि पुढाऱ्याच्या सोयीच्या. पाण्याच्या नियोजनाचे काम पाणी वाहणाऱ्या एखाद्या बाईकडे असते तर ती म्हणाली असती, "गावांत एवढ्या उंच खर्चिक टाक्या बांधायची काय गरज आहे. जेथून बाया पाणी भरतात तिथून मोटर इंजिन लावा, गावांतल्या दोनचार नळांच्या कोंडाळ्यांना तास दोन तास पाणी आले म्हणजे बायांच्या डोळ्यांतलं पाणी खळेल. बस. बाकीच्या बांधकामांची काही घाई नाही."

स्त्रियांचा दृष्टिकोन असा अनेक बाबतीत वेगळा असू शकतो.

प्राथमिक आरोग्य केन्द्रात बाईला आणतात, आणली तर, बाळंतपणासाठी किंवा अगदीच मरणासन्न झाली म्हणजे. काय उपयोग बाईमाणसांना तिथल्या डॉक्टरांचा आणि बाकी सर्व साधनांचा? त्याच्यापेक्षां गावांतल्या सुईणीला थोडे प्रशिक्षण देऊन अधिक कुशल केली असती तर बायांना केवढा आधार झाला असता !

मुलींना आधीच शाळेत पाठवायला शेतकरी आईबापे तयार नसतात. गावांत जितकी शाळा असेल तितकी पुरी झाली तरी मोठी नवलची गोष्ट. गावची शाळा संपली म्हणजे दूरच्या गावी पुढच्या शिक्षणासाठी मुलांना पाठवतात. मुलींना क्वचितच. गावच्या छोट्याशा शाळेत गुरूजी येतातच. त्यांच्याकडून मुलींच्या शिकवण्याची सोय गावातल्या गावात सहज करता येईल.

पण लक्षांत कोण घेतो ?

महिलांच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधून घ्यावे, स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा मान मिळवून द्यावा हेच शेतकरी महिला आघाडीचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच शेतकरी महिला आघाडी महिलांच्या राखीव जागा लढवत आहे.

सर्व महिलांकडून आणि शेतकरी भावांकडून अपेक्षा काय?

राखीव जागांवर शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणा.

पुढाऱ्यांच्या बाहुल्यांना मते देऊ नका.

शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांना राखीव चिन्ह दिलेले नाही. आपल्या मतदार संघांतील शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांची खूण नीट माहीत करून घ्या.

शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारांच्या सहाय्यासाठी शेतकरी संघटनेचे कार्यकर्तेही बिगरराखीव जागी उभे आहे. त्यांनाही विजयी करा. ● ● ●

## दहा नोव्हेंबर – शेतकरी हुतात्मा दिन

### विनम्र अभिवादन

**उद्योजकवादी संस्कृतीच्या स्वागतासाठी प्रतिज्ञाबद्ध आहोत**

**– शेतकरी संघटना पाईक**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On November 6, 1994

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
November 6, 1994

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

शेतकरी महिला आघाडी

शेतकरी संघटना

# संयुक्त अधिवेशन
# नागपूर.
## कस्तुरचंद पार्क
## १२ नोव्हेंबर १९९४
## सायंकाळी ४ वाजता

सर्व स्वातंत्र्यप्रेमी
आणि
उद्योजकवादी संस्कृतीच्या स्वागतास
हजर राहणाऱ्या सर्व उद्योजक शेतकरी,
उद्योजक आणि व्यावसायिक यांचे
शेतकरी संघटकतर्फे
हार्दिक स्वागत
आणि
हार्दिक शुभेच्छा.

To

देणगी मूल्य : रुपये १५/-

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी. - ०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.